UNIVERSAL
LIBRARY
OU_192420
UNIVERSAL
LIBRARY

# गांधीवादावरील कांहीं आक्षेप

लेखक
श्री. गोपाळराव कुळकर्णी

प्रकाशक
महाराष्ट्र-ग्रंथभांडार, गिरगांव-मुंबई

किंमत रु. १॥ सन १९४४

★

लोकमाता पुण्यश्लोक दिवंगत सती

# सौ. कस्तुरबा गांधी

यांच्या

पुण्यस्मरणास

सादर समर्पण

★

# अनुक्रमणिका


| अ. | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | सत्य, अहिंसा आणि राजकारण ... ... ... | १ |
| २ | अहिंसा समाजधर्म होऊं शकेल ? ... ... ... | ४ |
| ३ | वासराची हिंसा आणि सशस्त्र प्रतिकार ... ... | ७ |
| ४ | अहिंसा म्हणजे नेभळटपणा ? ... ... ... | १३ |
| ५ | हृदयपरिवर्तनाची शक्यता ... ... ... | १५ |
| ६ | गीता आणि अहिंसा ... ... ... | २३ |
| ७ | सत्याचा आग्रह कां ? ... ... ... | २७ |
| ८ | अहिंसा निष्फळ झाली आहे ? ... ... ... | ३१ |
| ९ | जगाचा नियम प्रेम कीं स्पर्धा ? ... ... ... | ३३ |
| १० | "जीवो जीवस्य जीवनम्" ... ... ... | ३६ |
| ११ | अहिंसेचें पालन अशक्य ? ... ... ... | ३८ |
| १२ | स्वातंत्र्योत्तर अहिंसा ... ... ... | ४० |
| १३ | युद्धें नाहींशीं होतील ? ... ... ... | ५० |
| १४ | यंत्रांना विरोध कां ? ... ... ... | ५२ |
| १५ | सुताच्या धाग्यानें स्वराज्य ? ... ... ... | ५६ |
| १६ | गांधींचा ग्रामोद्योगाचा आदर्श वेडेपणाचा ? ... ... | ६३ |
| १७ | श्रीमंत संपत्तीचे ट्रस्टी ? ... ... .... | ६८ |
| १८ | अहिंसेचा प्रयोग निष्फळ ? ... ... ... | ७२ |
| १९ | गांधीवादाचे अनुयायी ... ... ... | ७३ |
| २० | स्वातंत्र्यासाठीं असत्याचरण धर्म्य आहे ? ... ... | ७४ |
| २१ | अहिंसक समाजरचना ... ... .... | ८६ |
| २२ | गांधीवाद रूक्ष आणि नीरस ? ... ... ... | ९३ |
| २३ | गांधीवाद तर्कशून्य आहे ? ... ... ... | १०३ |

# वाचकांना—

१९२० च्या असहकाराच्या चळवळीपासून माझा महात्मा गांधींशीं संबंध आला. तेव्हांपासून त्यांच्या विचारसरणीचें परिशीलन आणि कार्यपद्धतीचा अभ्यास मी करीत आहें. त्यांचें जीवन, राजकारण, अर्थकारण, समाजकारण वगैरे विषयींचें तत्त्वज्ञान अगदीं तर्कशुद्ध आहे, असें मला विचारांतीं वाटतें. त्यांची विचारप्रणालि आज 'गांधीवाद' या नांवानें ओळखली जाते. 'गांधीवाद' हें नांव गांधींनीं किंवा गांधींच्या अनुयायांनीं शोधलें नसून, गांधींच्या विचारसरणीकडे चौकस बुद्धीनें पाहणाऱ्या राजकारणाच्या अभ्यासी वर्गानें तें शोधलें आहे. गांधींच्या विचारांविरुद्ध प्रचार करते वेळीं या नांवानेंच त्यांच्या विचारसरणीचा उल्लेख केला जातो. म्हणून मीही त्याच नांवाचा स्वीकार केला आहे.

गांधींच्या विचारसरणीच्या निरनिराळ्या विरोधकांकडून त्या विचारसरणींत त्यांचे दृष्टीनें जीं तर्कविरुद्ध, अव्यवहार्य किंवा विघातक तत्त्वें आहेत तीं दाखविण्यासाठीं जे आक्षेप वारंवार केले जातात, त्या आक्षेपांपैकीं कांहींचा विचार मीं प्रस्तुत लहानशा पुस्तकांत केला आहे. स्वामी आनंदांनीं आपल्या आशीर्वादांत लिहिल्याप्रमाणें माझें लिखाण उत्तरपक्ष या नांवाला योग्य आह कीं नाहीं तें वाचकांनींच ठरवावें.

आक्षेपांची मांडणी करण्यांत वापरलेली भाषा माझी स्वतःचीच आहे; आणि मला वाटतें कीं आक्षेपकांची विचारसरणी संकलित रूपानें त्यांना बिलकूल अन्याय होणार नाहीं अशा प्रकारेंच मीं मांडली आहे. मीं दिलेलीं उत्तरें माझीं स्वतःचींच आहेत. गांधी-विचारांची सांगड माझ्या मनांत मीं ज्या प्रकारें बसविली आहे त्याला अनुसरूनच हीं उत्तरें लिहिलीं गेलीं आहेत. म्हणून, या पुस्तकांतील विचार प्रत्यक्ष म. गांधींचे आहेत असें समजण्याची चूक कोणीं करूं नये. गांधींचे विचार मी जसे समजतों तसे मीं मांडले आहेत. त्यांत जे दोष असतील ते सर्व माझे आहेत, हें वाचकांना सांगणें नकोच.

माझ्या विनंतीला मान देऊन श्री स्वामी आनंद यांनीं आशीर्वादाचे दोन शब्द लिहून दिले याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें. पुस्तक-प्रकाशनाबद्दल महाराष्ट्र-ग्रंथभांडाराचे संचालक श्री. कुळकर्णी यांचाही मी अत्यंत आभारी आहें.

पुष्कळ काळजी घेतली असूनही पुस्तकांत कित्येक अर्थाचा अनर्थ करणारीं अशुद्धें नजरचुकीनें राहून गेलीं आहेत. तीं शुद्धिपत्राप्रमाणें सुधारून घेऊन मगच वाचकांनीं पुस्तक वाचायला सुरवात करावी.

मुंबई सर्वांचा सेवक—

ता. २५।३।४४

वर्षप्रतिपदा शके १८६६ गोपाळराव कुळकर्णी

# आशीर्वाद

श्री. गोपाळराव कुळकर्णी हे गुजराथ विद्यापीठाच्या प्रारंभकाळांतील जुने विद्यार्थी म्हणून माझ्या परिचयाचे आहेत. विद्यार्थी-अवस्था संपल्यावर आज कित्येक वर्षे निरनिराळ्या सार्वजनिक व खाजगी शिक्षणक्षेत्रांत काम करीत असतां गांधीतत्त्वाचें खोल परिशीलन त्यांनी केलें आहे. प्रस्तुत छोटेखानी पुस्तकांत गांधीतत्त्वावर सामान्यतः होणाऱ्या आक्षेपांस मुद्देसूद व तर्कशुद्ध उत्तर देण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे. त्यांची विचारसरणी अगर मांडणी सर्वांस तंतोतंत न पटली तत्रापि त्यांनीं केलेल्या उत्तरपक्षानें गांधीतत्त्वाविषयीं महाराष्ट्रीय शिक्षितांमध्यें वसत असलेल्या कित्येक भ्रमांचें, विशेषतः विहगवृत्तींच्या आधुनिकांकडून होणाऱ्या अनेक अर्धवट आक्षेपांचें निरसन होईल यांत शंका नाहीं.

मुंबई, १९–३–१९४४ स्वामी आनंद

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ५ | खालून | ६ | असतो, | असतो. |
| ८ | खालून | ८ | येथ | येथें |
| ११ | खालून | ११ | ह | हें |
| १२ | वरून | ४ | वेळ | वेळां |
| १३ | वरून | १६ | पाल | पालन |
| १७ | वरून | १ | हिंसाविरोधक | अहिंसक विरोधक |
| १८ | खालून | १३ | ह | हें. |
| २३ | वरून | ८ | लागणाच | लागणारच |
| २७ | वरून | ९ | महाभारताचें | महाभारत |
| २८ | वरून | १६ | आहे हें, | आहे हें |
| ४५ | खालून | ७ | शत्रूल | शत्रूला |
| ३३ | खालून | ६ | आदर्श वेडेपणाचा ! | आदर्श वेडेपणाचा ? |
| ६८ | खालून | १० | निमूलन | निर्मूलन |
| ७१ | वरून | १० | त | तें |
| ७२ | वरून | १० | प्रयोग निष्फळ | प्रयोग निष्फळ ? |
| ८६ | खालून | ८ | ( Elopian ) | ( Utopian ) |
| ८८ | खालून | २ | विकेन्द्रीकरणाच्या | केन्द्रीकरणाच्या |
| ९० | खालून | ९ | केन्द्रकरणाला | केन्द्रीकरणाला |
| ९१ | खालून | २ | वगरे | वगैरे |
| ९१ | खालून | २ | आपल्याकरितां | आपल्याला करितां |
| ९२ | खालून | ९ | तेरा अंगें | चौदा अंगें |
| ९३ | वरून | ४ | आंतर्राष्ट्रीय | आंतर राष्ट्रीय |
| ९३ | वरून | ७ | दिसासूचकच | दिशासूचनच |
| ९३ | वरून | ११ | तेरा | चौदा |
| ९३ | खालून | ७ | आंतर्राष्ट्रीय | आंतर राष्ट्रीय |
| ९४ | वरून | ११ | मालीन्य | मालिन्य |
| १०४ | खालून | ८ | भांडवशाही | भांडवलशाही |

# १ सत्य, अहिंसा आणि राजकारण

**आक्षेपः—** गांधीवादाचे मूलभूत सिद्धान्त सत्य आणि अहिंसा व्यक्तिजीवनाच्या विकासाच्या दृष्टीनें कितीही महत्त्वाचे असले, तरी राजकारणांत त्या सिद्धांतांना घुसडविल्यामुळें हिंदुस्थानचें राजकारण दीर्घसूत्री होऊन हिंदुस्थानचें स्वातंत्र्य दुरावलें आहे.

**उत्तरः—** हा आक्षेप करणारे वस्तुस्थितीचें निरीक्षण केल्यावांचूनच बोलत असतात. राजकारण म्हणजे असत्य, कपट, फसवेगिरी, स्वार्थसाधुपणा वगैरेंची खिचडी, असा नेहमींचा अनुभव असल्यामुळें राजकारणांत दुसऱ्या कोणत्याही उच्च भावनांचा समावेश त्यांना सहन होत नाहीं. राजकारण म्हणजे निवडणुकींत निवडून येण्यासाठीं होणारी अहमहमिका; राजकारण म्हणजे सत्तेसाठीं होणारी स्पर्धा; राजकारण म्हणजे खोटे तह आणि मोडण्याचे हेतूनेंच केलेले करारनामे; राजकारण म्हणजे पक्षापक्षांतील भांडणें; वगैरे स्वरूपानें नटलेलें राजकारण नेहमीं पाहण्याची संवय झाल्यामुळें या आक्षेपकांना गांधीवादानें कल्पिलेलें राजकारणाचें स्वरूप इतकें निराळें भासतें कीं, तें राजकारणच नव्हे असें त्यांना वाटतें. धर्म आणि राजकारण भिन्न आहेत आणि दोहोंना एकत्र आणण्याचा प्रयत्न करणें म्हणजे दोहोंचाही विनाश करणें होय, असें मानणारे हे लोक आहेत. या त्यांच्या मान्यतेंत एक गोष्ट स्पष्टपणें दिसून येते कीं, धर्म आणि राजकारण या परस्परपोषक शक्ति नसून परस्परविघातक शक्ति आहेत. अशी मूलभूत कल्पना असल्यामुळेंच हे लोक गांधीवादावर वरील दोषारोपण करतात. खरें पाहिलें तर राजकारणाविषयींच्या या मूलभूत कल्पनेंतच दोष आहे. राजकारण कसें आहे हें पाहून त्यावरून त्याचें वास्तविक स्वरूप कसें असावें हें नक्की करण्यांत दोष नाहीं. पण राजकारणाचें जें स्वरूप आज सर्वत्र दिसतें तेंच त्याचें अंतिम, व्यवहार्य आणि कार्यसाधक रूप आहे असें मानणें, यांत विचारदोष आहे. राजकारणांत आज जी मलिनता दिसते तिच्यामुळेंच समाजांत विषमता दिसून येते. शासक आणि शासित, जुल्मी आणि चिरडलेले, श्रीमंत आणि गरीब

वगैरे विषमता राजकारणांत ( आणि त्याचबरोबर अर्थकारणांत ) दिसून येणाऱ्या मलिनतेमुळेंच अस्तित्वांत आली आहे, हें थोडासा विचार करणाऱ्यालाही स्पष्टपणें दिसून येईल. ही मलिनता राजकारणांतून निघून गेली आणि असत्याचे ठिकाणीं सत्य, कपटाचे ठिकाणीं ऋजुता, स्पर्धेच्या ठिकाणीं त्यागवृत्ति, सत्तेच्या तृष्णेच्या जागीं सेवाभावना जर आल्या, तर राजकारण आसुरी संपत्तीचें माहेरघर झालें आहे, त्याचे ऐवजीं तें मनुष्य जातीला उपकारक साधन होईल. गांधींचा प्रयत्न असें राजकारण उभें करण्याचाच आहे आणि कमींत कमी कॉंग्रेसच्या राजकारणांत तरी हीं तत्त्वें कांहीं अंशानें दिसून येतात. याचा अर्थ असा नव्हे कीं वरील आसुरी भावना कॉंग्रेसच्या राजकारणांतून नाहींशा झाल्या आहेत. त्या भावना तेथेंही भरपूर आहेतच. पण त्या भावना लपून छपून, भीत भीत कार्य करीत असतात. कारण कीं कॉंग्रेसनें स्वीकारलेल्या विचारप्रणालींत या भावनांना स्थानच नाहीं. मनुष्यस्वभावाच्या निर्बलतेमुळें कॉंग्रेसच्या राजकारणांत असत्यादि हीन तत्त्वें दिसून आलीं तरी तीं तत्त्वें नाहींशीं करण्याकडेच कॉंग्रेसचें राजकारण प्रयत्नशील आहे, यांत शंका नाहीं.

राजकारणाला विशुद्ध बनविण्याच्या गांधीवादाच्या प्रयत्नांमुळें हिंदुस्थानचें राजकारण दीर्घसूत्री होऊन देशाचें स्वातंत्र्य दुरावलें आहे, असें म्हणणें इतिहासाकडे डोळेझांक करण्यासारखें आहे. गांधीवादाचा पगडा राजकारणावर बसल्यापासून राजकारणांत जी तडफ आलेली आहे, ती पूर्वीं कधींच नव्हती. कॉंग्रेसचें आजचें राजकारण म्हणजे अंतर्बाह्य निर्भयता. जेथें भय असतें तेथेंच गुप्ततेची आवश्यकता असते. कॉंग्रेसनें गुप्तता राजकारणांतून काढून टाकण्याचा प्रयत्न केला आहे. जें कांहीं करावयाचें तें राजरोस, जें कांहीं बोलावयाचें तें उघडपणें, हा कॉंग्रेसच्या राजकारणाचा क्रम आहे. १९२१ पासून १९४३ पर्यंतचा कॉंग्रेसचा इतिहास पाहिला तर राजकारणांत दीर्घसूत्रीपणा कोठेंच दिसून येत नाहीं. सर्व कामें तडफेनें झालीं आहेत. १९२१ चा टिळक स्वराज्यफंड पाहतां पाहतां एक कोटी रुपये झाला, हा काय दीर्घसूत्रीपणा आहे ? गांवोगांवीं संघटणें झालीं हा काय दीर्घसूत्रीपणा आहे ? संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव झाला हा काय दीर्घसूत्रीपणा आहे ? १९३० ची दांडीकूच आणि त्यानंतरची जगाच्या इतिहासांत अद्वितीय अशी सत्याग्रहाची मोहीम, हा काय दीर्घसूत्रीपणा आहे ? सरकारनें गांधींशीं तहाचें बोलणें केलें हा काय

दीर्घसूत्रीपणा आहे ? त्यःनंतर सात प्रांतांत कॉंग्रेसचीं राज्यें झालीं हा काय दीर्घसूत्रीपणा आहे ? प्रसंग येतांच "पटान्तलग्नतृणकम्" समजून श्री रामाप्रमाणें कॉंग्रेसनें राज्यत्याग केला हाही काय दीर्घसूत्रीपणा आहे ? आणि शेवटीं १९४२ च्या ऑगस्टच्या ९ व्या तारखेला देशाचे सर्वच पुढारी परकी सत्तेला आह्वान देऊन तुरुंगांत गेले, हा काय दीर्घसूत्रीपणा आहे ?

आणि हिंदुस्थानचें स्वातंत्र्य दुरावलें आहे असें म्हणण्याला आधार तरी काय आहे ? हिंदुस्थान अद्याप स्वतंत्र नाहीं झालें म्हणूनच त्याचें स्वातंत्र्य गांधीवादाच्या राजकारणामुळें दुरावलें असें म्हणणें वस्तुस्थितीला धरून नाहीं. गांधींच्या राजकारणाशिवाय दुसरें कोणतें राजकारण हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला जवळ आणूं शकलें असतें, हें आक्षेपकांनीं सांगितलें पाहिजे. श्रीनिवासशास्त्री किंवा चिमणलाल सेटलवाड यांचा सनदशीर मार्ग, किंवा हिंदुमहासभेचा जातिविग्रहाचा मार्ग, किवा क्रान्तिवादी बॉम्बवाल्यांचा मार्ग गांधींच्या राजकारणापेक्षां जास्त परिणामकारी होऊन त्या मार्गाच्या अवलंबनानें हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य लवकर आलें असतें, असें आक्षेपकांना वाटतें काय? तसें असेल तर हे तीनही मार्ग आजही आहेतच. त्या सर्वांनीं लोकांना आपला मार्ग पटवून देऊन स्वातंत्र्य खुशाल जवळ आणावें. पण खरी गोष्ट ही आहे कीं सनदशीर गणले गेलेले मार्ग केव्हांच निष्फळ होऊन गेले आहेत; क्रान्तिवाद्यांचे बॉम्बही स्वातंत्र्याला जवळ आणण्याला असमर्थ ठरले आहेत; हिंदुमहासभेची जातिविग्रहाची नीति परकीय सत्तेवर एकही आघात करूं शकत नाहीं. अशा परिस्थितींत स्वातंत्र्य प्राप्त होत नाहीं याचें कारण कॉंग्रेसचा मार्ग चुकीचा आहे, किंवा दीर्घसूत्री आहे, किंवा धर्मानें विटाळलेला आहे, हें नव्हे. याचें कारण हेंच आहे कीं हिंदुस्थानच्या जनतेंत प्रतिकाराची शक्ति योग्य प्रमाणांत अद्याप वाढली नाहीं. १९२१ पासून १९४३ पर्यंत तीन मोठ्या मोहिमी झाल्या. पहिली असहकाराची, दुसरी मिठाच्या सत्याग्रहाची आणि तिसरी १९४२–४३ ची. या सर्व मोहिमींत लोकांची निर्बलता दिसून आली. त्या निर्बलतेचा पारा हळू हळू कमी होत आहे यांत शंका नाहीं; आणि तो पुरत्या प्रमाणांत उतरून लोकांची प्रतिकाराची शक्ति वाढेल, तेव्हां हिंदुस्थान क्षणार्धांत स्वतंत्र होईल. म्हणून स्वातंत्र्यांत जी दिरंगाई होत आहे त्याला गांधीवाद जबाबदार आहे असें म्हणणें हें वड्याचें तेल वांग्यावर काढण्याप्रमाणें आहे.

राजकारणाला धर्माचें वावडें असायला कांहींच कारण नाहीं. भारतीय संस्कृतींत जीवनाच्या प्रत्येक अंगाचें अधिष्ठानच धर्मावर आहे. "मी धर्मा-विरुद्ध काम आहें" असें श्रीकृष्णांनीं सांगितलें आहे, यांतच आर्यसंस्कृतीचें सार येऊन जातें. धर्म म्हणजे समाजाच्या धारणेचें–सुस्थितीचें साधन. त्या धर्माला भिऊन कां वागावें ? समर्थ रामदासांनीं शिवाजीच्या राजकारणाला धर्माचा पाठिंबा दिला म्हणून शिवाजीचें उज्ज्वल राजकारण महाराष्ट्राचें स्वातंत्र्य मिळवूं शकलें. १९२१ पासून राजकारणाला जें वळण लागलें आहे, त्यामुळें हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची चळवळ आपलें "चळवळीचें" स्वरूप सोडून देऊन "स्वातंत्र्याची मोहीम" किंवा "स्वातंत्र्याचें युद्ध" झाली आहे. यांत वावगें काय आहे ? धर्मानें यांत काय बिघडविलें ?

# २ अहिंसा समाजधर्म होऊं शकेल ?

**आक्षेपः**—अहिंसा व्यक्तिधर्म होऊं शकेल, समाजधर्म नाहीं.

**उत्तरः**—व्यक्तिधर्म आणि समाजधर्म भिन्न असूं शकतच नाहींत. दोन्हींत फरक असला तर धर्माचरणाच्या मात्रेचा असेल, मूलभूत सिद्धान्ताचा नव्हे. व्यक्ति आपल्या शक्तीप्रमाणें धर्माचरणाच्या वाटेल त्या उच्च पायरीला चढूं शकेल, सारा समाज त्या पायरीला पोहोंचूं शकणार नाहीं, एवढाच फरक त्यांत आहे. हरिश्चन्द्रानें सत्याचें आचरण ज्या प्रमाणांत केलें त्या प्रमाणांत तें साऱ्या समाजाला शक्य झालें नाहीं, तरी समाजापुढें हरिश्चन्द्राचाच आदर्श राहील आणि तसा तो आहेही. म्हणजे सत्य हा जसा हरिश्चन्द्राचा व्यक्तिधर्म झाला, तसाच तो समाजाचा समाजधर्मही झाला. सत्याचरणांत किती प्रगति होऊं शकेल याचा आधार त्या त्या समाजाच्या शक्तीवर राहील.

अहिंसेच्या बाबतींतही असेंच आहे. अहिंसा जर व्यक्तिजीवनाला उन्नत करणारें तत्त्व आहे, तर तें समाजजीवनालाही पोषक होणारच. अहिंसा जर व्यक्तीला शक्य आहे तर ती समाजालाही विशिष्ट प्रमाणांत शक्य होणारच. महावीर, बुद्ध किंवा येशुख्रिस्तासारख्यांनीं अहिंसेचें उच्चतम आचरण केलें. अहिंसेची तेवढी मोठी मात्रा साऱ्या समाजाला शक्य झाली नाहीं तरी समाजाला उपकारक वस्तु अहिंसाच राहणार. गांधीवादांत सामाजिक अहिंसेचें जें स्वरूप आंखलेलें आहे तें महावीर किंवा ख्रिस्ताच्या कोटीच्या अहिंसेचें नसून कोण-

ताही पामर समाज झेलूं शकेल इतकें सोपें आहे. १९२१ पासून १९३४ पर्यंतच्या राजकारणांत गांधींच्या नेतृत्वाखालीं अहिंसक प्रतिकाराच्या ज्या मोहिमा झाल्या त्यांत सामूहिक अहिंसेचें सुंदर आविष्करण झालें. व्यक्तीची अहिंसा मुख्यतः त्याच्या आत्मविकासासाठीं असते, तर समाजाची अहिंसा अन्यायाच्या प्रतिकारासाठीं किंवा समाजाच्या सुस्थितीसाठीं असते. आत्मविकासासाठीं ज्या अहिंसेचें आचरण करावयाचें तिला मर्यादाच नसते, तर सामाजिक अहिंसा मर्यादित असते. अहिंसेची जास्तींत जास्त मर्यादा निश्चित करणें शक्य नसतें, अहिंसेची कमींत कमी मर्यादाच निश्चित करणें शक्य असतें. एक उदाहरण घेऊन ही गोष्ट अधिक स्पष्ट करितां येईल. गुरुतम आणि लघुतम मर्यादा ( Maxima & Minima ) हा गणितशास्त्रांतील एक महत्त्वाचा विषय आहे. कित्येक बाबतींत गुरुतम मर्यादा काढतांच येत नाहीं, ती अमर्याद म्हणजे अनन्त असते. त्या ठिकाणीं लघुतम मर्यादाच काढावी लागते. उदाहरणार्थ, एका मनुष्याला सुखानें राहण्यासाठीं महिन्याला कमींत कमी किती रुपये पाहिजेत ? हा प्रश्न घेतला तर त्यांत कमींत कमी पंधरा किंवा वीस अशी मर्यादा परिस्थितीला धरून निश्चित करतां येईल. पण खर्चाच्या रुपयांची गुरुतम मर्यादा कशी निश्चित होणार ? एक लाख रुपयेही चालतील, एक कोटिही चालतील. अहिंसेच्या मर्यादेचें असेंच आहे. मनुष्यानें किंवा समाजानें अहिंसेचें किती हद्दीपर्यंत पालन करावें हा प्रश्न घेतला तर त्याची गुरुतम मर्यादा अनन्त होईल. पण समाजाच्या सुस्थितीसाठीं कमींत कमी किती अहिंसा पाळलीच पाहिजे, ही लघुतम मर्यादा आपल्याला नक्की करितां येते.

गांधीवादानें समाजापुढें सामाजिक अहिंसेचें जें स्वरूप ठेविलें आहे, तें या लघुतम मर्यादेपुरतेंच. गांधीवादच काय, कोणत्याही समाजाचें नियंत्रण करणारी राज्यसंस्थाही अशा प्रकारची अहिंसेची लघुतम मर्यादा नक्की करते आणि त्याचें पालन कडकपणें करवते, म्हणूनच समाज सुस्थितींत चालतो. पण चालू राज्यसंस्थांचा आदर्श अहिंसा नसून कमींत कमी हिंसा असतो, गांधीवाद आणि चालू राज्यसंस्था यांत फरक आहे. आणि हा फरक फारच मोठा आहे. चालू राज्यसंस्था कमींत कमी अहिंसेचें पालन जनतेकडून करविण्यासाठीं स्वतः कमींत कमी हिंसा वापरण्याच्या मार्गाचा अवलंब करिते. "कमींत कमी हिंसा" असें म्हणतांना कमींत कमीचें प्रमाण कधीं कधीं इतकें वाढतें कीं निर्दोष लोकांच्या रक्ताच्या नद्या वाहतात. हिंसेची

कमींत कमी मर्यादा ठरविल्यानंतर त्या मर्यादेचें उल्लंघन झालें—म्हणजे हिंसेची मात्रा वाढली—तर समाजाचें अकल्याण होतें. पण जेव्हां अहिंसेचा आदर्श स्वीकारून आपण अहिंसेची कमींत कमी कार्यसाधक मात्रा ठरवितों आणि तिचें पालन करवितों, तेव्हां अहिंसेची मात्रा वाढली तर समाजाचें नुकसान होईल ही भीति तेथें नसते. अहिंसेची मात्रा वाढली तर समाजाची सुस्थिति वाढेल. समाजापुढें जो आदर्श ठेवावयाचा तो अशाच प्रकारचा पाहिजे. हिंसेचा आदर्श स्वीकारून तिची मात्रा कमींत कमी करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां अहिंसेचा आदर्श ठेवून तिच्या लघुतम मात्रेपासून सुरवात करून उत्तरोत्तर अहिंसावृत्ति वाढेल असें करणें, हा क्रम समाजोन्नतीला जास्त उपकारक आहे.

गांधींनी सत्याग्रह्यांसाठीं अहिंसापालनाची जी मर्यादा ठरविली आहे, ती अगदींच सुसाध्य आहे. "मी वाणीनें आणि कर्मानें अहिंसक राहीन, आणि मनानें अहिंसक राहण्याचा प्रयत्न करीन." एवढीच प्रतिज्ञा सत्याग्रही सैनिकाला घ्यावयाची असते आणि तीही सत्याग्रहाच्या मोहिमेपुरतीच. हें किती सोपें आहे, तें असंख्य सत्याग्रह्यांनीं अहिंसेचें सुंदर पालन करून सिद्ध केलें आहे. धारासण्याच्या मोहिमेत सामाजिक अहिंसेचें जें स्वरूप दिसून आलें, त्यावरून तरी अहिंसेवरील आक्षेपकांची खात्री व्हायला पाहिजे होती. आतां हें जें अहिंसेचें पालन झालें, तें तिच्या लघुतम मर्यादेचेंच. जे सत्याग्रही सत्याग्रहाच्या भूमीवर अहिंसक राहिले, ते स्वतःच्या खाजगी जीवनांत अहिंसक राहिलेच असें नाहीं आणि अशा प्रकारें अहिंसक राहण्याचें बंधनही त्यांचेसाठीं नव्हतें. अशा प्रकारें वर्षानुवर्ष अहिंसेच्या लघुतम मर्यादेचें पालन करतां करतां अहिंसाशक्तीचा विकास होऊन अहिंसापालनाचें क्षेत्र आणि मर्यादा दोन्ही वाढत जातील, तर समाजांत अहिंसेचें बल वाढून समाजाचें कल्याण होईल. ज्याप्रमाणें कमींत कमी हिंसेच्या आदर्शांतून अमानुषी हिंसा उत्पन्न होते, त्याचप्रमाणें लघुतम, कार्यसाधक अहिंसेच्या पालनांतून अहिंसेच्या उच्चतर, उच्चतम स्वरूपांचें आविष्करण हळू हळू झाल्यावांचून राहत नाहीं, आणि त्यामुळें समाजाच्या कल्याणाची मात्राही वाढत जाते.

अहिंसा समाजधर्म होऊं शकणार नाहीं, असें म्हणणारे लोक आपल्या दृष्टीपुढें महावीर किंवा ख्रिस्ताची अहिंसा ठेवतात. पण अहिंसक समाजांत अहिंसेच्या एवढ्या भव्य मात्रेची अपेक्षाच नसते. साऱ्या समाजानें पाळा-

वयाची अहिंसा अगदीं सोप्या स्वरूपाची आणि सर्वसुकर अशीच असते. आणि गांधीवादानेंही सामाजिक अहिंसा अशाच स्वरूपाची कल्पिली आहे. अर्थातच, ही अहिंसक समाजाची प्रारंभिक दशा झाली. यांतून अहिंसेचा अधिकाधिक अभ्यास होऊन अहिंसेचा सराव जसजसा समाजाला होईल, तसतसें अहिंसेचें पालन जास्त जास्त सुकर होत जाऊन तिची मात्राही वाढत जाईल. गांधीवादाचें हेंच लक्ष्य आहे आणि गांधीवादाच्या या विचारप्रणालींत कोठेंही दोष दिसून येत नाहीं.

# ३ वासराची हिंसा आणि सशस्त्र प्रतिकार

**आक्षेपः—** गांधीवादाची अहिंसा म्हणजे काय हेंच कळत नाहीं. आजारी वासराला मारून टाकण्याचा सल्ला व हत्यारानें सुद्धां अत्याचाराचा विरोध करण्याचा सल्ला गांधी देतात, हें त्यांच्या अहिंसेला सुसंगत कसें आहे ? गांधींची अहिंसा तेरड्याप्रमाणें नेहमीं रंग बदलीत असते, म्हणून तिला राजकारणांत स्थान देणें धोक्याचें आहे.

**उत्तरः—** आक्षेपकानें यांत जीं दोन उदाहरणें दिलीं आहेत तीं निरनिराळ्या परिस्थितींतलीं आहेत. पहिलें उदाहरण, म्हणजे आजारी वासराला मारून टाकण्याचा दिलेला सल्ला, वैयक्तिक हिंसे-अहिंसेच्या कक्षेंत येतो. हत्यारानें प्रतिकार करण्याचा दिलेला सल्ला वैयक्तिक आणि सामाजिक दोन्ही क्षेत्रांतील असून राजकीय क्षेत्रालाही लागू होतो. आक्षेपकांनीं दिलेलीं उदाहरणें खरीं आहेत. गांधींनीं असह्य वेदनांनीं पीडिल्या जाणाऱ्या वासराला विषाच्या इंजेक्शननें मारून टाकण्याचा सल्ला दिला ही गोष्ट जशी खरी आहे; तसेंच विशिष्ट परिस्थितींत शस्त्रानें प्रतिकार केला पाहिजे—करणें हा धर्म आहे, असेंही त्यांनीं प्रतिपादलें आहे, हेंही खरें आहे. पण गांधीवादाची अहिंसा तेरड्याप्रमाणें रंग बदलणारी आहे, हें त्यावरून फलित होऊं शकत नाहीं. तें कसें तें आतां आपण पाहूं या.

वासरूं आजारी झालें आणि त्याला इतक्या असह्य वेदना होऊं लागल्या कीं त्या वेदना पाहणेंही सर्वांना अशक्य झालें. सर्व दृष्टींनीं विचार करतांना

असें आढळून आलें कीं वासरूं जगूं शकेल असा एकही मानवी उपाय दिसून येत नाहीं. वासरूं मरणार हें तर नक्की. पण मरण खूपच लांबणार आणि मरेपर्यंत त्याला असह्य वेदना सहन कराव्या लागणार. त्या वेदनांपासून त्या वासराला मुक्त करतां आलें तर त्या वासरावर अनन्त उपकार होतील. वासराला वाचा असती तर त्यानें "मला यांतून कसें तरी करून सोडवा. विष घाला, गोळी घाला, पण मला सोडवा." अशी मागणी केली असती. त्या परिस्थितींत असणाऱ्या माणसानेंही तशीच मागणी केली असती. मग वासरानें त्या वेदना सहन करून दीर्घकालानें मरावें त्यापेक्षां तें लवकर मेलें तर वेदनांतून लवकर सुटेल, असें सर्वांना वाटलें, त्याप्रमाणेंच गांधींनाही वाटलें. त्या वेळीं वासराला दुःखमुक्त करणें हाच श्रेष्ठ दयाधर्म होता. दुसऱ्याचा प्राण हरण न करणें हा जरी अहिंसेचा स्थूल अर्थ असला, तरी अहिंसेचा खरा आणि व्यापक अर्थ कोणालाही दुःख न देणें हाच आहे. दुःख न देणें ही अहिंसेची निषेधात्मक बाजू झाली. अहिंसेची विधेयात्मक बाजूही आहे आणि ती दुसऱ्यांना दुःखमुक्त करणें ही होय. केवळ निषेधात्मक बाजूचें पालन करणारा मनुष्य अहिंसक गणला जाईल, पण त्याला सक्रिय अहिंसक म्हणतां येणार नाहीं. 'कोणालाही दुःख न देणें' यांत दुष्ट क्रियेचा अभाव आहे, तर "दुसऱ्यांना दुःखमुक्त करणें" यांत सत्क्रियेचें आचरण आहे. खरा अहिंसक तोच कीं जो अहिंसेच्या दोन्ही अंगांचें आचरण करील. या दृष्टीनें वासराला दुःखमुक्त करण्याचा एक मात्र उपाय गांधींनी अवलंबिला यांत अहिंसेचें श्रेष्ठ पालनच केलें.

यावर कोणी असें म्हणेल कीं वासराचा प्राण गेला त्याचें काय? ती तर हिंसा झालीच ना? येथ हिंसा कशावरून नक्की करावयाची तें स्पष्ट केलें पाहिजे. एखादा डॉक्टर शस्त्रविद्येनें रोग्याला रोगमुक्त करण्याचा प्रयत्न करतो, पण असें करीत असतांना कित्येक वेळीं रोगी दगावतो. कधीं कधीं तर ऑपरेशनच्या टेबलावरच रोग्याचें प्राणोत्क्रमण होतें. ऑपरेशनमुळेंच प्राणोत्क्रमण एकदम झालें, असेंही होतें. पण त्यामुळें डॉक्टर हिंसेच्या दोषाला पात्र होत नाहीं. त्याचें स्वतःचें मन, समाजाचें मन, सरकारी कायदा किंवा नीतितत्त्वें त्याला हिंसक असें कधींच म्हणत नाहींत. याचें कारण हें कीं हिंसेच्या बुडाशीं क्रोध किंवा स्वार्थ या दोन वृत्तिच दिसून येतात. या दोन्ही वृत्ति नसल्या तर जाणून बुजून हिंसा होऊं शकत नाहीं. अजाणतां आपण असंख्य

प्राण्यांची हिंसा करतों, त्यामुळें तितक्यापुरतें आपण हिंसक तर खरेच; पण हिंसावृत्ति ही वस्तु निराळीच आहे. हिंसावृत्तीच्या मुळाशीं वर सांगितलेल्या दोन वृत्तींपैकीं एक किंवा दोन्ही असतातच. त्याशिवाय जाणतेपणाची हिंसा-वृत्ति उत्पन्नच होत नाहीं. भांडणांतून जी हिंसा होते तिच्या मुळाशीं क्रोध किंवा स्वार्थ किंवा दोन्ही भावना असतात. अपमानामुळें क्रोध अनावर झाल्याकारणानें खून होतात, स्वार्थावर गदा आली तर त्याचे प्रतिकारार्थ रक्त सांडलें जातें. अशा प्रकारची जी हिंसा आहे ती सर्वथा त्याज्य आहे असें अहिंसेचा सिद्धान्त म्हणतो.

या दृष्टीनें विचार केला असतां वासराला मारण्यांत स्वार्थ किंवा क्रोध दोन्हींपैकीं एकही वृत्ति नसून शुद्ध दयावृत्तिच होती. वासराला दुःखापासून, असह्य वेदनांपासून मुक्त करण्याची विधेयात्मक अहिंसावृत्ति तिच्या मुळाशीं होती. ऑपरेशन करणारा डॉक्टर रोग्याला मरणाचें संकट असूनही ज्याप्रमाणें ऑपरेशन करतो यांत त्याची हिंसावृत्ति नसते, त्याप्रमाणेंच वासरूं मरणार हें निश्चित असतांना त्याच्या मृत्यूला स्वतः निमित्तमात्र होऊन त्याला वेद-नांतून मुक्त करणारा पुरुष हिंसक होऊं शकत नाहीं.

पण वासराविषयींचा हा आक्षेप 'गांधीवाद' शब्द ज्या अर्थानें वापरला जातो त्या अर्थानें पाहतां गांधीवादाशीं प्रत्यक्ष तितकासा निगडित नाहीं. गांधीवादाचा विशिष्ट समाजरचनेशीं संबंध आहे. ज्याप्रमाणें समाजवाद, नाझीवाद, साम्राज्यवाद यांचा संबंध विशिष्ट प्रकारच्या राजकीय आणि आर्थिक समाजरचनेशीं आहे, त्याचप्रमाणें गांधीवादाचा संबंधही विशिष्ट प्रकारच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक समाजरचनेशीं आहे. वासराचा प्रश्न वैय-क्तिक स्वरूपाचा असल्यामुळें त्याचा वैयक्तिक अहिंसेशीं गाढ संबंध आहे, पण सामाजिक अहिंसेशीं त्याचा इतकासा संबंध नाहीं.

आक्षेपकांनीं जो दुसरा आक्षेप घेतला आहे त्याचा संबंध मात्र राजकीय अहिंसेशीं फारच महत्त्वाचा आहे. अत्याचार करणाऱ्याचा प्रतिरोध हत्यारानेंही करण्याचा सल्ला गांधींनीं दिला आहे ही गोष्ट कोणाच्याही मनांत शंका उत्पन्न करण्यासारखी आहे, हें खरें आहे. पण या शंकेचें निरसन अहिं-सेचें खरें स्वरूप समजून घेतल्यानें आपोआपच होणार आहे.

माणसांत किंवा समाजांत जितक्या प्रमाणांत निर्भयता असेल तितक्याच प्रमाणांत अहिंसावृत्तीचा प्रादुर्भाव होऊं शकतो. निर्भयतेशिवाय

अहिंसा संभवतच नाहीं. भय असतें तेथेंच हिंसावृत्ति संभवते. आपण मनुष्य, साप, विंचू, ढेकूण, वाघ, डास वगैरेंना मारतों त्याचे मुळाशीं भयवृत्तिच असते. आहारासाठीं पशु मारले जातात तेथें प्रत्यक्ष भयवृत्ति नसली तरी अप्रत्यक्ष भयवृत्ति असते. जिजीविषा असल्यामुळें आहाराची वृत्ति प्रबल होते आणि आहाराच्या अभावीं मृत्यु होईल या भयामुळें हिंसा करूनही जगण्याची वृत्ति जागृत होते. भयंकर दुष्काळाचे वेळीं कुत्र्याची तंगडी खाऊन क्षुधा शमन करणाऱ्या ऋषीची गोष्ट प्रसिद्धच आहे.

अहिंसेच्या शब्दार्थाचाच केवळ विचार केला तर जो दुसऱ्याची हिंसा करीत नाहीं तो अहिंसक होईल. पण हिंसा न करणारा प्रत्येक प्राणी अहिंसक होऊं शकत नाहीं. उंदीर मांजराला मारीत नाहीं, म्हणून उंदराला अहिंसक म्हणतां येत नाहीं. बकरी वाघाला मारीत नाहीं म्हणून बकरीला अहिंसक म्हणतां येत नाहीं. अहिंसा तेथेंच संभवते जेथें मारण्याची शक्ति असूनही मारलें जात नाहीं. वाघ बकरीला मारणार नाहीं तर ती अहिंसा होईल. मांजर उंदराला मारणार नाहीं तर ती अहिंसा होईल. उंदीर मांजराला मारीत नाहीं किंवा बकरी सिंहाला मारीत नाहीं याचें कारण दोघांमध्यें मारण्याची शक्ति नाहीं. मारण्याची शक्ति नसल्यामुळें मांजराला पाहतांच उंदीर भयभीत होतो आणि वाघाला पाहतांच बकरी भयभीत होते. भयस्थानापासून पळून जाऊनही हे दोन्ही प्राणी आपला बचाव करूं पाहतात.

यावरून अहिंसावृत्ति कशाला म्हणावयाची तें लक्षांत येईल. मारण्याची शक्ति असूनही जो मारीत नाहीं, तोच अहिंसक. भीतीमुळें जो मारूं शकत नाहीं त्याला या अर्थानें अहिंसक म्हणतां येत नाहीं.

हिंदुस्थानांत गुलामीचीं मुळें इतकीं खोल रुजलीं आहेत कीं सारें राष्ट्र खूपच निर्वीर्य झालें आहे. येईल त्या जुलमापुढें मान तुकवून जुलूम सहन करण्याची वृत्ति सर्वत्र दिसून येते. एखाद्या खेड्यांत ४,५ सशस्त्र दरवडेखोर आले कीं साऱ्या गांवाचें धाबें दणाणून जातें आणि प्रत्येक जण आपापल्या घराचीं दारें बंद करून आंत लपून बसतो. भर बाजारांत एखादा माथेफिरू दुसऱ्याच्या छातींत सुरा खुपसतो आणि आसपासचे सर्व लोक तें दृश्य पाहून दूर पळून जातात. असे प्रकार हिंदुस्थानांत नेहमीं पाहायला मिळतात. अशा भयभीत स्थितींत जे लोक आहेत त्यांनीं अहिंसेचें पालन कसें करावयाचें? त्यांना " तुम्ही मारूं नका " असा उपदेश केला तर तो त्यांना पथ्यकर वाटेल

आणि ते न मारतां पळून जातील ! पण अहिंसा जेव्हां "मारूं नका" असा आदेश देते तेव्हां त्याचेबरोबरच असाही आदेश देते कीं "मारूं नका; पण संपूर्ण प्रतिकार करा." म्हणजे अहिंसेचा अर्थ अहिंसक प्रतिकार असा होतो. येशू खिस्तानें सांगितलें "Resist not evil—पापाचा प्रतिकार करूं नका." गांधीवाद म्हणतो, "Resist evil with all your might, but resist nonviolently—पापाचा प्रतिकार तुमची पराकाष्ठा करून करा, पण तो अहिंसक रीतीनें." खिस्त आणि गांधी यांच्या शिकवणुकींतील हा महत्त्वाचा फरक लक्षांत घेतला पाहिजे आणि या फरकामुळेंच गांधी शस्त्रानें सुद्धां प्रतिकार करण्याचा सल्ला विशिष्ट परिस्थितींत देतात.

म्हणजे गांधींच्या अहिंसेंत अप्रतिकाराला स्थान नसून अहिंसक प्रतिकाराला मुख्य स्थान आहे, ही गोष्ट नेहमीं लक्षांत बाळगली पाहिजे. अप्रतिकाराची उच्च दशा संभवते. जेथें मानापमानशून्य अवस्था झाली आहे तेथें स्थितप्रज्ञ दशेला पोंहोंचलेला मनुष्य आपल्या अपमानाला अपमान न गणतां स्वस्थ बसून राहूं शकेल. पण ही स्थिति सर्वसामान्य नव्हे. सर्वसामान्य माणसें मानापमानाच्या द्वंद्वांत गुरफटलेलीं असतात. अशा लोकांसाठीं गांधीवादानें अहिंसक प्रतिकाराचा मार्ग दाखविला आहे. खिस्ताचा अप्रतिकाराचा मार्ग स्थितप्रज्ञासाठीं कदाचित् असूं शकेल. पण बहुजनसमाजासाठीं गांधीवादाचा मार्गच श्रेयस्कर आहे.

वर सांगितल्याप्रमाणें गांधीवादाच्या अहिंसेंत अन्यायाचा प्रतिकार करणें हे प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य होते. तो प्रतिकार अहिंसक रीतीनें करावा हा गांधीवादाचा मार्ग आहे. अहिंसक प्रतिकार म्हणजे शत्रूला किंवा प्रतिपक्षाला कसलीही पीडा न करितां त्याच्या अन्यायाचा प्रतिकार करणें. हा प्रतिकार करीत असतांना स्वतःला वाटेल तितकें दुःख सहन करावें लागलें, मार खावा लागला, प्राणही खर्चावा लागला तरी हरकत नाहीं. सर्व कांहीं सहन करून प्रतिपक्षाला कसलीही इजा न करतां त्याच्या अन्यायाचा प्रतिकार करा, हा गांधीवादाचा आदेश आहे.

पण असा अहिंसक प्रतिकार सर्वांना साधणें कठिण आहे. निदान अहिंसेचा मार्ग रूढ होऊन त्याचें आचरण जगाच्या अंगवळणीं पडेपर्यंत अहिंसक प्रतिकार सर्वसामान्य जनतेला फारच कठीण वाटेल. अहिंसक प्रतिकाराचा मार्ग इतका नवा आहे कीं त्याचे संस्कार जगावर अद्याप पडलेच नाहींत, असें

म्हटलें पाहिजे. अशा परिस्थितींत अहिंसक प्रतिकार पुष्कळ वेळां व्यक्तीला किंवा व्यक्तिसमूहाला अशक्य होऊन जातो. अशा वेळीं त्या व्यक्तीनें किंवा समाजानें काय करावें ?

गांधींनीं राष्ट्राचे सेनापति म्हणून लोकांची संघटना करून अनेक वेळ अहिंसक प्रतिकाराचे मोर्चे उभे करून सफळ करून दाखविले आहेत. पण जगांतील प्रत्येक लढ्यांत कांहीं गांधींचें नेतृत्व अथवा अहिंसक संघटना संभवत नाहीं. गांधींनी योजिलेले लढे पूर्वीपासून नक्की केलेले असल्यामुळें, त्यांचे तयारीसाठीं संघटनेला अवकाश मिळतो. पण व्यक्तीवर किंवा व्यक्तिसमूहावर अचानक अशीं आक्रमणें होतात कीं त्या वेळीं संघटनेला किंवा योजनेला वेळही राहात नाहीं. अशा वेळीं ती व्यक्ति किंवा व्यक्तिसमूह ज्या प्रकारानें प्रतिकार करूं शकेल त्या प्रकारें प्रतिकार करणें हा त्यांचा धर्म होतो.

अहिंसक प्रतिकारासाठीं निर्भयतेची किंवा निःस्वार्थतेची जी मात्रा लागते ती नसली तर काय करावयाचें ? प्रतिकार न करणें हें तर गांधीवादाच्या दृष्टीनें नामर्दपणाचें लक्षण आहे. प्रतिकार केलाच पाहिजे. तो हिंसक कीं अहिंसक हाच काय तो प्रश्न राहतो. गांधीवाद म्हणतो कीं अहिंसक प्रतिकार हाच परिणामकारक आणि कल्याणकारक आहे. पण अहिंसक प्रतिकाराची शक्ति नसेल तर ? निःशस्त्र प्रतिकार करून येईल त्या संकटाला तोंड देण्याची, स्वतःचे प्राण खर्चीं घालूनही अन्यायाचा सामना करण्याची तयारी किंवा पात्रता नसेल तर ? तर काय अहिंसेचा सिद्धान्त पाळण्यासाठीं पळून जावयाचें ? प्रतिकार केल्यावांचून शरण जावयाचें ? ही अहिंसा नव्हे, पण हा नामर्दपणा आहे. अहिंसेंत पळून जाण्याला, शरण जाण्याला स्थानच नाहीं. "अहिंसक प्रतिकार" या शब्दप्रयोगांत लक्ष्य प्रतिकार आहे आणि अहिंसा हें साधन आहे. प्रतिकार सोडून अहिंसा पाळली जाईल, तर ती अहिंसा नव्हे. ती उंदराची किंवा बकरीची, मांजर किंवा वाघाविषयींची भ्याडपणाची वृत्तिच होय. आणि व्यक्ति किंवा समाजाच्या विकासाच्या दृष्टीनें भ्याडपणा हे एक अत्यंत विघातक तत्त्व आहे. सशस्त्र प्रतिकार आणि भ्याडपणा या दोहोंत सशस्त्र प्रतिकार हेंच कर्तव्य होतें. आणि याच दृष्टीनें ज्यांना निःशस्त्र प्रतिकार शक्य नसेल, त्यांनीं सशस्त्र प्रतिकार तरी केलाच पाहिजे असें गांधी म्हणतात. याचा अर्थ असा नव्हे कीं गांधीवादांत सशस्त्र प्रतिकाराचा पुरस्कार केला आहे किंवा गांधी सशस्त्र प्रतिकाराचे पुरस्कर्ते आहेत. गांधी किंवा गांधीवाद

निःशस्त्र प्रतिकाराचेच पुरस्कर्ते आहेत. पण कोणत्याही कारणामुळें निःशस्त्र प्रतिकार शक्य नसेल, तर अन्याय अथवा जुलूम सहन न करतां सशस्त्र प्रतिकार करूनही अन्यायाचा अथवा जुलमाचा प्रतिकार केलाच पाहिजे, हें गांधींचें म्हणणें आहे. आणि याच दृष्टीनें हिंदु-मुसलमानांच्या दंग्यासारखे दंगे होतील तेव्हां, चोर किंवा लुटारू चढाई करून येतील तेव्हां, स्त्रियांचे अब्रूवर आक्रमण होईल तेव्हां, किंवा अशा अन्य प्रसंगीं निःशस्त्र प्रतिकार शक्य नसेल, तर सशस्त्र प्रतिकार करूनही आपली मर्दानगी दाखविणें हाच मनुष्याचा किंवा समाजाचा धर्म होतो, असें गांधींनीं सांगितलें आहे.

वरील विचारसरणींत विसंगति कोठेंच नाहीं, तेरड्यासारखे बदलते रंगही कोठेंच नाहींत. ही एक तर्कशुद्ध विचारसरणी आहे. कर्तव्यपालनांत अधिकार पाहूनच कर्तव्याची मात्रा ठरवावी लागते. जो मनुष्य किंवा समाज विकासाच्या ज्या पायरीवर असेल त्या पायरीला अनुरूपच त्याच्या कर्तव्याचें स्वरूप ठरूं शकतें. गांधींच्या दृष्टीनें ब्रह्मचर्य हा जीवनाचा सर्वोत्कृष्ट आदर्श असूनही, त्यांनीं स्वतःशीं संबंधांत आलेल्या अनेक तरुण-तरुणींचीं लग्नें आपल्या हातानें लावलीं आहत आणि त्यांना आशीर्वाद दिले आहेत. श्रेष्ठ धर्माचें पालन करण्याची शक्ति ज्यांच्यांत नाहीं, त्यांनीं त्याच्याहून कमी मात्रेच्या धर्माचें पालन करावें, अशी सूट प्रत्येक धर्मशास्त्र देतें. ज्यांना संपूर्ण ब्रह्मचर्य शक्य नाहीं त्यांनीं एकपत्नीव्रत पाळावें, अशी सूट गांधी देतात. त्याचप्रमाणें ज्यांना निःशस्त्र प्रतिकार शक्य नाहीं त्यांना सशस्त्र प्रतिकाराची सूट गांधींनीं दिली आहे. पण या सर्व बाबती सूट देण्याच्या आहेत, मूलगत धर्माच्या किंवा कर्तव्याच्या नव्हेत. गांधींचें किंवा गांधीवादाचें मूलगत तत्त्वज्ञान तर अहिंसक प्रतिकाराचा आदर्शच मानवजातीपुढें ठेवीत आहे.

## ४ अहिंसा म्हणजे नेभळटपणा ?

**आक्षेपः**— गांधींच्या अहिंसेच्या सिद्धान्तामुळें सारें राष्ट्र पुळचट आणि नेभळट बनलें आहे.

**उत्तरः**— हा सर्वसामान्य आक्षेप आहे. हिंदुस्थानांत तत्त्वज्ञानाचा प्रचार झाल्यामुळें सारें राष्ट्र निष्क्रिय आणि दैववादी

बनलें आहे, असा जो आक्षेप कित्येकांकडून करण्यांत येतो, त्यापैकींच हा एक आक्षेप आहे. पण दुसरा आक्षेप जसा खोटा आहे तसाच हा आक्षेपही खोटा आहे. अहिंसेचा सिद्धान्त गांधींनीं व्यवस्थित स्वरूपांत राष्ट्रापुढें १९१९ सालीं ठेवला आणि १९२० मध्यें तो राष्ट्रानें स्वीकारला. १९२० पासून १९४३ पर्यंत फक्त २३ वर्षांच्या अवधींत गांधींच्या अहिंसेचा प्रयोग झाला. आक्षेपकांचें म्हणणें असें कीं या २३ वर्षांत राष्ट्र अहिंसेमुळें पुळचट आणि नेभळट बनलें आहे. असें म्हणणें हें किती हास्यास्पद आहे! १९२० सालीं साऱ्या राष्ट्रांत जें चैतन्य पसरलें, असहकाराची जी प्रचंड लाट उसळली, तें कांहीं पुळचटपणाचें लक्षण नव्हतें. त्यानंतर दिवसेंदिवस राष्ट्राची तेजस्विता वाढतच चालली आहे. पुळचटपणा आणि नेभळटपणा दिसून येत असेल तर तो पूर्वींच्याच अवगुणांचा अवशेष आहे. अहिंसक प्रतिकाराचें शस्त्र हातांत आल्यापासून तर राष्ट्राची प्रतिकाराची शक्ति वाढतीच आहे आणि प्रतिकारशक्तीच्या वाढीबरोबरच स्वाभिमान आणि तेजस्विताही वाढल्या आहेत. अशा परिस्थितींत राष्ट्र अधिक नेभळट झालें आहे, असें म्हणणें हें ऐतिहासिक सत्याची अवगणना करण्याबरोबर आहे.

ऐतिहासिक दृष्टीनें हा आक्षेप चुकीचा आहे, ही गोष्ट स्पष्ट झाली, तरी या आक्षेपाच्या बुडाशीं एक मूलभूत भ्रममूलक कल्पना आहे तिचा विचार येथें करणें प्राप्त आहे. ती कल्पना ही कीं अहिंसेच्या साधनेनें व्यक्ति किंवा समाज नेभळट आणि पुळचट बनतो.

आपण यापूर्वीं पाहिलेंच आहे कीं गांधीवादाच्या अहिंसेचा आधारच निर्भयतेवर आहे. शस्त्राचा आश्रय घेऊन लढणारा मनुष्य निर्भय असतो, पण शस्त्राचा आश्रय घेण्यांत भयाची छटा असतेच. हातांत तलवार किंवा बंदूक घेऊन शत्रूचा सामना करणाऱ्या माणसापेक्षां, हातांत कोणतेंही हत्यार न घेतां शस्त्रसज्ज शत्रूच्या समोर छाती काढून उभा राहणारा पुरुष जास्त निर्भय आहे, ही गोष्ट कोणालाही सहज पटण्यासारखी आहे. मग अहिंसेच्या उपासनेनें नेभळटपणा किंवा पुळचटणा येणें कसें शक्य आहे? हे दोन्ही दोष अहिंसेंतून निर्माण झालेले कोठें दिसत असले तर ते खऱ्या अहिंसेमुळें नसून विपर्यस्त अहिंसेमुळें होत. पळपुटेपणाची वृत्ति म्हणजेच अहिंसा असा गैरसमज कित्येक ठिकाणीं दिसून येतो. म्हणजे पुळचटपणा किंवा नेभळटपणाचा उदय अहिंसेंतून नसून अहिंसेच्या नांवानें स्वीकारल्या गेलेल्या पळपुटेपणांतून असतो.

# ५ हृदयपरिवर्तनाची शक्यता

**आक्षेप:—** अहिंसेच्या मार्गानें विरोधी पक्षाचें हृदयपरिवर्तन होऊं शकतें, ही गांधीवादाची श्रद्धा व्यर्थ आहे.

**उत्तर:—** हा एक मूलभूत तत्त्वाचा प्रश्न आहे. दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं गांधीवादाच्या अहिंसेचा प्रयोग अद्यापि बाल्यावस्थेंत आहे. त्याचे परिणाम काय येतील तें अद्याप कोणालाच माहीत नाहीं. त्यामुळें अहिंसेच्या परिणामाविषयीं प्रत्यक्ष ऐतिहासिक उदाहरणें दाखविणें कठीण आहे. म्हणून मुख्यतः तर्कबुद्धीवर अवलंबून राहूनच या आक्षेपाचें उत्तर देणें प्राप्त आहे.

अहिंसक विरोधाचें पर्यवसान प्रतिपक्षाच्या हृदयपरिवर्तनांत होतें कीं नाहीं तें पाहाण्यापूर्वी, हिंसक विरोधानें काय होतें तें पाहिलें पाहिजे. जगाचा इतिहास आपण जितका जाणतों आहों, तेव्हांपासून हिंसक विरोध चालूच आहे. वैयक्तिक, सामाजिक, धार्मिक किंवा राजकीय बाबतींत जेथें जेथें हितसंबंधाचा संघर्ष अथवा स्वार्थबुद्धीचा विरोध उत्पन्न होतो, तेथें तेथें शरीरबलानें किंवा शस्त्रबलानें आपापला पक्ष स्थापित करण्याचा प्रयत्न माणसें करीत आलीं आहेत. याचीं भांडण, द्वंद्वयुद्ध, लढाई, युद्ध वगैरे अनेक स्वरूपें आहेत. प्रत्येक वेळीं जेव्हां जेव्हां भांडणें होतात, तेव्हां तेव्हां भांडणारे दोन्ही पक्ष आपली बाजू न्यायाची आणि धर्माची आहे असेंच प्रतिपादन करितात, आणि न्यायाच्या व धर्माच्या रक्षणासाठीं आम्ही लढत आहों असें दोन्ही पक्ष जगाला भासविण्याचा प्रयत्न करितात. अशा भांडणाचें किंवा युद्धाचें पर्यवसान एका पक्षाच्या विजयांत होतें आणि दुसरा पक्ष पराजित होतो. पण हें पर्यवसान तात्पुरतें होतें. त्यानें भांडणाचा अंत येत नाहीं. जो पक्ष जिंकतो तो पराभूत पक्षाला चिरडून टाकण्याचा प्रयत्न करतो. जो पक्ष पराभूत होतो तो मनांत वैरबुद्धि ठेवून पुढें केव्हां तरी विजयी पक्षाला हाणून पाडण्याचा निश्चय मनांत करून तशी तयारी करूं लागतो. त्यांतून पुढें दुसरें भांडण किंवा युद्ध होतें, आणि पुन्हां पूर्वीसारख्याच वृत्ति जिंकणाऱ्या आणि हरणाऱ्या पक्षाच्या मनांत जागृत होतात आणि पुन्हां नवें भांडण किंवा नवें युद्ध निर्माण होतें. अशा प्रकारें युद्धाची परंपरा चालते. न्यायाचा किंवा सत्याचा पक्ष प्रस्थापित करण्याचा प्रयत्न

बाजूलाच राहून अपमानाचा सूड उगविण्याची वृत्ति प्रबल होते. १९१४ सालच्या महायुद्धांत जर्मनीचा पराभव होऊन जर्मनी आतां पुन्हां डोकें वर करूं शकणार नाहीं अशी खात्री जेत्या राष्ट्रांना वाटली, पण तोच जर्मनी पुन्हां एका नव्या युद्धाचा वणवा पेटवून सर्व जगाला भस्मीभूत करूं पाहत आहे! चालू युरोपीय युद्ध धर्म आणि न्यायाच्या स्थापनेसाठीं आहे असें दोन्ही पक्ष म्हणत आहेत. पण युद्धाचे अंतीं धर्म आणि न्याय यांची स्थापना होऊं शकेल असें एकही चिह्न दिसत नाहीं. चालू युद्ध एका नव्या युद्धाची तयारी म्हणूनच आहे, अशी भीति आतांपासूनच वाटूं लागली आहे.

हिंसक प्रतिकाराची ही परंपरा मानवसमाजांत अनादि कालापासून चालू असल्यामुळेंच जगांतील विचारी लोक निःशस्त्रीकरणाचा पुरस्कार करीत आहेत, आणि शांतीच्या मार्गानें राष्ट्राराष्ट्रांतील कलहांचा निवाडा करतां येईल अशी आंतरराष्ट्रीय संस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण युद्धें टाळण्याची केवळ शुभेच्छा असल्यानें युद्धें टळणार नाहींत. अन्यायाचा प्रतिकार करण्याचें शांतिमय शस्त्र शोधून काढल्याशिवाय युद्धें टळणार नाहींत. असें शस्त्र गांधींचा निःशस्त्रप्रतिकार किंवा सत्याग्रह हें होय.

हिंसक युद्धांत आणि सत्याग्रहांत काय फरक आहे तें आतां आपण पाहूं या. हिंसक युद्धांत दोन्ही पक्ष एकमेकांचा विनाश करूं इच्छितात. प्रतिपक्षांतील माणसांची प्राणहानि जास्तींत जास्त करून प्रतिपक्षाला जेरीला आणावयाचा दोन्ही पक्षांचा हेतु असतो. मनुष्यांची प्राणहानि, मालमत्तेचा विनाश, संस्कृतीचा विध्वंस हीं उद्दिष्टें नजरेसमोर ठेवूनच दोन्ही पक्ष प्रतिपक्षाशीं लढत असतात. याचा परिणाम असा होतो कीं जरी अंतीं दोहोंपैकीं एखादा पक्ष विजयी झाला तरी त्या विजयाचा उत्सव करण्याइतकें त्राणही त्या पक्षांत राहात नाहीं. महाभारत युद्धांत पांडव पक्ष विजयी झाला, पण त्या विजयामुळें प्राप्त झालेलें एकछत्री साम्राज्य भोगण्याची इच्छा पांडव पक्षांत मुळींच नव्हती. तें राज्य त्यांना खायला येत होतें. अशीच स्थिति रक्त वाहवून विजय मिळविणाऱ्या विजेत्यांची नेहमीं होते. जित पक्ष जवळ जवळ नामोहरम होतोच, पण जेता पक्षही इतका हतबल होतो कीं विजयाचें सुख भोगण्याची शक्ति त्याचेंत राहत नाहीं. पण अहिंसक प्रतिकारांत जो पक्ष अहिंसेचा अवलंब करून लढतो त्याचा हेतु प्रतिपक्षाचा पराजय करावयाचा नसून न्याय आणि धर्माचा विजय करावयाचा असतो. म्हणूनच प्रतिपक्षांतील

मनुष्यांची प्राणहानि आपल्या हातून बिलकूल होणार नाहीं अशी खबरदारी हिंसा-विरोधक म्हणजे सत्याग्रही घेत असतो. ही खबरदारी घेत असतांना अहिंसक प्रतिकार करणारा विरोध उग्र रूपानें चालू ठेवण्याची खबरदारीही घेत असतो. सत्याग्रह्याला यांत अनेक प्रकारचे कष्ट सहन करावे लागतात, कारण कीं विरुद्ध पक्ष शस्त्रास्त्रांच्या बळावर त्याचेशीं लढत असतो. विरुद्ध पक्षाचा हेतुच सत्याग्रही सेनेंतील माणसांची शक्ति शक्य तितकी कमी करण्याचा असतो. त्यामुळें मार मारणें, हल्ला करणें, गोळ्या चालविणें, बॉम्ब फेकणें वगैरे सशस्त्र प्रतिकारांतील सर्व उपाय ते सत्याग्रह्यांवर चालवितात. त्यामुळें सत्याग्रह्यांना अनेक प्रकारचीं दुःखें सहन करावीं लागतात, त्यांच्या स्थावर-जंगम मिळकतीचा नाश होतो, त्यांची प्राणहानिही पुष्कळ होते.

अशा रीतीनें एका पक्षाच्या केसालाही धक्का न लागतां दुसऱ्या पक्षाला अकल्प्य पीडा सहन करावी लागते. ही विषमता सत्याग्रही प्रतिकारांत उत्पन्न होते आणि या विषमतेंतच सत्याग्रह्याचें बळ राहिलें आहे. तें कसें तें आतां आपण पाहूं या.

निःशस्त्रांवर हत्यार चालविणें ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाहीं. सशस्त्र प्रतिकार असल्याशिवाय सशस्त्र हल्ला करणाऱ्याचें लढण्याचें वारें टिकूं शकत नाहीं. " **अतृणे पतितो वह्निः स्वयमेवोपशाम्यति** " हें वचन प्रसिद्धच आहे. हिंसक योद्ध्याचा लढाईचा उत्साह अहिंसक प्रतिकारापुढें असाच थंड पडतो. काठ्यावर काठ्या मारल्या असतांही प्रतिपक्षी रागावत नाहीं, चिडत नाहीं, परत हल्ला करीत नाहीं असें पाहून हिंसक योद्ध्याचा हिंसेचा उत्साह मंदावतो. हा अनुभव सामान्य व्यवहारांतही नेहमीं पाहायला मिळतो. समाजांत नेहमीं जीं भांडणें होतात, तीं दोन्ही पक्षांच्या कलहप्रियतेमुळेंच होऊं शकतात. दोन्ही पक्षांपैकीं एक पक्षही जर शांत राहील आणि अपमान किंवा शिवीगाळीचा प्रतिकार शांतीनेंच करील तर शिवीगाळ करणारा हतबल होऊन, निराश होऊन, लाजून जाऊन मागें हटतो, हा अनुभव नेहमींचाच आहे. हिंदुस्थानच्या गेल्या २० वर्षांच्या इतिहासांत राजकीय क्षेत्रांतही हा अनुभव अनेक वेळां पाहायला मिळाला आहे. १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहाचे वेळीं धारासण्याच्या सत्याग्रहभूमीवर सत्याग्रह्यांनीं जी निष्ठा दाखविली आणि अहिंसा-वृत्तीचें जें पालन केलें, त्यामुळें हल्ला करणारे शिपायी लाजेनें खालीं पाहूं लागले ही गोष्ट सर्वांनाच माहीत आहे. त्याच सत्याग्र-

हाच्या मोहिमेंत हल्ला करणाऱ्या शिपायांचीं अंतःकरणें द्रवून जाऊं नयेत म्हणून त्यांना भरपूर दारू पाजून दारूच्या गुंगींत उन्मत्त बनवून लाठीहल्ला करण्यासाठीं आणलें जात होतें, ही गोष्टही सर्वांना माहीत आहे. एका सत्याग्रह्याला बेदम मार मारून तो बेशुद्ध झाल्यामुळें त्याला हॉस्पिटलमध्यें नेलें. मार पडत असतांना काठीच्या प्रत्येक घावाबरोबर ' राम ' ' राम ' असा शब्दोच्चार तो सत्याग्रही करीत होता. तो हॉस्पिटलमध्यें पडला असतां दुसरे दिवशीं त्याला काठीनें झोडपणारा शिपायी साध्या पोशाकांत त्याचे जवळ गेला आणि डोळ्यांत अश्रु आणून त्यानें आपल्या अत्याचारी वर्तनाचा पश्चात्ताप जाहीर केला आणि त्याची माफी मागून " पोटासाठीं अशी कसायासारखी करणी करावी लागते. तुम्ही मला पोटापुरती व्यवस्था करून द्याल तर मी ही सरकारची गुलामी सोडून द्यायला तयार आहें " असें त्यानें सत्याग्रह्याला सांगितलें. सत्याग्रह्यानें त्याला सांगितलें, " तुम्हीं मला मारलें त्यामुळें माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं दुःख सहन करण्याची संधि मला मिळाली, म्हणून मी तुमचाच अत्यंत आभारी आहे. तुम्ही माझी क्षमा कशाला मागतां ? " अहिंसावीर स्वामी श्रद्धानंद शस्त्रधारी सेनेच्या समोर उघड्या छातीनें उभे राहिले हें उदाहरणही प्रसिद्ध आहे. पंडित मालवीयांसारख्या वयोवृद्ध ज्ञानवृद्ध तपोवृद्ध नेत्यानें तासाचे तास पावसांत भिजत सत्याग्रह केला, पण मिरवणूक मागें वळविली नाहीं, हें उदाहरण मुंबईच्या लोकांच्या नजरेसमोर अजूनही तसेंच्या तसेंच स्पष्ट दिसण्याइतकें ताजें आहे. अशीं अनेक उदाहरणें सत्याग्रह्यांच्या मोहिमेंतून दाखवितां येतील. निःशस्त्र प्रतिकारापुढें हत्यारें हतबल होतात, हा अनुभव अनेक प्रसंगीं आला आहे.

हें असें कां होतें तें आपण पाहिलें पाहिजे. याच्या मुळाशीं मनुष्यस्वभावाची विशिष्टता आहे. मनुष्यस्वभाव जात्या हिंसक नाहीं. कृत्रिम कारणांमुळें वैरवृत्ति जागृत झाल्या कारणानें मनुष्य हिंसेला प्रवृत्त होतो. वैरवृत्तीनें प्रेरित होऊन तो प्रतिपक्षावर हल्ला चढवितो. सामान्य युद्धांत प्रतिपक्षही तशाच भावनेनें प्रेरित होऊन जोराचा प्रतिहल्ला चढवतो. दोन्ही पक्षांची एकमेकांविषयींची वैरवृत्ति एकमेकीला वाढविते आणि दोन्ही पक्षांना हिंसाकार्याला अखंड प्रेरणा मिळत राहते. आणि म्हणूनच तीन तीन चार चार वर्षें युद्धें चाललीं तरी वैरभाव किंवा हिंसावृत्तीचा उपशम झालेला दिसून येत नाहीं. पण दोन पक्षांपैकीं एक पक्ष जेव्हां अहिंसक असतो, निर्वैर

असतो, तेव्हां आक्रमण करणाऱ्या पक्षाच्या वैरवृत्तीला पोषक तत्त्व विरुद्ध पक्षांत मिळत नाहीं, म्हणून मनुष्य कृत्रिम रीतीनें उत्पन्न करून कृत्रिम उपायांनीं वाढविलेली वैरवृत्ति टिकवूं शकत नाहीं आणि ती कमी कमी होत जाते आणि शेवटीं अगदींच नाहींशी होते. वैरवृत्तीचें कृत्रिम दडपण निघून गेलें कीं, हिंसावृत्ति आपोआपच उपशम पावते आणि मनुष्य हिंसेचें हत्यार सोडून देतो. अक्रोधानें क्रोधाला जिंकावें हा बुद्ध धर्माचा आदेश मानव स्वभावांतील याच सनातन सत्यावर अवलंबून आहे.

पण एवढ्यानें हृदयपरिवर्तन झालें असें नाहीं. यांत शस्त्रशक्ति निष्फल झाली इतकेंच. पण हृदयपरिवर्तनाची क्रिया येथून सुरू होते, आणि तें हृदयपरिवर्तन घडवून आणण्यासाठीं अनेक अंगें काम करीत असतात. त्यांतील पहिलें अंग अत्याचाऱ्याचें स्वतःचें मन, हेंच होय. अत्याचाराचा प्रतिकार प्रतिअत्याचारानें होत नाहीं असें पाहून अत्याचाऱ्याच्या मनांत प्रथम आश्चर्याची भावना जागृत होते. त्या आश्चर्यातून स्वतःच्या आचरणाची आणि प्रतिपक्ष्याच्या आचरणाची तुलना त्याच्या मनांत सुरू होते. या तुलनेतून स्वतः कां अत्याचार करीत आहे, याचा विचार त्याला येतो आणि सत्याग्रह्याचा पक्ष नेहमीं न्याय्यच असल्यामुळें, त्याला आढळून येतें कीं अत्याचाराला योग्य असें कारण त्याचेपाशीं नाहीं. उलट, प्रतिपक्षाचा आग्रह न्यायाचा असल्यामुळें, त्यानेंच न्याय प्रस्थापित करण्यासाठीं स्वतःवर सशस्त्र आक्रमण केलें पाहिजे. तें तसें न करतां उलट तो स्वतःचाच हल्ला शांतपणानें सहन करीत आहे आणि आपल्या विरुद्ध हत्यारही उचलीत नाहीं. या परिस्थितीची तुलना केल्यामुळें त्याला स्वतःच्या अन्यायी आणि अत्याचारी वृत्तीबद्दल लाज वाटूं लागते, आणि अशी लाज वाटूं लागली म्हणजेच न्याय्य पक्ष कोणता आहे आणि स्वतःचा पक्ष किती अन्यायाचा आहे याची कल्पना त्याला येते.

हृदयपरिवर्तनाला पोषक असें दुसरें तत्त्व म्हणजे लोकमत. एका बाजूला हिंसक अत्याचारी आणि दुसऱ्या बाजूला अहिंसक सत्याग्रही असा सामना सुरू झाला म्हणजे स्वाभाविकपणेंच लोकमत अहिंसक पक्षाला अनुकूल होतें. सत्याग्रहाचें वैशिष्ट्यच हें आहे कीं, न्याय्य आणि धर्म्य कार्याच्या सिद्धीसाठींच सत्याग्रह होऊं शकतो. शिकंदर किंवा नेपोलीयन ज्याप्रमाणें दिग्विजयाला निघाले आणि आपल्या साम्राज्यतृष्णेमुळें त्यांनीं अनेक निर्दोष राष्ट्रांचा ज्याप्रमाणें विध्वंस केला, त्याप्रमाणें सत्याग्रही करूं शकत नाहीं. असत्याचें आक्र-

मण झालें असतां त्याचा प्रतिकार म्हणून सत्याग्रहाचा मोर्चा सुरू करतां येतो. सत्याग्रहांत साम्राज्यतृष्णेला किंवा महत्त्वाकांक्षेला अवकाश नसतो. अशी स्थिति असल्यामुळें सत्याग्रह्याचा पक्ष नेहमींच न्यायाचा आणि धर्माचा असतो. ज्याच्या पक्षांत न्याय नाहीं, तो सत्याग्रहाचें हत्यार वापरूं शकणार नाहीं. हिंदुस्थान जपानला जिंकायची इच्छा करील तर त्याला हिंसक आक्रमणाचाच अवलंब करावा लागेल; त्या ठिकाणीं सत्याग्रह होऊं शकणारच नाहीं. अशी स्थिति असल्यामुळें सत्याग्रहाच्या सुरवातीपासूनच सत्याग्रही पक्षाविषयीं लोकांची सहानुभूति सुरू होते आणि त्या सहानुभूतीचा नैतिक आधार सत्याग्रही पक्षाला मिळतो. लोकमताचा पाठिंबा मिळाल्यामुळें सत्याग्रह्यांना आपला प्रयत्न उत्साहानें चालू ठेवण्यासाठीं पुरतें प्रोत्साहन नेहमीं मिळत जातें. याचे उलट हिंसक आक्रमण करणारा पक्ष लोकांच्या दृष्टींतून उतरून जातो. लोकमत त्या पक्षाचा तिरस्कार करूं लागतें आणि त्यामुळें त्या पक्षाचा तेजोवध होऊन याची आक्रमणाची मानसिक शक्ति क्षीण होते. केवढाही मोठा दिग्विजयी वीर असला तरी त्याला लोकमताची परवा केल्यावांचून चालत नाहीं. मी करीत आहें त्याची जगानें वाखाणणी करावी ही भावना त्याच्या मनांत असतेच. म्हणूनच आपल्या सर्व कृत्यांचें समर्थन करण्याचा त्याचा प्रयत्न चालू असतो. उदाहरणार्थ, हिटलर सर्व युरोपला पादाक्रान्त करण्याच्या महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊन असंख्य निर्दोष लोकांवर अनन्वित जुलूम करीत आहे. पण प्रत्येक वेळीं स्वतःच्या अत्याचाराचा बचाव करण्यासाठीं रेडियोवर त्याला भाषणें करावीं लागतात. हीच गोष्ट साऱ्या जुलमी लोकांची असते. त्यांची महत्त्वाकांक्षा, वैभवतृष्णा किंवा साम्राज्यतृष्णा इतकी मोठी असते कीं, लोकमताला मान देऊन तिचा त्याग करण्याची त्यांची तयारी नसते. त्याबरोबरच लोकमताचें दडपण इतकें असतें कीं स्वतःच्या प्रत्येक अत्याचाराचें समर्थन लोकांपुढें केल्याशिवाय त्यांना चालत नाहीं. अशा रीतीनें त्यांच्या मनांत एक मोठा कलह उभा होतो आणि प्रतिपक्षाशीं लढण्यापेक्षां लोकमताशीं लढणें त्यांना जास्त कठीण वाटूं लागतें.

एका बाजूला सत्याग्रह्याच्या पक्षांत न्याय आणि धर्म असून, प्रतिपक्षाच्या केसालाही धक्का न लावतां स्वतः सर्व गोष्टींचा त्याग करून सत्य प्रस्थापित करण्याची त्याची तयारी असते, त्यामुळें त्याचा पक्ष बावनकशी सोन्याप्रमाणें तेजस्वी राहतो आणि लोकमताचें संपूर्ण पाठबळ त्याला मिळतें.

याचे उलट अत्याचारी पक्षांत अन्याय आणि अधर्म असून, निर्दोष प्रतिपक्षावर विनाकारण हत्यार चालवून त्यांचे प्राण घेण्याची दुष्ट वृत्ति सतत प्रकट होत असल्यामुळें लोकमत त्यांचे विरुद्ध प्रक्षुब्ध होतें, आणि तें लोकमत शांत कसें करावयाचे हा प्रश्न मोठा बिकट होऊन बसतो.

लोकमताचे प्राबल्य जसें तसेंच सतें. एकदां का लोकमत संपूर्णपणें प्रक्षुब्ध झालें म्हणजे तें प्रत्यक्ष क्रियाशील बनतें. क्रियाशील लोकमताचा विरोध करणें केवढ्याही मोठ्या अत्याचाऱ्याला अशक्य होतें. १९२८ सालीं बारडोलीच्य शेतकऱ्यांनीं अन्यायी सारावाढीविरुद्ध सत्याग्रहाची मोहीम चालविली. ती मोहीम यशस्वी होण्याला मुख्य कारण लोकमताचा पाठिंबा हेंच होतें. सरकार शेतकऱ्यांकडून सारा वसूल करण्यासाठीं त्यांच्या म्हशी जप्त करीत असे. पण म्हशी कोणी विकत घेईल तेव्हांच साऱ्याची रक्कम वसूल होणार ना? त्या म्हशी नेऊन चावडीच्या समोर बांधून ठेवल्या तरी त्यांना विकत घ्यायला कोणीच तयार होत नसे. उलट त्या म्हशींना खायला घालायचा खर्चच सरकारच्या शिरावर पडत असे! त्यामुळें ज्यांच्या घरून म्हशी जप्त करून आणल्या त्यांच्या घरीं त्या परत बांधून येणें सरकारी अंमलदारांना भाग पडे!

पण हा लोकांनीं केलेला सौम्यसा विरोध झाला. पण लोकमत चांगलेंच प्रक्षुब्ध झालें तर अत्याचारी पक्षाचा संपूर्ण बहिष्कार करण्याला तें प्रेरित होतें आणि अशा बहिष्कारापुढें टिकून राहण्याची शक्ति कोणाही अत्याचाऱ्यांत असूं शकत नाहीं. ज्या भूमीवर उभे राहून ते लढणार, त्या भूमींत राहणाऱ्या प्रजेच्या सहकाराशिवाय त्यांना तेथें राहणेंही शक्य होणार नाहीं, मग लढणें दूरच राहिलें. म्हणून लोकमत प्रक्षुब्ध करून सत्याग्रह्यांविरुद्ध लढणें अत्याचारी पक्षाला अशक्य होऊन जातें.

हृदयपरिवर्तनाला पोषक असें तिसरें तत्त्व म्हणजे नैतिक शक्ति. अत्याचाऱ्याला स्वत:लाच माहीत असतें कीं स्वत:चा पक्ष अन्यायाचा आहे. स्वार्थांध होऊन या गोष्टीचा त्याला विसर पडणें शक्य असतें. पण प्रतिपक्षांतील लोक शांत रीतीनें विरोध करीत असतात असें पाहून त्याच्या मनांत प्रश्न उद्भवतो, “काय हे लोक मूर्ख आहेत? लढतही नाहींत, आणि फुकट मार खातात!” पण या प्रश्नाचें उत्तर शोधण्याच्या प्रयत्नांतच त्याला कळून येतें कीं, प्रतिपक्षी न्यायाच्या रक्षणासाठीं सर्व सहन करीत आहे आणि त्याला तावडतोब हेंही कळतें कीं, स्वत:चा पक्ष अन्यायाचा आहे. ही जागृति झाल्याबरोबर त्याच्या

लढण्याचा नैतिक पाया ढासळून पडतो आणि लढण्याचा उत्साह नाहींसा होतो. एकदां का उत्साह नाहींसा झाला कीं मग लढाई चालू ठेवणें त्याला कठीण होऊन जातें. आणि मग हळू हळू लढाईची उग्रता कमी करीत जाऊन तहाची भाषा तो बोलूं लागतो.

हृदयपरिवर्तनाला पोषक असें चवथें तत्त्व म्हणजे सत्याग्रही आपल्यावर जें दुःख ओढून घेतो तें. निर्दोष आत्म्याचें दुःख पाहून चित्त द्रवणार नाहीं असा मनुष्य विरळा. हिटलरसारखा भयंकर महत्त्वाकांक्षी नेता असला तरी त्याचे सैन्यांतील सैनिक सामान्य माणसेंच असतात. हिटलर विशिष्ट प्रकारच्या दुष्ट वासनांनीं घडलेला आहे असें मानिलें, तरी त्याचे सर्व सैनिक त्याच दुष्टतेनें घडलेले नसतात. ते इतर लोकांप्रमाणेंच सर्वसामान्य नागरिक असतात. त्यांना रागद्वेष असतात, त्यांचेंमध्यें दयाही असते. सामान्य माणसांत आढळून येणारा मनुष्यजातीविषयींचा प्रेमभावही त्यांच्यांत असतो. त्यामुळें त्यांचेकडून ज्यांच्यावर अत्याचार होतो, ते लोक अत्याचाराचा प्रतिकार अत्याचारानें न करतां शांतपणें दुःख सहन करून करतात हें पाहून त्या अत्याचारी सैनिकांना त्यांची दया येते आणि दया उत्पन्न झाली कीं अत्याचाराचें हत्यार निर्बल होऊन जातें. ही दया उत्पन्न होण्याची क्रिया सर्वच सैनिकांत एकाच वेळीं होत नाहीं. जे ज्यास्त सदय असतील त्यांच्यांत लवकर होते आणि बाकीच्यांत उशीरां. ज्यांच्यांत दयावृत्ति लवकर जागते ते आपल्या दयावृत्तीचा संसर्ग दुसऱ्यांनाही करवून देतात आणि हळू हळू दुसऱ्यांच्या मनांतही दयावृत्ति उत्पन्न होते. अशा रीतीनें साऱ्या लष्करांत दयावृत्ति जागृत झाली म्हणजे सर्व लष्कर हत्यारें खालीं ठेवतें आणि मग केवढाही भयंकर सेनापति असला तरी तो हतबल होऊन जातो आणि त्याला सत्याग्रह्यांशीं सामोपचाराच्या गोष्टी कराव्या लागतात.

या सर्व प्रक्रियांचा परिणाम म्हणून जो घडतो त्याचेंच नांव हृदयपरिवर्तन. हें हृदयपरिवर्तन झालेंच पाहिजे ही गोष्ट मनुष्यस्वभावाचा ज्याला परिचय आहे, त्याला सहज पटण्यासारखी आहे. आतांपर्यंत सत्याग्रहाचे अनेक मोर्चे झाले त्यांत अशा हृदयपरिवर्तनाचीं अनेक उदाहरणें सांपडतील. परदेशी सत्तेच्या विरुद्ध देशांत ज्या सत्याग्रही मोहिमी झाल्या त्यांत परदेशी शासकांचें हृदयपरिवर्तन झालेलें आढळून येत नाहीं, ही गोष्ट खरी. पण त्याचें कारण सत्याग्रह आणि हृदयपरिवर्तन यांचा परस्पर संबंध खोटा आहे हें नसून, सत्याग्रहाच्या मात्रेची क्षति

हें आहे. सत्याग्रहाचें अत्यंत शुद्ध स्वरूप अद्याप कधीं अमलांत आलेंच नाहीं. सत्याग्रहाचे जे प्रयोग झाले ते अगदीं प्राथमिक स्वरूपाचे आणि सत्यविरोधी तत्त्वांनीं भरलेले असे होते. सत्याग्रहाच्या शुद्धतेमध्येंच सदोषता असल्यामुळें कल्पित परिणाम येऊं शकला नाहीं. अनुभवानें राष्ट्र सत्याग्रहाचें खरें स्वरूप समजून घेऊन त्याचें प्रत्यक्ष आचरण करील तेव्हां प्रतिपक्षाचें हृदयपरिवर्तन झाल्याशिवाय राहणार नाहीं. पण त्याला वेळ हा लागणारच. जगांतील रूढ प्रणाली काढून टाकून तिच्या जागीं सत्याग्रहाची नवी प्रणाली प्रस्थापित करण्यासाठीं पुरती शक्ति, शुद्धि आणि वेळ लागणारच. एवढ्या अल्पकालीन अनुभवावरून आणि सत्याग्रहाचा प्रयोग अगदीं प्राथमिक स्वरूपांत असतांना हृदयपरिवर्तनाचा सिद्धान्त चुकीचा आहे, असा आरोप करण्यांत शास्त्रीय विचारसरणीचा संपूर्ण अभाव आढळून येतो.

# ६ गीता आणि अहिंसा

आक्षेपः—गांधी गीतेला आधारभूत ग्रंथ समजतात, आणि गीतेचा सारा डोलारा अर्जुनाला हिंसक युद्धाला तयार करण्यासाठीं उभारला गेला आहे. म्हणून गांधींची अहिंसा गीतेच्या शिकवणुकीला विरोधी आहे.

उत्तरः—समाजवाद, नाझीवाद, गांधीवाद वगैरे समाजरचनेच्या विचारसरणींचा विचार करतांना धर्मग्रंथांचा आधार शोधणें कितपत योग्य आहे, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. मनुष्याची विचारशक्ति आणि प्रत्यक्ष प्रयोगान्तीं मिळणारा अनुभव यांवरूनच कोणत्याही विचारसरणीची कसोटी करायला पाहिजे. गांधीवादाला गीतेंत आधार मिळाला नाहीं, म्हणून तो चुकीचा ठरूं शकत नाहीं. बायबलच्या सिद्धान्तांना हिब्रू धर्मशास्त्रांत आधार मिळत नाहीं म्हणून तो सिद्धान्त युक्तिसंगत नाहीं असें कसें म्हणतां येईल? बुद्ध धर्माच्या सिद्धान्ताला वेदांत आधार सांपडत नाहीं, म्हणून तो सिद्धांत चुकीचा आहे ही विचारसरणी वेदप्रामाण्याला प्रमुख स्थान देणाऱ्या सनातनी पंडितांत क्षम्य ठरेल. पण शास्त्रीय दृष्टीनें विचार करून कोठल्याही विचारसरणीची युक्तायुक्तता ठरवितेवेळीं ही प्रामाण्यबुद्धि कामाची नाहीं.

म्हणून गीतेंत गांधींची अहिंसा आहे किंवा नाहीं हा प्रश्न फारसा महत्त्वाचा नाहीं. गीतेंत असलेली प्रत्येक विचारसरणी आजच्या जगांत व्यवहार्य किंवा योग्य ठरेल असें ज्याप्रमाणें नाहीं, त्याचप्रमाणें गीतेंत नसलेली विचारसरणी चुकीचीच ठरेल असेंही नाहीं. एकदां एका शास्त्र्यांना त्यांच्या मित्रानें विचारलें, " शास्त्रीबुवा, चहासारखें अनिष्ट पेय आपण पितां हें कसें ? " शास्त्रीबुवांनीं गंभीरपणें उत्तर दिलें, " अहो चहा निषिद्ध नाहींच मुळीं. मनु, याज्ञवल्क्य, पराशर वगैरे कोणत्याही स्मृतींत चहाचा निषेध नाहीं. मग प्यायला काय हरकत आहे ? " ही अंधश्रद्धेची दृष्टि शास्त्रीय विचारसरणींत कामाची नाहीं.

भगवद्गीता लिहिली गेल्याला किती तरी वर्षें झालीं. या सर्व वर्षांत जगाचें तत्त्वज्ञान किंवा जगाची विचारसरणी पुढें वाढलीच नाहीं किंवा वाढणें शक्य नाहीं, ही कल्पना चुकीची आहे. खरें पाहिलें तर संस्कृतीच्या विकासाबरोबरच तत्त्वज्ञानाचा विकास होत असतो. मागच्या संस्कृतीच्या पायावर नव्या संस्कृतीची रचना होत असते, त्याचप्रमाणें मागच्या तत्त्वज्ञानाच्या विचारांच्या पायावर नव्या तत्त्वज्ञानाची रचना होते. अहिंसेचा सिद्धान्त सामान्यपणें प्राचीन विचारकांनीं स्वीकारला होताच. त्या सिद्धान्ताच्या अंगोपांगाचा विकास हळू हळू होत गेला. ख्रिस्ती धर्म, बुद्ध धर्म आणि जैन धर्म यांनीं अहिंसेच्या सिद्धान्तांवर पुष्कळच भर दिला आणि त्या सिद्धान्ताला प्रत्यक्ष व्यवहारांत—व्यक्तिजीवनाच्या सामान्य व्यवहारांत—आणण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्याच्यावर अनेक प्रयोग होऊन गांधीवादांत निदर्शित केलेल्या अहिंसेच्या स्वरूपाचा उदय झाला.

भगवद्गीतेंत गांधींनीं प्रतिपादलेल्या अहिंसेचें विवरण नाहीं, यांत शंका नाहीं. तें त्यांत नाहीं याबद्दल आश्चर्यही करण्याचें कारण नाहीं. ज्याप्रमाणें भौतिक विज्ञानांत नवे नवे शोध होऊन तें शास्त्र पुढें वाढलें आहे, त्याचप्रमाणें सामाजिक आणि आध्यात्मिक बाबतींतही नवे नवे शोध होऊन त्यांतही विचारांची प्रगति झाली आहे. पण भगवद्गीतेंत अर्जुनाला हिंसक युद्धाला प्रवृत्त करण्याचा प्रयत्न आहे, म्हणून भगवद्गीता हिंसक युद्धाचें समर्थन करीत आहे हा तर्कवाद सिद्ध होऊं शकत नाहीं. तें कसें तें आपण पाहूं या.

गांधींनीं विशिष्ट परिस्थितींत सशस्त्र प्रतिकाराचा उपदेश दिला ह्यावरून गांधी हिंसावादी आहेत, हें म्हणणें जसें चुकीचें आहे असें आपण पाहिलें,

तद्वतच अर्जुनाला लढण्याला प्रवृत्त करण्याचा प्रयत्न श्रीकृष्णांनीं केला यावरून श्रीकृष्ण किंवा भगवद्गीता हिंसावादी आहे हें म्हणणेंही चुकीचें आहे. ज्या गीतेंत अहिंसेचे गोडवे अनेक ठिकाणीं गाइले आहेत, अहिंसेला अनुबद्ध असलेल्या गुणांच्या विकासाला ज्या गीतेंत फारच महत्त्व दिलें आहे, तीच गीता हिंसेचा प्रचार करील, हें म्हणणें युक्तिसंगत नाहीं. असें असेल तर गीता शास्त्रीय ग्रन्थ होण्याला योग्य राहणार नाहीं. पण खरें पाहिलें असतां गीतेंत हिंसेची तरफदारी केलेलीच नाहीं. महाभारतकार व्यास यांचें युद्धाविषयींचें मत युद्धोत्तर परिस्थितीचें त्यांनीं जें चित्र रेखाटलें आहे, त्यावरून स्पष्ट होतें. त्यावरून स्पष्ट दिसून येतें कीं श्री व्यास हिंसक युद्धाच्या विरुद्ध होते. स्वतः श्रीकृष्णांनीं हातांत शस्त्र न घेण्याची प्रतिज्ञा केली होती यांतही त्यांची स्वतःची महाभारत युद्धांतील वृत्ति स्पष्ट होते. असें असतां श्रीकृष्णांनीं अर्जुनाला युद्धाला प्रवृत्त कां केलें, हा प्रश्न विचारार्ह होतो.

ज्याप्रमाणें अहिंसक प्रतिकाराला असमर्थ असलेल्या लोकांना भ्याडपणाचे जागीं सशस्त्र प्रतिकार करण्याचा सल्ला गांधींनीं दिला आहे, तशाच परिस्थितींत श्रीकृष्णांनीं अर्जुनाला सशस्त्र प्रतिकाराचा सल्ला दिला आहे. विचार केला तर आपल्याला आढळून येतें कीं अर्जुन युद्धाला विरुद्ध नव्हता; उलट क्षत्रिय म्हणून युद्ध करणें हा आपला धर्म आहे असें तो समजत होता. म्हणजे अर्जुनानें धनुष्यबाण खालीं टाकून मी लढणार नाहीं असें श्रीकृष्णाला सांगितलें याचें कारण त्याचे मनांत अहिंसावृत्ति जागृत झाली आणि हिंसक युद्धाचें वैयर्थ्य त्याला पटल्यामुळें त्यानें युद्ध करण्याचें नाकारलें, हें नव्हे. पण हिंसक युद्धाला क्षत्रियाचें कर्तव्य मानीत असूनहि अर्जुन युद्धापासून पराङ्मुख झाला याचें कारण विशिष्ट परिस्थितींत विशिष्ट प्रतिपक्षाशीं त्याला लढायचें नव्हतें. त्याचे समोर लढण्यासाठीं आजोबा, गुरु, भाऊ, मित्र, काके, मामे आले नसते तर तो अवश्य लढला असता. अर्जुनानें पहिल्या अध्यायांत आपल्या न लढण्याच्या समर्थनांत जीं कारणें दिलीं आहेत त्यांवरून हीच गोष्ट सिद्ध होते.

म्हणजे स्वकीय गणले जाणाऱ्या लोकांशीं लढण्यालाच अर्जुनाचा विरोध होता. श्रीकृष्णांनीं या विरोधाच्या मुळाशीं असलेला व्यामोह पाहिला आणि तो व्यामोह काढून टाकून त्याला त्याच्या कर्तव्याचें भान करवून दिलें. अर्जुन ज्या भूमिकेवर होता त्या भूमिकेवर त्याचें कर्तव्य काय होतें तें श्रीकृष्णांनीं

सांगितलें. महाभारत-युद्धाचे बाबतींतील श्रीकृष्णांचें धोरण महाभारतावरून स्पष्ट दिसतें. सुरवातीला सामोपचारासाठीं श्रीकृष्णच गेले आणि शेवटीं कांहीं नाहीं तर पांच पांडवांना पांच गांव तरी द्यावे अशी विनंति त्यांनीं दुर्योधनाला केली. याला उत्तर म्हणून दुर्योधनानें सुईच्या टोंकावर राहील इतकी मातीही देण्याचें नाकारलें ! तेव्हांच नाइलाजास्तव श्रीकृष्णानें युद्धाला संमति दिली. त्या वेळच्या क्षत्रिय समाजाला हिंसक युद्धाशिवाय दुसरें साधन माहीत नव्हतें, म्हणून पांडव हिंसक युद्धाला सिद्ध झाले. अशा परिस्थितींत मोहानें अर्जुन भ्याड बनला तेव्हां त्याला भ्याड न बनण्याचा उपदेश श्रीकृष्णांनीं केला, यांत अयोग्य तें काय? त्या वेळीं कृष्णाच्या जागी गांधी असते तर त्यांनींही अर्जुनाला तसाच उपदेश केला असता, हें त्यांनीं सशस्त्र प्रतिकाराचा सल्ला विशिष्ट परिस्थितींत दिला आहे, यावरून सिद्ध होतें.

सारांशरूपानें सांगावयाचें म्हणजे, गीतेंत गांधींची अहिंसा नसली तरी त्यावरून ती अहिंसा खोटी ठरत नाहीं. पण गीतेंत श्रीकृष्णांनीं हिंसक प्रतिकाराची तरफदारी केली आहे असेंही सिद्ध होत नाहीं. गीतेंत व्यामोहांत सांपडलेल्या अर्जुनाला मोहांतून मुक्त करण्याचा प्रयत्न असून तो विचाराच्या ज्या पायरीवर आहे त्या पायरीवर त्याचें कर्तव्य काय आहे हें त्याला सांगितलें. अहिंसेच्या बाबतींत गीतेचा अभिप्राय स्पष्ट असून तो अहिंसेचें समर्थनच करितो. यावरून गांधी ज्या गीतेला आधारभूत ग्रंथ मानतात ती गीता त्यांच्या विचारसरणीला—अहिंसेच्या विचारसरणीला—विरोधी नसून अनुकूल आहे असें म्हणावें लागतें.

श्री भगवद्गीतेविषयीं एका निराळ्याच दृष्टीनें विचार करतां येईल. युद्धाचे मोर्चे मांडले गेले असतांना, एक दोन तासांच्या अवधींत भगवद्गीतेसारखें गहन तत्त्वज्ञान युद्धभूमीवर श्रीकृष्णांनीं अर्जुनाला सांगितलें असेल हें संभवत नाहीं. श्री व्यास कवि होते. काव्यरूपानें जीवनाचें तत्त्वज्ञान त्यांना जगापुढें मांडावयाचें होतें. म्हणून त्या तत्त्वज्ञानाची भूमिकाही त्यांनीं अत्यंत काव्यमय घेतली. अर्जुनाचा व्यामोह आणि श्रीकृष्णांनीं त्याची घातलेली समजूत हा महत्त्वाचा प्रसंग पाहून त्याचे आसपास त्यांनीं भगवद्गीतेचें अमर तत्त्वज्ञान उभारलें आणि जगाला एक श्रेष्ठ काव्यग्रंथ दिला. तेव्हां या ग्रंथांत वेळोवेळीं "तूं युद्ध कर", "तूं युद्धाला तयार हो" वगैरे जीं वचनें घातलीं आहेत तीं काव्यपूर्तीसाठीं असून भगवद्गीतेचें मुख्य तत्त्वज्ञान शमप्रधान

कर्मयोगाचेंच आहे. युद्धभूमीची भूमिका कल्पिली म्हणून मध्यें मध्यें युद्धाला तयार होण्याविषयींचीं वचनें श्री व्यासांनीं घातलीं आहेत. गीतेचा मुख्य बोध तो नव्हे. तो तसा असता तर गीतेच्या दुसऱ्या अध्यायाच्या पूर्वार्धातच युद्धाविषयींचा सारा युक्तिवाद पुरा झाला आहे तेथेंच भगवद्गीता पुरी झाली असती. पण यानंतर जो विस्तार केला आहे त्याचा अर्जुनाच्या लढण्याशीं अर्थाअर्थी कांहींच संबंध नाहीं. गीतेचा मुख्य विषय 'अर्जुनाला लढायला प्रवृत्त करावयाचें' हा नसून, 'जीवनाचें अमर तत्त्वज्ञान सांगावयाचें' हा आहे.

आणखीही एका दृष्टीनें या प्रश्नाकडे आपल्याला पाहतां येईल. सर्व महाभारताचें युद्धाचें रूपक बनवून व्यासांनीं भगवद्गीतेची भूमिका तयार केली आहे. "धर्मक्षेत्र" म्हणजे माणसाचें हृदय—जेथें धर्मभावनेचा उदय आणि विकास होतो. तेंच "कुरुक्षेत्र" म्हणजे कर्मक्षेत्र—जेथें अनेक कर्माकर्मांचा निर्णय होतो. या धर्मक्षेत्र-कुरुक्षेत्रांत एकत्र झालेले "मामक" आणि "पांडव" म्हणजे "प्रेय-वृत्ति" आणि "श्रेय-वृत्ति" "युयुत्सु" म्हणजे लढण्याला प्रवृत्त आहेत. "त्या वृत्तींचें काय होतें?" असा प्रश्न पहिल्याच श्लोकांत उत्पन्न करून त्याचें उत्तर म्हणून समग्र भगवद्गीता सांगितली आहे. याचा अर्थ असा कीं जीवनांत सद् आणि असद् वृत्तींचा जो अखण्ड कलह चाललेला असतो त्यांत यशस्वी रीतीनें लढून सद्वृत्तींना असद्वृत्तींवर विजय मिळवून देण्याचा मार्ग गीतेनें दाखविला आहे.

यापैकीं कोणत्याही दृष्टीनें विचार केला तरी गीता गांधींच्या शिकवणुकीला विरोध करीत नाहीं, हें सिद्ध होतें. गांधींची शिकवणूक तादृश स्वरूपांत गीतेंत असणें संभवतच नाहीं. तेव्हां ती तशी नाहीं, असें म्हणण्यांत विशेष कांहींच नाहीं. गांधी गीतेला प्रमाणग्रन्थ मानतात आणि ही त्यांची प्रामाण्यबुद्धि अहिंसेच्या त्यांच्या प्रतिपादनाला विरोधी नाहीं, ही गोष्ट अत्यंत स्पष्ट आहे. या दृष्टीनें विचार केला तर आक्षेपकांचें समाधान झाल्यावांचून राहणार नाहीं.

# ७ सत्याचा आग्रह कां ?

**आक्षेपः—**असत्य आणि कपटानें भरलेल्या या जगांत सत्यानें वागणाऱ्या मनुष्याचें भौतिक कल्याण कधींच होणार नाहीं. बहुजनसमाज सत्याचें पालन करील हें संभवत नाहीं. म्हणून गांधी-

वादानें सत्यावर जो भार दिला आहे, तो निरर्थक आहे.

**उत्तरः—** वस्तुस्थितीचें खरें पृथक्करण करतां न आल्यामुळें हा आक्षेप करण्यांत येतो. जगांत सर्वत्र असत्य आणि कपट आढळून येतें, ही गोष्ट खरी. तसेंच असत्य आणि कपट या दोहोंचा आश्रय घेऊन अनेक लोक आपलें भौतिक वैभव वाढवूं शकतात हेंही खरें आहे. पण तेवढ्यानें सत्यावर जो भार दिला आहे तो निरर्थक आहे हें कसें सिद्ध होतें?

गांधीवादाचा संबंध व्यक्तिजीवनाशीं तर आहेच, पण त्याहूनही जास्त समाजजीवनाशीं आहे. आजची समाजरचना विषम आहे. मूठभर लोक आपल्या बुद्धिबलाच्या, सत्तेच्या किंवा संपत्तीच्या जोरावर असंख्य लोकांना लुटीत आहेत, त्यांचेवर जुलूम करीत आहेत, त्यांचा अतिशय फायदा घेत आहेत. ही विषम समाजरचना नाहींशी झाल्याशिवाय जगांत सुख आणि शांति स्थापन होऊं शकणार नाहीं या बाबतींत कोणाचाही मतभेद नाहीं. पण ही विषमता नाहींशी कशी करावयाची?

ही नाहींशी करण्यासाठीं समाजवादाची तेजस्वी विचारसरणी आज जगांत विजयानें वावरत आहे. भांडवलशाही या सर्व विषमतेच्या मुळाशीं आहे हें, समाजवादाचें निदान आणि भांडवलशाही नाहींशी करणें हें त्याचें उद्दिष्ट. येथपर्यंत समाजवाद आणि गांधीवाद सहमत आहेत. पण भांडवल-शाही कशी नाहींशी करावयाची या बाबतींत दोन्ही विचारसरणींत फरक आहे.

गांधीवादानें सत्याचा निकष आपल्यापुढें ठेवला आहे. सत्याचा आग्रह बाळगला कीं सामाजिक विषमता आपोआपच नाहींशी होणार, हें गांधी-वादाचें सूत्र ( Formula ) आहे आणि जरासा खोल विचार करून पाहिलें तर सर्वांनाच या सूत्राचें सत्यत्व पटेल.

भांडवलशाही, जुलूम, फसवेगिरी या सर्व गोष्टी एकमेकांशीं संबद्ध आहेत—नव्हे एकाच वृत्तीचीं निरनिराळीं स्वरूपें आहेत. असत्याचा आश्रय केल्याशिवाय यांतील एकाही वृत्तीला पोषण मिळणें शक्य नाहीं. काबाडकष्ट करणाऱ्या मजूरांना कमींत कमी मोबदला देऊन त्यांचेकडून जास्तींत जास्त काम करवून घ्यावयाचें आणि त्यांतून स्वतः मातबर बनावयाचें हा भांडवलशाहीचा क्रम आहे. पण जेथें सत्य हें सामाजिक संबंधांचें मूलभूत तत्त्व म्हणून स्वीकारलें जातें तेथें ही वृत्ति टिकूं शकत नाहीं. दुसऱ्याला त्याच्या मेहनतीचा योग्य तो मोबदला दिलाच पाहिजे हा आग्रह सत्यनिष्ठेंत आपोआपच येतो आणि भांड

वलशाहीला अवकाश राहत नाहीं. जेथें सत्याचा आग्रह आहे तेथें अन्यायाची वृत्ति येऊंच शकत नाहीं; कारण कीं अन्यायाची सर्व इमारत असत्यावरच उभारलेली असते. सत्याचा आग्रह असला म्हणजे दुसऱ्याला फसविण्याची वृत्तिही होऊं शकत नाहीं; कारण कीं फसविणें हा असत्याचाच एक प्रकार आहे.

म्हणजे समाजवाद भांडवलशाहीचा नाश करून जी समाजरचना करूं पाहतो, ती सत्याचा आश्रय घेतल्यावांचून येणें शक्य नाहीं. किंबहुना समाजवादाच्या विचारसरणीचें आधारभूत तत्त्वच सत्य आहे. आतां प्रत्यक्ष व्यवहारांत असत्याचा आश्रय घेतल्यानें विशिष्ट व्यक्तीची किंवा व्यक्तिसमूहाची आर्थिक आबादी झालेली आपल्याला दिसून आली, तरी तिला फारसें महत्त्व नाहीं. कारण कीं जेव्हां आपण समाजरचनेचा विचार करितों तेव्हां व्यक्तीचा विचार आपल्याला करतां येत नाहीं. त्याबरोबरच जी आबादी आपल्याला दिसते ती चिरस्थायी आहे कीं नाहीं, हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. असत्य किंवा फसवेगिरीच्या जोरावर प्राप्त झालेली आबादी किती वेळ टिकेल, हा प्रश्नही विचारांत घेतला पाहिजे. तसेंच ही व्यक्ति किंवा व्यक्तिसमूहाची आबादी सर्व समाजाला उपकारक आहे कीं नाहीं हाही प्रश्न महत्त्वाचा आहे. इंग्लिशमध्यें एक सुंदर वचन आहे. "तुम्ही कांहीं लोकांना सर्व वेळ फसवूं शकाल, किंवा सर्व लोकांना कांहीं वेळ फसवूं शकाल, पण सर्वच लोकांना सर्व वेळ फसविणें अशक्य आहे." हें वचन अगदीं खरें आहे. म्हणूनच दुसऱ्यांना फसविणारे व्यापारी आपापसांत फारच प्रामाणिक असतात. व्यापार म्हणजे फसवेगिरी असें मानिलें जातें. पण एक व्यापारी दुसऱ्या व्यापाऱ्याशीं जे सौदे करतो ते शब्दाचेच असतात, त्याला कोणी साक्षीही नसतो. असें असूनही कितीही नुकसान झालें तरी व्यापारी आपल्या शब्दाला जागतो, असें आढळून येतें. याचें कारण इतरेजनांशीं चाललेल्या व्यवहारांत असत्यानें क्षणिक लाभ करून घेतां आला, तरी ज्यांच्याशीं कायमचा व्यवहार करावयाचा त्यांचेशीं सत्यानें वागल्यानेंच आपली प्रगति होऊं शकते हा व्यापाऱ्याचा अनुभवसिद्ध विश्वास असतो.

जेव्हां आपण समग्र समाजरचनेचा विचार करतों तेव्हां जास्तींत जास्त लोकांच्या जास्तींत जास्त सुखाचा विचार आपल्याला करायचा असतो. असत्य आणि फसवेगिरीमुळें कमींत कमी लोकांचें भौतिक सुख प्राप्त होऊं शकेल, पण त्यामुळें जास्तींत जास्त लोक जास्तींत जास्त दुःखी होतील. म्हणून तो मार्ग कोठल्याही समाजरचनेंत विचारार्ह ठरत नाहीं.

आज समाज असत्यानें भरला आहे ही गोष्ट खरी आहे आणि तो तसा आहे म्हणूनच समाजाची विषम परिस्थिति आहे. राजा युधिष्ठिराच्या कारकीर्दीत एका शेतकऱ्यानें एका ब्राह्मणाला एक शेत दान दिलें. तें शेत नांगरत असतां शेतांत पुरलेला मोहरांनीं भरलेला हंडा ब्राह्मणाला सांपडला. तो हंडा घेऊन ब्राह्मण शेतकऱ्याकडे गेला आणि त्याला म्हणाला, " बाबा, तूं मला शेत दिलेंस, पण हा हंडा दिला नाहींस. म्हणून तूं तुझा हंडा परत घे. " शेतकरी म्हणाला, " शेत दिलें त्याचेबरोबरच शेतांतील सर्व वस्तुही दिल्या. म्हणून हा हंडा तुझाच आहे. तो तूं ठेव. " दोघेही ऐकेनात. शेवटीं दोघेही युधिष्ठिराकडे न्यायासाठीं गेले. युधिष्ठिर गोंधळून गेला आणि शेवटीं 'तो हंडा दोघांनीही न घेतां सार्वजनिक कार्यासाठीं वापरावा' असा निर्णय त्याला द्यावा लागला.

ही गोष्ट खरी असो किंवा दंतकथा असो, या गोष्टींत एका आदर्श समाजाचें चित्र रेखाटलें आहे. गांधीवाद अशा समाजाची स्थापना करूं इच्छितो. असा समाज कधींही स्थापन होऊं शकणार नाहीं असें म्हणणें यांत ध्येयवादाची पामरता दिसून येते. स्वार्थी व्यापारांत जे व्यापारी अन्यायानें किंवा असत्यानें पैसे मिळवतात, तेच व्यापारी जेव्हां कोठल्याही सार्वजनिक फंडाचे खजाननीस होतात, तेव्हां त्या द्रव्यनिधींतील प्रत्येक पैचा व्यवहार अगदीं प्रामाणिकपणें करूं शकतात. एका व्यवहारांत ज्यांना प्रामाणिकपणें वागतां येतें त्यांना दुसऱ्या सर्वच व्यवहारांत वागतां येणार नाहीं, असें नाहीं.

दुसरें, असत्याच्या जोरावर माणसाची चिरंतन भौतिक आबादी होते, हेंही खरें नाहीं. ज्या व्यापारी संस्था पुष्कळ वर्षांपासून चालत आल्या आहेत, त्यांची प्रामाणिकपणाबद्दल ख्याति असते. कांहीं दुकानें अशीं असतात कीं, त्यांचेकडे लहान मूलही गेलें तरी त्याला फसविल्यावांचून व्यवहार केला जातो. असे प्रामाणिक व्यापारीच समाजाच्या विश्वासाला आणि आदराला पात्र होतात आणि त्यांचेंच दीर्घकालीन आर्थिक कल्याण होऊं शकतें.

गांधीवादाच्या सिद्धान्तांना अनुसरून दोन मोठ्या व्यापारी संस्था आज देशांत चालू आहेत. एक " अखिल-भारत चर्खा संघ " आणि दुसरी " अखिल-भारत ग्रामोद्योग संघ. " या दोन्ही संस्था शंभर टक्के प्रामाणिक आहेत असें आपण पाहतों. कोठेंही फसवेगिरीचा आधार घेतल्याशिवाय या दोन्ही संस्था इतका मोठा व्यापार करूं शकतात, इतकेंच नव्हे तर पुष्कळसा

नफाही मिळवूं शकतात. नफा मिळवूनही या संस्था जनहिताला पोषक होऊं शकतात. या दोन संस्थांच्या बाबतींत जें होऊं शकतें, तें सर्व समाजरचनेंत कां न व्हावें ? जगाचा सर्वच व्यापार या तत्त्वावर कां न चालावा ? मजुराला योग्य मजुरी देऊन व्यापाऱ्यांनाही योग्य फायदा कां घेतां येऊं नये ? आणि अशा प्रकारची व्यापाराची प्रणाली स्थापित करून श्रीमंतांकडून गरीबांचें जें शोषण होत आहे तें थांबवतां कां येऊं नये ?

हें सर्व कांहीं शक्य आहे आणि तें शक्य करण्याचा एकच मार्ग आहे व तो सत्याचा. जगांतील सर्व धर्मशास्त्रांनीं सत्याचे गोडवे गायिले आहेत, ते कांहीं विचार केल्यावांचून नव्हे. सत्य आध्यात्मिक उन्नतीसाठींच आवश्यक आहे आणि भौतिक उन्नतीचें पोषक तत्त्व असत्य आहे ही कल्पना वेडेपणाची आहे. जगांत माणसें एकमेकांशीं सत्यानें चालतात, म्हणूनच सारे व्यवहार सुरळीत चालतात. किंबहुना जेथें जेथें सत्याचे व्यवहार होतात, तेथें तेथेंच ते सुरळीत चालतात, इतरत्र नाहीं, हें आपल्याला पदोपदीं पाहायला मिळतें. म्हणूनच एक सिद्धान्त किंवा जीवनाचा आदर्श म्हणूनच नव्हे, तर जीवनाचें व्यावहारिक धोरण म्हणूनही प्रामाणिकपणा सर्वोच्च आहे. ही गोष्ट अत्यंत व्यवहारकुशल माणसांनीही स्वीकारली आहे.

गांधीवाद असो किंवा दुसरा कोणताही वाद असो, ज्याचे उद्दिष्ट समता आणि न्यायाच्या तत्त्वावर नव्या समाजाची रचना करण्याचें आहे, त्याला त्या समाजरचनेचें आदिसूत्र म्हणून सत्याचाच स्वीकार केला पाहिजे.

## ८ अहिंसा निष्फळ झाली आहे ?

**आक्षेपः—** अहिंसेचें तत्त्व आजपर्यंत अनेकांनीं प्रतिपादिलें आहे, पण तें कधींच यशस्वी झालें नाहीं. बुद्ध, महावीर, ख्रिस्त यांसारख्या महात्म्यांनीं अहिंसेचा उपदेश आणि प्रचार केला, पण तेही जगांतून हिंसा किंवा युद्ध नाहींसें करूं शकले नाहींत. मग बिचारा गांधीवाद काय करूं शकणार ?

**उत्तरः—** हा आक्षेप सकृद्दर्शनीं खरा वाटतो, पण तो तसा नाहीं. बुद्ध, महावीर, ख्रिस्त यांसारख्या महात्म्यांनीं अहिंसेचा जो प्रचार केला त्याची भूमिका आणि त्याचें उद्दिष्ट निराळें होतें. या तीनही

महात्म्यांनीं व्यक्तिजीवनाच्या विकासाच्या दृष्टीनें या तत्त्वाचा विचार केला आहे. बुद्धानें दुःखनिर्मुक्तीसाठीं निर्वाण सिद्ध केलें, ख्रिस्तानें मनुष्यजीवनांत स्वर्गाचें राज्य आणण्याचा मार्ग दाखविला, महावीरानें कर्मबंधनांतून मोक्ष प्राप्त करण्याचा आदर्श मनुष्यापुढें ठेवला. पण या सर्वांत व्यक्तिजीवनाचा विचार आहे. धर्मपालन करावयाचें तें व्यक्तीच्या मोक्षासाठीं, व्यक्तीच्या चिरंतन सुखासाठीं, निर्वाणाच्या आनंदासाठीं. या तीन्ही महात्म्यांनीं दाखविलेल्या मार्गानें चालून अनेक सामान्य व्यक्ति मानवी जीवनाच्या सर्वोच्च विकासस्थितीला पोहोंचल्या आहेत. तीन्ही धर्मांत असे साधु होऊन गेले आणि आजही आहेत कीं ज्यांनीं आपलें जीवन अत्यंत उन्नत बनविलें आहे.

या तीन्ही धर्मांत अहिंसेला प्रथम स्थान आहे, पण ती अहिंसा आध्यात्मिक व्यक्तिजीवनाचे दृष्टीनें लोकांपुढें मांडली आहे. अहिंसासिद्धीसाठीं व्यक्तीनें काय खावें आणि काय खाऊं नये, कसें चालावें, कसें बोलावें वगैरे बाबतींत सविस्तर नियम या धर्मांनीं घालून दिले आहेत. पण एका समाजानें दुसऱ्या समाजाशीं कशा प्रकारें वागावें, याचा विचार या महात्म्यांनीं केला असावा असें दिसत नाहीं. म्हणूनच ख्रिस्ती धर्माच्या प्रचारासाठीं क्रूसेड्स-सारखें दीर्घकालीन युद्ध ख्रिस्ती राष्ट्रांनीं चालविलें आणि तेंही धर्मगुरूंच्या प्रत्यक्ष प्रेरणेनें! जर ख्रिस्ती धर्मांत सामाजिक अहिंसेचा विचार केला गेला असता, तर हिंसक युद्धाला कधींच अवकाश मिळाला नसता.

या तीन्ही धर्मांची दृष्टि याप्रमाणें व्यक्तिजीवनापुरतीच मुख्यतः असल्या-मुळें समाज किंवा राष्ट्रं यांच्यांत हितसंबंधाचे कलह किंवा स्वार्थाचे संघर्ष निर्माण होतील तेव्हां काय करावें याचा निर्णय या तीन्हींपैकीं एकाही धर्मांतून स्पष्टपणें दिसून येत नाहीं. अलबत, व्यक्तिजीवनासंबंधीं जें तत्त्वज्ञान त्यांनीं प्रतिपादिलें आहे तेंच तत्त्वज्ञान समाजजीवनालाही लागू होतें, या दृष्टीनें सामा-जिक अहिंसेचें निदर्शन या धर्मांत आहे. पण निदर्शन असणें निराळें, आणि प्रत्यक्ष मार्गदर्शन असणें निराळें. सामूहिक प्रश्नांत अहिंसेचें पालन कशा रीतीनें करतां येईल, याचा व्यवस्थित विचार आणि प्रयोग जगाच्या इतिहासांत गांधीं-नींच पहिल्यानें केला आहे, असें म्हणतां येईल.

ख्रिस्त, महावीर किंवा बुद्ध यांनीं ज्या बाबतींत प्रयत्नच केला नाहीं, त्या बाबतींत ते अयशस्वी झाले असें म्हणणें व्यर्थ आहे. आतां "बिचारा गांधीवाद" युद्धें नाहींशी करूं शकेल कीं नाहीं तें आज कोणीं सांगावें?

गांधीवादानें सामूहिक अहिंसेचा मार्ग जगापुढें ठेवला, त्याला तीन तपांहून जास्त काळ अद्याप झाला नाहीं. तीस पस्तीस वर्षांच्या अल्प काळांत हजारों वर्षें रूढ होऊन बसलेल्या हिंसक युद्धासारख्या संस्थेविषयींची जगाची श्रद्धा नाहींशी करणें कसें शक्य आहे ? गांधीवादाच्या यशापयशाचा निर्णय हजारों नाहीं तरी शेंकडों वर्षांनंतरच होऊं शकेल. आज तो निर्णय कोणी करील, तर तें अविचाराचें काम ठरेल. आज आपल्याला इतकेंच करतां येईल कीं, गांधीवादाच्या विचारसरणींत अहिंसेचें जें तत्त्व आहे तें व्यवहार्य आहे कीं नाहीं तें पाहणें. तें पाहण्याइतका त्याचा प्रयोग झाला आहे आणि त्यावरून असें दिसतें कीं योग्य प्रचार, शिक्षण आणि अभ्यासानंतर गांधीवादाच्या अहिंसेचें पालन समाज करूं शकेल. आज इतकाच विचार आपल्याला करितां येईल. याहून अधिक विचार करण्याला आपल्याजवळ कोणतेंच साधन नाहीं.

# ९ जगाचा नियम प्रेम कीं स्पर्धा ?

**आक्षेप:**— सारें जग स्पर्धेच्या बळावर चाललें आहे आणि "बळी तो कान पिळी" हेंच धोरण जगानें स्वीकारलें आहे. अशा परिस्थितींत जग गांधींची अहिंसा स्वीकारील, हें संभवत नाहीं.

**उत्तर:**— "सारें जग स्पर्धेच्या बळावर चाललें आहे" हें विधानच वदतोव्याघाताचें उत्कृष्ट उदाहरण आहे. स्पर्धेनें कोणतीही संस्था सुव्यवस्थित रीतीनें चालणें शक्य नाहीं. जेथें स्पर्धा आली तेथें दुसऱ्याला हाणून पाडण्याची वृत्ति उत्पन्न झालीच म्हणून समजावें. स्पर्धा हा जगाचा नियम असता तर जगाचा नाशच झाला असता. जगाचा नियम आहे प्रेम. प्रेमाच्या बळावरच जग चाललें आहे. स्पर्धा किंवा द्वेष ही विकृति आहे, जगाची स्वाभाविक प्रकृति नव्हे. निदान मनुष्यप्राण्याची प्रकृति प्रेमच आहे. मुंबईसारख्या शहरांत लाखों लोक एकत्र राहूं शकतात. कारण कीं माणसांमाणसांतील संबंधाचें मूलसूत्र आहे प्रेम. जर तें सूत्र द्वेष असतें, तर उंदीर आणि मांजर ज्याप्रमाणें एकत्र राहूं शकत नाहींत, त्याचप्रमाणें माणसेंही एकत्र राहूं शकलीं नसतीं. आई कष्ट सोसून, झीज सोसून

मुलांचें पालनपोषण करते, कारण कीं मनुष्याचें जीवनसूत्र प्रेम आहे. तें जीवनसूत्र जर द्वेष किंवा स्पर्धा असतें तर आईनें मुलांना मारून आपलें पोट भरलें असतें, दुष्काळाच्या वेळीं किंवा गरीबींत मुलांना कांहींही खायला न देतां आईनें आपलेंच पोषण केलें असतें. तसें पाहिलें तर लहान अर्भकांपेक्षां आई शरीरबलानें जास्त समर्थ असते. म्हणून "बळी तो कान पिळी" हाच जर मानवी जगाचा नियम असता तर 'बळी' या नात्यानें आईनें मुलांचा कान पिळून आपल्या पोटाची खळगी भरली असती. पण असें झालेलें आढळत नाहीं. याचे उलट आई आपल्या बळीपणाचा उपयोग अर्भकाच्या रक्षणासाठीं करिते, इतकेंच नाहीं, पण आपल्या निर्बल अपत्याच्या रक्षणासाठीं स्वतःच्या 'बळी' शरीराचें बलिदानही देते. याच्या मुळाशीं मानवी हृदयांतील प्रेमसूत्र आहे.

समाजाचें एकत्र राहूं शकणें प्रेमसूत्रामुळेंच शक्य आहे हें सहज पटण्यासारखें आहे. पण मग स्पर्धा, इर्ष्या, द्वेष, मारामारी, हिंसा, वगैरेंचें दर्शन आपल्याला होतें त्याचा अर्थ काय? एखादा मनुष्य दुसऱ्यांवर अनन्वित जुलूम करतो, एखादी प्रजा दुसऱ्या प्रजेला जुलमाखालीं चिरडून टाकते, सज्जन माणसांना दुर्जन दुःख देतात याचा अर्थ काय? याचा अर्थ इतकाच कीं जीवनाच्या सामान्य नियमाची ही विकृति आहे. प्रेम ही मानवी जीवनाची प्रकृति आहे, तर द्वेष किंवा तत्सदृश भावना ही विकृति आहे. कविकुलगुरूनें हेंच महान् तत्त्व आपल्या अमरवाणीनें सांगितलें आहे, "**उष्णत्वमग्न्यातपसंप्रयोगात् शैत्यं हि यत्सा प्रकृतिर्जलस्य.**" पाणी जरी अग्नि किंवा ऊन यांच्या संबंधानें गरम झालें, तरी थंडपणा हाच पाण्याचा स्वभावधर्म आहे. पाण्याची प्रकृति आहे थंडपणा आणि गरमपणा ही त्याची विकृति आहे. त्याचप्रमाणें मनुष्याची प्रकृति आहे प्रेम आणि द्वेष ही त्याची विकृति आहे. स्वार्थाची मात्रा वाढली म्हणजे द्वेषाची विकृति उत्पन्न होते. आणि या विकृत मनुष्यस्वभावाचें आविष्करण म्हणजेच भांडणें, ईर्ष्या, जुलूम, अंतःकलह, युद्धें, मारामाऱ्या वगैरे होत.

अशा रीतीनें आक्षेपकांच्या आक्षेपाचा पायाच खोटा असल्यामुळें, त्यावेवर रचलेली त्यांच्या तर्काची इमारत आपोआपच ढासळून पडते. प्रेम हा जीवनाचा नियम ठरला म्हणजे अहिंसा आपोआपच सिद्ध होते. कारण कीं अहिंसा हें प्रेमाचेंच एक स्वरूप आहे. प्रेमाला दोन बाजू आहेत. एक विधेयात्मक आणि दुसरी निषेधात्मक—एक प्रेमाच्या प्रत्यक्ष क्रियेची, दुसरी द्वेषमय

क्रियेच्या अभावाची. प्रेम असलें म्हणजे दुसऱ्याला इजा न करणें, त्याला पीडा न देणें, वगैरे वस्तु प्रेमाच्याच अंगभूत म्हणून आविष्कृत होतात; त्या बरोबरच प्रेम असलें म्हणजे दुसऱ्याची सेवा करणें, दुसऱ्यासाठीं स्वतःच्या हितसंबंधाचाही त्याग करणें, वगैरे गोष्टी आपोआपच येतात. म्हणजे अहिंसेचें आचरण हें मनुष्यस्वभावाला सुसंगत अशी वस्तु आहे. अहिंसा हाच मानवी जीवनाचा नियम आहे. म्हणून जग गांधींची अहिंसा स्वीकारणार नाहीं अशी शंका बाळगणें अस्थानीं आहे.

आपल्याला जगांत हिंसा, स्पर्धा वगैरे प्रमुखतः दिसून येतात, याचें कारण या सर्व गोष्टी विकृत मनोदशेचे परिणाम आहेत. जी वस्तु स्वाभाविक आहे, जें वर्तन स्वाभाविक आहे, जे प्रसंग स्वाभाविकपणें घडतात, त्यांचेकडे आपलें लक्ष सहसा जात नाहीं. समुद्रांत प्रत्यहीं फिरणाऱ्या आगबोटी बहुधा सुरक्षित रीतीनें एका बंदराहून दुसऱ्या बंदरीं जातात येतात. इतिहास अशा सुरक्षितपणें जाणाऱ्या येणाऱ्या बोटींची नोंध ठेवीत नाही. पण कधीं काळीं अपघातानें एखादी बोट बुडून समुद्राच्या तळाशीं गेली तर त्याची नोंध मात्र इतिहास अचूक घेतो. अशा बुडणाऱ्या बोटींची नोंध पाहून कोणी जर असा निर्णय करील, कीं समुद्रांत बुडणें हाच बोटींचा स्वभावधर्म आहे, तर तें किती हास्यास्पद होईल ! बोटींची रचनाच त्या न बुडाव्या या हेतूनें केलेली असते. बोट बुडते ती विकृत परिस्थितीमुळे. न बुडणें हीच बोटीची प्रकृति आहे. बुडणें ही तिची विकृति आहे.

हिंसेचें आणि अहिंसेचें असेंच आहे. सर्व समाज सलोख्यानें जगत असला म्हणजे त्याच्या जीवनाची नोंध इतिहास ठेवीत नाहीं. पण समाज विकृत दशेंत जाऊन जेव्हां सलोखा सोडून देतो आणि कलह उत्पन्न होतो, तेव्हां इतिहास त्याची नोंध घेतो. अशा कलहांचा इतिहास वाचून कलह हाच मानवी जगाचा नियम आहे, असें म्हणणें अज्ञानाचें निदर्शक आहे. विकृत वर्तन किंवा विकृत मनोदशा अस्वाभाविक असल्यामुळेंच आपलें ध्यान खेंचतात. रस्त्यांतून असंख्य माणसें पसार होतात, त्यांत एकच वेडा असला तर आपलें ध्यान त्याच्याकडे जातें, आपण त्याच्या विषयीं विचार करतों, आपण त्याच्या विषयीं दुसऱ्यांना सांगतों आणि त्याच्या विषयीं चर्चा करून त्याच्या विषयीं कांहीं लिहूनही ठेवतों. पण आपला संबंध ज्या असंख्य सामान्य मनःस्थितीच्या माणसांशीं येतो त्यांच्याविषयीं आपण विचारही करीत नाहीं. ज्या वेळीं मानव-

जीवनाचें मुख्य सूत्र कोणतें हें नक्की करावयाचें असेल, त्या वेळीं या असंख्य सामान्य मनःस्थितीच्या माणसांच्या वर्तनाचाच विचार आपण केला पाहिजे. आणि तसा विचार केला तर आपल्याला आढळून येतें कीं मनुष्य शांतताप्रिय प्राणी आहे, तो समाजप्रिय आहे, तो एकमेकांशीं सलोख्यानें वागतो, तो आपल्या शेजाऱ्यावर नेहमीं प्रेमच करतो, तो हिंसा टाळतो आणि तो अहिंसेचा उपासक आहे. त्याचे सामान्य व्यवहारांत अहिंसा-वृत्तीचेंच आविष्करण होत असतें.

जगानें गांधींची अहिंसा स्वीकारायची याचा अर्थ नित्य व्यवहारांत अहिंसेचा स्वीकार करावयाचा, हा नव्हे. कारण कीं तशी अहिंसा मानवसमाजांत स्वाभाविकपणेंच आहे. पण अहिंसेचा स्वीकार करावयाचा याचा अर्थ हा आहे कीं मानवी मनांत विकृत भाव उत्पन्न होऊन जेव्हां हिंसावृत्ति प्रादुर्भूत होते, तेव्हां त्या वृत्तीच्या स्थानीं अहिंसा-वृत्ति कशी आणावयाची? अहिंसेच्या स्वीकाराचा हाच अर्थ आहे, आणि म्हणूनच अहिंसेचा प्रश्न कठीण वाटतो. विकृत परिस्थितींत अहिंसेचा स्वीकार म्हणजे विकृत दशेंतून स्वाभाविक दशेला परत येणें. हा क्रम अत्यंत स्वाभाविक आहे. स्वाभाविक आहे म्हणून तो इष्ट आहे आणि प्रयत्नानें तो सुलभही आहे.

## १० "जीवो जीवस्य जीवनम्"

**आक्षेपः—** "जीवो जीवस्य जीवनम्" हा नियम जगांत सर्वत्र दिसतो. मोठे प्राणी लहान प्राण्याला खाऊन जातात. या नियमांतून माणसांनाच वगळणें हास्यास्पद आहे. म्हणून गांधीवादाची अहिंसाही हास्यास्पद आहे.

**उत्तरः—** "जीवो जीवस्य जीवनम्" याचा अर्थ एक जीव दुसऱ्या जीवाला मारूनच स्वतः जगतो, असा करणें आक्षेपकाच्या मताला अनुकूल असलें, तरी एक जीवाच्या जीवनाचा आधार दुसऱ्या जीवावर असतो हा अर्थ वस्तुस्थितीला धरून आहे. म्हणजे एका जीवाला व्यवस्थितपणें जगायचें असेल तर दुसऱ्या जीवांचें सहकार्य त्याला आवश्यक आहे, हा अर्थ "जीवो जीवस्य जीवनम्" या वचनांत अभि-

प्रेत आहे. मुंग्या, मधमाशा, वाळवी, पक्षी, हत्ती, हरणें वगैरे प्राणी ज्याप्रमाणें स्वजातीयांच्या सहकारानेंच जगूं शकतात, तशा सहकाराशिवाय जगूं शकणार नाहींत, त्याचप्रमाणें माणसेंही स्वजातीयांच्या सहकारानें जगूं शकतात, तशा सहकारावांचून जगूं शकणार नाहींत. आणि सहकार, प्रेम आणि अहिंसेशिवाय संभवूं शकत नाहीं. म्हणून मानवजीवनाच्या अस्तित्वाला स्वजातीयांविषयींची अहिंसावृत्ति अपरिहार्य आहे.

पण आक्षेपकाचा रोख जीवितरक्षेसाठीं जो आहार प्राण्यांना घ्यावा लागतो, त्यांत केल्या जाणाऱ्या हिंसेकडे आहे. एक प्राणी दुसऱ्या प्राण्याचें भक्ष्य असतो, असें आपण नेहमीं पाहातों. मोठा मासा लहान माशांना खातो, जाळें विणणारा कोळी जंतु लहान लहान किड्यांना खातो, पाल अनेक प्राण्यांना खाते, वाघ इतर पशूंना मारून खातो, मांजर उंदरांना खातें, वगैरे उदाहरणें सत्य आहेत, त्याचप्रमाणें मनुष्यही मासे, शेळ्या, गाई, बैल, हरणें, कोंबडीं, वगैरे प्राण्यांना मारून खातो, हेंही खरें आहे. पण या प्रश्नाला गांधीवादाशीं निगडित करणें योग्य नाहीं. गांधीवादाचें क्षेत्र आहे मानवी जीवन. माणसांमाणसांमध्यें कशा प्रकारचे संबंध असावेत याचाच विचार प्रमुखतः गांधीवादानें केला आहे. गांधीवादाच्या सिद्धान्ताप्रमाणें रचल्या जाणाऱ्या समाजांत मत्स्याहारी किंवा मांसाहारी माणसांना स्थान नाहीं असें गांधीवाद कोठेंही म्हणत नाहीं. गांधींनीं ख्रिस्तवासी सी. एफ्. अँड्रयूज-विषयीं लिहितांना लिहिलें होतें कीं अँड्रयूज यांनीं आपल्या जीवनांत अहिंसेचा आदर्श संपूर्णपणें पाळण्याचा प्रयत्न केला होता. याचेवर टीकाकारांनीं असा आक्षेप घेतला कीं, अँड्रयूज जन्मभर मांसाहारी असतांना त्यांना अहिंसक कसें म्हणतां येईल ? त्या वेळीं गांधींनीं स्पष्टीकरण करून गांधीवादाची भूमिका सांगितली होती. ती ही कीं मनुष्य मनुष्येतर प्राण्यांची हिंसा करतो कीं नाहीं, हा प्रश्न हिंदुस्थानच्या राजकीय किंवा सामाजिक अहिंसेंत उभाच होऊं शकत नाहीं. मनुष्यानें इतर मनुष्यांविषयीं अहिंसक वृत्ति आणि आचरण ठेवावें एवढाच गांधीवादाच्या अहिंसेचा अभिप्रेत आदर्श आहे. सर्व प्राण्यां-विषयींची अहिंसा हा आदर्श व्यक्तिजीवनाच्या विकासाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा असला, तरी गांधीवादाच्या दृष्टीनें त्याचा विचार प्रस्तुत नाहीं,

गांधीवादाच्या अहिंसेचें हें मर्यादित स्वरूप लक्षांत घेतलें तर वरील आक्षेप टिकूं शकत नाहीं आणि गांधीवादाची अहिंसा हास्यास्पदही होऊं शकत नाहीं.

# ११ अहिंसेचें पालन अशक्य ?

**आक्षेपः—** वनस्पतींतही जीव आहे, तेव्हां वनस्पति खाणें हीही हिंसाच आहे. अहिंसेचें पालन करावयाचें असेल तर माणसानें मेलेंच पाहिजे. श्वास घेतांना जी हवा पोटांत जाते तिच्या बरोबर असंख्य जंतु मरतातच. म्हणून गांधींची अहिंसा म्हणजे अहिंसा पाळणाऱ्याचा मृत्यु. बरें असा मृत्यु झाला तर आत्महत्या व्हावयाची. आत्महत्येंत स्वतःची हिंसा आहेच. मग अहिंसेचें पालन केव्हां आणि कसें शक्य आहे ?

**उत्तरः—** हा प्रश्न विचित्र मनोदशेचा द्योतक आहे. जी विचारसरणी चुकीची ठरवावयाची असेल तिच्या अशक्य कोटीची भूमिका घेऊन, ती सगळीच विचारसरणी, त्या विचारसरणीचा व्यवहार्य भागही, अशक्य आहे असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यापैकींच या आक्षेपाचा प्रयत्न आहे. व्यायाम केल्यानें सॅन्डोसारखीं माणसें उत्पन्न होऊं शकतात. पण प्रत्येक मनुष्याला व्यायाम करूनही सँडो होणें शक्य नाहीं. सँडो होणें शक्य नाहीं म्हणून व्यायामच अशक्य आहे, हें विधान तर्कहीन आहे. तद्वतच, अहिंसेच्या अंतिम स्वरूपाचें, अहिंसेच्या सूक्ष्मतम स्वरूपाचें पालन अशक्य आहे म्हणून सारी अहिंसाच अशक्य आहे, असें म्हणणें हें विधानही तर्कहीन आहे. मागें आपण पाहिलेंच आहे (दुसऱ्या आक्षेपाच्या उत्तरांत) कीं अहिंसेच्या आचरणाची गुरुतम मर्यादा अनंत आहे. मनुष्यजीवनाच्या किंवा समाजजीवनाच्या विकासासाठीं अहिंसेची कार्यसाधक लघुतम मर्यादा शोधूनच, कमींत कमी त्या मर्यादेचें पालन तरी प्रत्येक व्यक्तीनें केलेंच पाहिजे असा आग्रह आपल्याला ठेवतां येईल. त्याहून अधिक कक्षेच्या अहिंसेचें पालन करील तर व्यक्तीचा जीवनविकास अधिक होईल. हा नियम सर्वच नीतीच्या नियमांना लागू आहे. "चोरी करूं नका" हा नीतीचा आदेश नीतीची अंतिम गुरुतम मर्यादा नव्हे, ती तिची लघुतम मर्यादा आहे. या मर्यादेच्या खालीं मनुष्य गेला कीं तो अनीतिमान् ठरेल. या मर्यादेच्या वर तो जसजसा चढेल तसतसा तो अधिकाधिक नीतिमान् ठरत जाईल. चोरी करीत नाहीं इतकेंच नव्हे, पण स्वतःच्या धनाचें दान करतो, अनेकांना पोषितो, स्वतःच्या मालमत्तेचा उपयोग दुसऱ्याच्या सेवेसाठीं करितो वगैरे प्रकारांनीं नीतिनियमांचें

पालन करणारा मनुष्य लघुतम मर्यादेच्या फार पुढें गेला आहे असें गणण्यांत येईल. पण मनुष्याला 'चोरी न करणें' या व्रताची अंतिम आणि सूक्ष्मतम मर्यादा पाळतां येणार नाहीं, म्हणून अस्तेयाचें तत्त्वच अव्यवहार्य आहे असें म्हणतां येत नाहीं.

हीच तर्कपद्धति अहिंसेलाही लागू केली पाहिजे. आक्षेपकानें अहिंसेचें अंतिम मर्यादेचें आणि सूक्ष्मतम स्वरूप कल्पून त्याचें पालन देहधाऱ्याला अशक्य आहे हें दाखविलें आणि अहिंसेची प्रत्येक कक्षाही अशक्य आहे, असा खोटा निष्कर्ष त्यांतून काढला. "कोणाही मनुष्यानें दुसऱ्याला इजा करूं नये" ही अहिंसेची लघुतम कार्यसाधक मर्यादा झाली. ती समाजाच्या धारणे-साठीं इतकी आवश्यक आहे कीं कायद्यांतही त्या मर्यादेचा स्वीकार केला आहे. जो मनुष्य दुसऱ्याला वाणीनें किंवा शरीरानें इजा करील, त्याला कायदा गुन्हेगार गणतो. अहिंसेचें अंतिम स्वरूप अशक्य आहे, म्हणून हें तिचें लघुतम मर्यादेचें स्वरूपही अशक्य आहे, हा निष्कर्ष युक्तिसंगत नाहीं. नीतीच्या इतर नियमांप्रमाणें अहिंसेच्याही उत्तरोत्तर उच्च भूमिका आहेत. व्यक्ति किंवा समा-जाचा अहिंसेचा अभ्यास जसजसा वाढत जाईल तसतशी अहिंसापालनाची मर्यादाही वाढत जाईल.

वैयक्तिक अहिंसाधर्माच्या आचरणाचा सविस्तर विचार जैन धर्माइतका दुसऱ्या कोणत्याच धर्मानें किंवा संप्रदायानें केला नाहीं. जैन धर्मालाही सामान्य जनसमूहासाठीं वैयक्तिक पालनाला सुकर अशी अहिंसेची लघुतम मर्यादा नक्की करावी लागली आहे. त्या मर्यादेचें पालन सर्वच श्रावकांनीं केलें पाहिजे असा त्या धर्माचा आग्रह आहे. त्याच धर्मानें साधूंसाठीं अहिंसेची फारच कडक मर्यादा ठेविली आहे. हें दुहेरी धोरण याच कारणामुळें आहे.

नीतितत्त्वांची लघुतम मर्यादा कशाच्या आधारावर नक्की करण्यांत येते हा प्रश्न महत्त्वाचा आहे. विचार केला असतां आपल्याला आढळून येतें कीं कर्ममात्राचे विधेय आणि निषेध्य असे दोन भेद होतात. अमुक गोष्टी केल्याच पाहिजेत हें कर्माचें विधेयात्मक स्वरूप आणि अमुक गोष्टी करतां कामा नये हें कर्माचें निषेधात्मक स्वरूप. "खोटें बोलूं नका" हें नीतीचें निषेधात्मक स्वरूप झालें. पण "खरें बोला" हें त्याचें विधेयात्मक स्वरूप झालें. तद्वतच "कोणाला दुखवूं नका" हें अहिंसेचें निषेधात्मक स्वरूप झालें आणि "भूतमात्रावर प्रेम करा" हें अहिंसेचें विधेयात्मक स्वरूप झालें. समाजाच्या सुस्थितीसाठीं

अहिंसेची कमींत कमी मात्रा प्रत्येक व्यक्तीनें स्वीकारलीच पाहिजे. ही कमींत कमी मात्रा म्हणजेच नैतिक कायदे.

गांधीवादाच्या अहिंसेंतही गांधीवादाच्या कल्पनेप्रमाणें जो समाज रचला जाईल त्याच्या स्थापनेसाठीं आणि त्याच्या सुस्थितीसाठीं, अहिंसेच्या ज्या कमींत कमी मर्यादेचें पालन आवश्यक आहे त्याच्या पालनाचा आग्रह आहे. त्याहून वरच्या दर्जाची अहिंसा कोणाला पाळावयाची असेल तर गांधीवाद त्याला प्रोत्साहन देतो, आणि जसजशी अहिंसापालनाची कक्षा वाढत जाईल तसतशी व्यक्ति आणि समाज दोहोंच्या सुस्थितीची आणि कल्याणाची कक्षाही वाढत जाईल असें गांधीवाद म्हणतो.

तत्त्वज्ञानाचा विषय अतींद्रिय असल्यामुळें जीवनाच्या कोणत्याही रहस्याचें स्पष्टीकरण शब्दांनीं करणें शक्यच नसतें. अहिंसेचें जें स्वरूप आक्षेपकांनीं कल्पिलें आहे तें असेंच अतींद्रिय आहे, म्हणून त्या स्वरूपाचें स्पष्टीकरण बुद्धीनें किंवा शब्दानें होणें शक्य नाहीं. पण बुद्धीची धाव जितकी मर्यादित आहे तितकीच धर्मपालनाची कक्षाही मर्यादित आहे, असें म्हणतां येत नाहीं. धर्म किंवा नीतीच्या पालनाच्या इंद्रियातीत कक्षाही असणारच. त्यांच्या पालनाच्या शक्याशक्यतेविषयीं बुद्धीनें निवाडा देणें अशक्य आहे.

या दृष्टीनें पाहातां आक्षेपकांनीं ज्या काल्पनिक भूमिकेचा आश्रय घेतला आहे त्याचा व्यक्तिजीवनाच्या विकासाशीं संबंध असला, तरी गांधीवाद ज्या समाजाची स्थापना करूं इच्छितो त्याच्या स्थापनेशीं किंवा सुस्थितीशीं त्या भूमिकेचा कांहींच संबंध नाहीं. खरें पाहतां, हा आक्षेप गांधीवादाला लागूच होत नाहीं, असें सांगून आक्षेपकाला गप्प बसायला लावणें शक्य होतें. पण अहिंसेच्या अंगोपांगांच्या विचाराला चोदना मिळावी म्हणून वरील विवेचन केलें आहे. गांधीवाद ज्या अहिंसेची अपेक्षा समाजापाशीं किंवा व्यक्तीपाशीं करीत आहे, त्याचें पालन दुसऱ्या कोणत्याही सर्वसामान्य नीतितत्त्वाच्या पालनाइतकेंच सोपें आहे.

# १२ स्वातंत्र्योत्तर अहिंसा

**आक्षेपः—** हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्यासाठीं गांधीवादाच्या अहिंसेचा मार्ग परिणामकारक आहे असें मानिलें आणि

त्या मार्गानें हिंदुस्थान स्वतंत्र झाला असेंही मानिलें, तरी स्वतंत्र हिंदुस्थानाचें परचक्रापासून रक्षण करण्यासाठीं हत्यारें, लष्कर, दारूगोळा, विमानें, तोफा, टँक्स वगैरे आधुनिक युद्धाचीं साधनें ठेवावींच लागणार. मग गांधीवादाच्या अहिंसेचें स्थान कोठें ? अशा अहिंसेनें परचक्रापासून राष्ट्राचें रक्षण होणें शक्यच नाहीं. म्हणून हिंसक प्रतिकाराचीं साधनें तयार ठेवून हिंसक प्रतिकार करावाच लागणार.

उत्तर:—हा आक्षेप नव्हे, पण ही शंका आहे. आक्षेपकांनीं जी परिस्थिति कल्पिली आहे, ती अद्याप दूर आहे. मागील विवरणांत सांगितल्याप्रमाणें गांधीवादाच्या अहिंसेचा सांगोपांग प्रयोग संपूर्णतया अद्याप झाला नाहीं. तो तसा एवढ्या अल्पावधींत होणेंही शक्य नाहीं. कारण कीं, तो प्रयोग ज्या प्रयोगशाळेंत व्हावयाचा ती प्रयोगशाळा परस्वाधीन आहे. त्यामुळें प्रयोगाला लागणारीं साधनें पाहिजेत तितकीं आणि पाहिजेत तशीं उपलब्ध होत नाहींत. अशी स्थिति असल्यामुळें हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्नही जितका सुलभ व्हावयाला पाहिजे तितका सुलभ नाहीं.

पण गांधीवादाच्या मार्गानें हिंदुस्थान जर स्वतंत्र होईल, तर मिळविलेलें स्वातंत्र्य त्याच मार्गानें कसें टिकवावयाचें हेंही हिंदुस्थानला स्पष्ट दिसेल. प्रगतीच्या मार्गाचें वैशिष्ट्य हें आहे कीं प्रगतीच्या दिशेनें एक पाऊल पडलें म्हणजेच त्याच्या पुढचें पाऊल दिसतें, त्याचे अगोदर नाहीं. प्रगतीचा मार्ग पर्वतारोहणासारखा आहे. हिमालयाच्या पायथ्याशीं उभें राहून हिमालयाच्या सर्वोच्च शिखराची कल्पना करणें जसें व्यर्थ आहे, त्याचप्रमाणें स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हिंदुस्थान आपलें स्वातंत्र्य टिकवूं शकेल कीं नाहीं याची कल्पना व्यर्थ आहे. गांधीवादानें दाखविलेल्या मार्गानें स्वातंत्र्य मिळालें म्हणजे तो मार्ग तेवढ्यापुरता तरी यशस्वी ठरेलच. त्यानंतर मिळविलेलें स्वातंत्र्य टिकविण्याची शक्ति त्या मार्गांत नाहीं असें आढळून आलें किंवा त्यापुढें त्या मार्गाचें आचरण करण्याची शक्ति राष्ट्रांत नाहीं असें आढळून आलें, तर तो मार्ग सोडून देऊन जगांत सर्वत्र स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं जो मार्ग इतर राष्ट्रें अवलंबितात तोच मार्ग हिंदुस्थानही घेईल. त्यांत हर्षशोकाचें कांहींच कारण नाहीं. ज्याचा जसा अधिकार असेल तितक्याच तोलाचा मार्ग तें राष्ट्र स्वीकारणार. शिवाय गांधीवादाचा मार्ग सर्व दृष्टींनीं कल्याणप्रद आहे, या बाबतींत कोणाचेंही दुमत नाहीं. गांधीवादावर जे आक्षेप घेतले जातात ते त्याच्या

इष्टानिष्टतेबद्दल नसून शक्याशक्यतेबद्दलचे आहेत. एखादा आदर्श राष्ट्राला झेंपत नाहीं हा त्या आदर्शाचा दोष नसून त्या राष्ट्राच्या निर्बलतेचा दोष आहे. गांधीवादाचा मार्ग हा शुभगामी मार्ग असल्यामुळें भगवद्गीतेंत सांगितल्या-प्रमाणें "**स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्**" हा नियम त्या मार्गालाही लागू आहे. प्रगतीच्या अमुक टप्प्यापर्यंत गांधीवाद राष्ट्राला घेऊन जाईल, आणि त्याचे पुढें जाणें राष्ट्राला शक्य झालें नाहीं तरी त्यांत कांहींच बिघडत नाहीं. त्या वेळीं जो मार्ग सुचेल त्या मार्गानें राष्ट्र पुढें वाढेल.

असें आहे तरी गांधीवादाच्या मार्गानें मिळविलेलें स्वातंत्र्य त्याच मार्गानें टिकवितां यावें अशी इच्छा सर्वच गांधीवाद्यांची असणार. त्याला अनुसरून स्वराज्यप्राप्तीनंतर गांधीवादाच्या मार्गानें स्वराज्यरक्षा कशी होईल ही चिंता वाटणें साहजिक आहे. या बाबतींत निश्चित अभिप्राय दर्शविणें आज शक्य नाहीं. या बाबतींत निश्चित मार्गदर्शन करविणें गांधीवादाच्या आचार्यालाही आज शक्य नाहीं. कारण कीं सत्याच्या प्रकाशांत अहिंसेच्या मार्गानें त्यांचीही प्रगति चालूच आहे. गांधीवादाचा मार्ग अद्याप अक्षुण्ण मार्ग आहे. एखाद्या दाट अरण्यांतून नवाच रस्ता पाडायचें काम जितकें कठीण असतें, तितकेंच कठीण काम जीवनाच्या जटिल कलहांतून सत्याची मशाल हातांत घेऊन अहिंसेची पायवाट पाडण्याचें आहे. अरण्यांत पुढें कोणत्या प्रकारची जटिलता येईल आणि कोणत्या साधनांनी ती जटिलता दूर करून उद्दिष्ट ध्येयाकडे घेऊन जाणारा मार्ग चोखाळतां येईल हें अगोदरपासूनच नक्की करणें शक्य नसतें. नवा मार्ग शोधण्याच्या या प्रयत्नांत श्रद्धेतून तात्कालिक मार्गदर्शन, त्यांतून अनुभवात्मक ज्ञान आणि त्या ज्ञानांतून पुढच्या मार्गाचें दर्शन हा क्रम नेहमीं राहतो. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यप्राप्तीचा गांधीवादाचा मार्गही अद्याप अक्षुण्ण आहे, मग स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गांधीवाद स्वातंत्र्यरक्षेसाठीं कोणता राजमार्ग आणि कोणत्या पाऊलवाटा सुचवील तें आज कसें सांगतां येणार ?

असें आहे तरी तर्कबुद्धीनें थोडासा विचार करणें अस्थानीं होणार नाहीं. आक्षेपकानें उपस्थित केलेली शंकाही प्रत्यक्ष अनुभवान्तीं आलेली नसून तर्कबुद्धींतूनच उत्पन्न झालेली आहे. म्हणून उपस्थित आक्षेपाला कल्पनामिश्रित तर्कबुद्धीनेंच उत्तर देण्याचा प्रयत्न येथें केला आहे.

ज्या मार्गानें स्वातंत्र्य मिळवतां येईल, त्याच मार्गानें तें टिकवतांही येईल हें म्हणणें सर्वस्वी सयुक्तिक आहे. जर गांधीवादाच्या मार्गांत स्वातंत्र्य

टिकवण्याची शक्ति नसेल तर त्या मार्गानें स्वातंत्र्य मिळवतांच येणार नाहीं. ब्रिटिश साम्राज्यासारख्या प्रबळ साम्राज्यानें हिंदुस्थानाला गुलामीच्या शृंखलेंत इतक्या मजबूतपणें जखडून टाकलें आहे कीं अनेक वर्षांच्या अखंड प्रयत्नानेंही अद्याप हिंदुस्थान स्वतंत्र होऊं शकलें नाहीं. इतकीं मजबूत बंधनें गांधीवादाच्या मार्गानें तोडून हिंदुस्थान स्वतंत्र झालें, तर गांधीवादाच्या सामर्थ्याबद्दल मतभेद राहणारच नाहीं आणि गांधीवादाच्या मार्गानें मिळविलेलें स्वातंत्र्य टिकवतां येईलच ही श्रद्धाही स्वाभाविक होईल. पण हिंदुस्थानचें स्वातंत्र्य अन्य रीतीनें मिळालें तर—म्हणजे ब्रिटिशांनीं दया करून तें आपल्याला दिलें, किंवा अमेरिकेसारख्या देशांनीं दडपण आणल्यामुळें इंग्लंडला आपल्याला स्वातंत्र्य द्यावें लागलें, तर मग गांधीवादाचा मार्ग काय किंवा शस्त्रास्त्रांपासून मिळणाऱ्या रक्षणाचा मार्ग काय, दोन्हीही मार्ग हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यरक्षणासाठीं सारखेच कठीण होतील. फरक इतकाच राहील कीं शस्त्रास्त्रांच्या मार्गाचें तंत्र ( Technique ) प्रयोगसिद्ध झालें असल्यामुळें त्यांत इतर देशांचें अनुकरण करण्याची संधि हिंदुस्थानाला मिळेल. तशी संधि गांधीवादाच्या मार्गाच्या अक्षुण्णत्वामुळें तो मार्ग स्वीकारण्यांत मिळणार नाहीं.

राष्ट्राच्या शस्त्रीकरणाशिवाय राष्ट्राचें परचक्रापासून रक्षण करणें शक्य आहे कीं नाहीं या प्रश्नाचा थोडासा विचार आतां केला पाहिजे. परचक्रापासून रक्षण याचा अर्थ जर परदेशीयांना विजिगीषेनें प्रेरित होऊन हिंदुस्थानाच्या भूमीवर पाऊलच ठेवूं द्यायाचें नाहीं असा असेल तर शस्त्रीकरणाशिवाय तसें रक्षण होणें शक्य नाहीं. पण परकीयांना हिंदुस्थानावर राज्य करूं द्यावयाचें नाहीं हा जर अर्थ असेल, तर गांधीवादाच्या मार्गानें तो शस्त्रीकरणापेक्षां जास्त सुलभतेनें आणि संपूर्णतेनें सिद्ध होईल. टॉल्स्टॉयनें "आयवॅन दी फूल" म्हणून एक सुंदर गोष्ट लिहिली आहे. त्यांत आयवॅनच्या गांवांत एक लश्कर तें गांव जिंकण्यासाठीं येतें. लश्कराची अशी कल्पना असते कीं, गांवापासून दूर अंतरावरच गांवचें लश्कर आपला सामना करायला येईल आणि आपण आपल्या बळानें लढून अल्पावधींत त्याला हरवून विजयोत्साहानें गांवांत प्रवेश करूं. पण रणवाद्ये वाजवीत वाजवीत, तालबद्ध गतीनें, वीरश्रीनें युक्त होऊन तें लश्कर गांवाच्या वेशीवर आलें तरी कोणीही त्यांना दिसलें नाहीं, गांवांत त्यांनीं प्रवेश केला तरी कोणीही त्यांना अडविलें नाहीं. गांवच्या रस्त्यानें तें वाद्यें वाजवीत फिरूं लागलें, तेव्हां त्याचीं वाद्यें ऐकून लोक

घरांतून बाहेर येऊन येऊन पाहूं लागले. पण या पाहण्यांत, लग्नाची वरात पाहण्यांत जी कुतूहलवृत्ति लोकांत दिसून येते, त्याहून निराळी वृत्ति त्या शिपायांना दिसलीच नाहीं. शिपायी आश्चर्यचकित होऊन सारा गांव हिंडहिंड हिंडले. त्यांचीं वाद्यें, त्यांचीं वीरगीतें, त्यांचें तालबद्ध चालणें, त्यांचे समान गणवेष वगैरे सर्व पाहून त्या गांवच्या लोकांना आनंद झाला आणि लोक कौतुकानें पाहात राहिले. शेवटीं लश्कर हिंडून हिंडून थकलें आणि भुकेनें व्याकुळ झालें, तेव्हां त्याच्या नायकानें त्यांना घरावर हल्ला करून खाण्याच्या वस्तु लुटण्याचा हुकूम केला. सैनिक आपलीं शस्त्रास्त्रें सज्ज करून प्रतिकाराचा सामना करण्याच्या जय्यत तयारीनें निरनिराळ्या घरांकडे गेले. ते घरांजवळ आले तेव्हां दाराशीं उभ्या असलेल्या ग्रामवासीयांनीं त्यांना रस्ता दिला आणि ते घरांत शिरले. घरांत जाऊन त्यांनीं स्वयंपाकघराकडे मोर्चा वळविला आणि खाण्याच्या वस्तु ते शोधूं लागले, तेव्हां "तुम्हांला भूक लागली आहे काय? बसा, मी वाढतें तुम्हांला." असें सांगून गृहिणीनें त्यांचे साठीं पाट मांडले आणि त्यांना प्रेमानें पोटभर जेवायला वाढलें. ते लोक जेऊन तृप्त होऊन तेथेंच झोंपले. झोंपून उठले तेव्हां त्यांना काय करावें हेंच सुचेना. लढणें हा त्यांचा धंदा होता. पण येथें लढावयाचें कोणाशीं? कंटाळून त्यांनीं आपल्या नायकाला विचारलें, "इथें कोणाशीं लढायचें?" नायकानें उत्तर दिलें, "लढायचें कारण नाहीं. लढल्या शिवायच आपण हें गांव जिंकलें आहे!" शिपायांना आनंद झाला. पण थोड्याच दिवसांत तो आनंद ओसरला आणि निष्क्रियतेमुळें ते कंटाळले. आपल्या सरदाराजवळ ते लढाई मागूं लागले. तेथें लढाई शक्यच नव्हती. म्हणून सरदारानें लाचारी दाखविली. तेव्हां सैनिक रुष्ट झाले आणि मग आपापसांतच लढूं लागले. हें दृश्यही त्या गांवच्या लोकांनीं अगदीं तटस्थतेनें पाहिलें. या यादवींत कांहीं शिपायी मारले गेले आणि बाकीच्यांना घेऊन त्यांचा नायक गांव सोडून निघून गेला.

टॉलस्टॉयनें या गोष्टींत अहिंसक प्रतिकाराचें सुंदर चित्र रेखाटलें आहे. हे चित्र काल्पनिक असल्यामुळें आपल्याला कदाचित् स्वप्नसृष्टीसारखें वाटेल. पण त्यांतील मुख्य मुद्द्याचें महत्त्व त्यामुळें थोडेंसेंही कमी होऊं शकत नाहीं.

नुकतीच "The moon is down" नांवाची कादंबरी माझ्या वाचण्यांत आली आणि त्याच कथानकावर रचलेला त्याच नांवाचा चित्रपटही मीं पाहिला. जर्मनांनीं चालू महायुद्धांत नॉर्वे जिंकलें, त्यांतील एक प्रसंग या

कादंबरीत चित्रित केला आहे. नॉर्वचें एक शहर जर्मनांनीं अचानक घेतलें. लोक प्रतिकारही करूं शकले नाहींत. प्रतिकार करण्याची शक्तिही त्यांचेंत नव्हती. रक्ताचा एक थेंबही न सांडतां जर्मनांनीं तें शहर ताब्यांत घेतलें. बर्लिनहून त्या शहरावर राज्य करण्यासाठीं तेथेंच राहण्याचा हुकूम सैन्याच्या कर्नलला धाडला गेला. कर्नलनें आपल्या ऑफिसरांसहित गांवच्या मेयरच्याच घरीं आपला तळ दिला. लोकांनीं निमूटपणें हें सर्व सहन केलें. पण अशी विलक्षण वृत्ति लोकांनीं धारण केली कीं, जर्मन सैनिकांना तेथें राहणेंही शक्य झालें नाहीं. जर्मन सैनिकांशीं कोणीही बोलायचें नाहीं, कोठेंही लोक जमा होऊन आनंदकल्लोल करीत असतांना एखादा जर्मन सैनिक दिसला कीं लगेच सर्व आनंदकल्लोल बंद करून लोकांनीं शांत बसून राहावयाचें किंवा निमूटपणें निघून जावयाचें. जुलमानें खाणींत किंवा कारखान्यांत काम करायला लावलें तर कामावर जावयाचें पण काम अशा तऱ्हेनें करावयाचें कीं जर्मनांचें अतोनात नुकसान व्हावें—वगैरे प्रकारांनीं नॉर्वेच्या त्या लोकांनीं अशा विलक्षण असहकाराची वृत्ति धारण केली कीं, विजेत्यांना तेथें राहणें असह्य झालें. ते सर्व कंटाळले, परत स्वतःच्या घरीं जाण्यासाठीं ते तळमळूं लागले. सैन्याच्या एका अधिकाऱ्यानें तर भयंकर कटाक्षमय वाणींत या विजयाचें वैयर्थ्य प्रांजलपणें कबूल केलें आणि जर्मनीनें नॉर्वे जिंकला असें म्हणणें म्हणजे माश्यांनीं त्यांना पकडण्यासाठीं बनविलेला चिकट कागद जिंकला असें म्हणण्यासारखेंच आहे, (The flies have conquered the fly-paper) असें त्यानें सांगितलें ! या एकाच वाक्यांत त्यानें जित राष्ट्राचा विजय आणि विजेत्या राष्ट्राचा पराजय किती तरी सुंदर रीतीनें प्रगट केला !

अशा कंटाळवाण्या परिस्थितीत सर्व सैनिक वैतागून गेले होते, इतक्यांत त्या गांवच्या दोन धाडशी तरुणांनीं गांव सोडून, समुद्रमार्गानें इंग्लंडला जाऊन, तेथील राज्यकर्त्यांना सर्व हकीकत सांगितली आणि त्यांचेकडून शत्रूला कळणार नाहीं अशा रीतीनें लहान लहान डायनेमाइट्स त्या गांवांत टाकले जावे अशी व्यवस्था केली. इंग्रजी विमानांनीं त्या गांवावर उड्डाण केलें आणि लहान लहान डायनेमाइट्स पुरत्या प्रमाणांत टाकले. विजेत्या जर्मनांना हें सर्व कळण्यापूर्वीच लोकांनीं, मुलांनीं, बायांनीं हे डायनेमाइट्स भराभर उचलून घेऊन लपवून ठेविले आणि जसजसी संधि मिळत गेली तसतसा या डायनेमाइट्सचा उपयोग करून शत्रूच्या रेल्वेलायनी, त्यांचे कारखाने, त्यांचे पूल

एकामागून एक उडवून द्यायला सुरवात केली ! अशा रीतीनें विजेतें सैन्य मेटाकुटीला आलें. या प्रकाराला आळा घालण्यासाठीं त्या गांवच्या नगर-पतीला आणि दुसऱ्या पुढाऱ्यांना जर्मनांनीं पकडून घेतलें आणि जर पुन: अशा प्रकारचें मोडतोडीचें ( Sabotage ) काम लोक करतील तर त्यांच्या पुढाऱ्यांना बंदूकीच्या गोळ्यांनीं ठार मारण्यांत येईल अशी दवंडी त्यांनीं शहरांत पिटवली. पण या दवंडीचा कांहींच परिणाम न होतां लोकांनीं आपलें विध्वंसाचें काम चालूच ठेवलें. विजेत्यांनीं लोकांच्या पुढाऱ्यांना गोळ्या घातल्या, पण त्यांच्या गोळ्यांच्या आवाजाचा प्रतिध्वनि शमतो न शमतो इतक्यांत गगनभेदी भडाका झाला आणि कोठें तरी कांहीं तरी विध्वंस झाला ! विजेत्यांची सर्व शक्ति आतां नष्ट झाली आणि ते शहर सोडून निघून गेले !!

वरील दोन्ही गोष्टींत एकच तत्त्व ग्रथित केलें गेलें आहे कीं, कोण्याही कितीही बलिष्ठ शत्रूनें आपल्या शस्त्रबलानें एखाद्या प्रजेला जिंकलें तरी त्या प्रजेवर त्या प्रजेच्या सहकाराशिवाय राज्य करणें विजेत्यांना शक्यच नाहीं. विजयासाठीं पुष्कळशी शक्ति खर्चूनही विजयाचें फळ भोगतां येत नाहीं, अशी त्या विजेत्याची खात्री झाली म्हणजे पुन: दुसरा प्रान्त जिंकण्याची त्याला इच्छाही राहणार नाहीं. "दुसऱ्यांना जिंकणारा मी विजेता आहें" हें समाधानही त्याला मिळत नाहीं, कारण कीं चिकट कागदाला ( fly paper ) जिंकायला निघालेल्या माश्यांप्रमाणें विजेताच स्वतःच्या जित प्रजेचा गुलाम बनून जातो. अशा परिस्थितींत विजयाची, देश पादाक्रान्त करण्याची इच्छा कोणाला होणार ? अशा विजयाचें महत्त्व तेव्हां असतें कीं जेव्हां जित राष्ट्रावर प्रभुत्व मिळवल्यानें विजेत्या राष्ट्राला भौतिक लाभ अपरंपार असतो. परंतु वर सांगितल्याप्रमाणें विजेत्याची स्थिति होईल तर त्या विजयापासून विजेत्याला कसलाच फायदा होणार नाहीं. मग अशा असहकारी प्रजेला जिंकायला तरी कोण निघणार ?

असहकाराच्या प्रचण्ड शस्त्राचा प्रभाव दुर्दैवानें पूर्णपणें आपल्या राष्ट्राला अनुभवायला मिळालाच नाहीं. १९२१ सालीं जी असहकाराची चळवळ गांधींनीं सुरू केली तिच्या अंगोपांगांचें सम्यग् पालन जनतेनें केलें नाहीं, म्हणून त्या चळवळीचा जो परिणाम व्हायला पाहिजे होता तो होऊं शकला नाहीं. शाळा–कॉलेजें, कोर्ट-कचेऱ्या, सरकारी नोकऱ्या आणि परदेशी माल हीं त्या असहकाराचीं चार अंगें होतीं. या चारही अंगांचें पुरतें पालन झालें असतें तर ब्रिटिश–साम्राज्यच काय प्रत्यक्ष ईश्वराच्या वरामुळें उन्मत्त झालेल्या रावणाचें

साम्राज्यही ढासळून पडलें असतें. पण राष्ट्र असहकाराचें हत्यार वापरायला त्या वेळीं तयार नव्हतें, म्हणून त्याचा व्हावा तो परिणाम झाला नाहीं. असहकाराचा कार्यक्रम यशस्वी झाला तर एका वर्षांत स्वराज्य मिळेल ही गांधींची घोषणा होती. असहकार सफल झाला नाहीं, म्हणून राष्ट्राला तयार करण्यासाठीं गांधींनी गांधीवादाचा विधायक कार्यक्रम राष्ट्रापुढें ठेवला. विधायक कार्यक्रमाची परिपूर्ति म्हणजे असहकाराची तयारी. तो विधायक कार्यक्रम आजही राष्ट्रापुढें आहेच. राष्ट्र जेव्हां तो कार्यक्रम पुरा करील तेव्हां असहकाराचें अमोघ अस्त्र हातांत घेण्याची त्याची तयारी होईल आणि मग पाहतां पाहतां देश स्वतंत्र होईल. अशा रीतीनें देश स्वतंत्र झाला म्हणजे ज्या असहकाराच्या बळावर देशानें स्वातंत्र्य मिळविलें त्याच्याच बळावर तें त्याला टिकवितांही येईल.

असहकाराच्याही दोन बाजू आहेत. एक सहकार न करणें, दुसरी अहिंसक प्रतिकार करणें. सहकार न करणें याचा अर्थ आपण वर चतुर्विध असहकारांत पाहिलाच. अहिंसक प्रतिकारांत (१) सविनय कायदेभंग (२) बहिष्कार आणि (३) कोणाही शत्रुपक्षाच्या मनुष्याची प्राणहानि न होईल अशा रीतीनें शत्रूच्या सत्तेला पोषक असणाऱ्या सर्व यंत्रादि सामग्रीचा आणि दळणवळणाच्या साधनांचा विध्वंस हे तीन कार्यक्रम येतात. अशा प्रकारें असहकार आणि अहिंसक प्रतिकार या दुहेरी शस्त्राचा उपयोग करण्याची शक्ति लोकांत आली तर हिटलरशाहीहून वरचढ अशी दुसरी शाही आली किंवा जपानासारखी सत्ता आली, तरी तिला हिंदुस्थानावर आपली सत्ता चालवणें शक्य होणार नाहीं.

पण यासाठीं लोकांना अहिंसक प्रतिकाराचें व्यवस्थित शिक्षण दिलें पाहिजे. तें शिक्षण जितक्या प्रमाणांत देतां येईल तितक्याच प्रमाणांत गांधीवादाच्या मार्गानें स्वातंत्र्यप्राप्ति होण्याची आणि स्वातंत्र्य टिकवूं शकण्याची शक्यता आहे. गांधीवादाच्या अंगोपांगांचें पुरतें आचरण होऊं शकलें, तर संपूर्ण निःशस्त्रीकरण करूनही परचक्रापासून हिंदुस्थान आपलें रक्षण करूं शकेल, ही गोष्ट तर्कबुद्धीला सहज पटण्यासारखी आहे.

यावर कोणी अशी शंका घेईल कीं मनुष्यस्वभाव पाहतां देशाची अशी तयारी करणें शक्यच नाहीं. ज्या प्रकारच्या असहकाराचें आणि अहिंसक प्रतिकाराचें चित्र वर रेखाटलें आहे, त्या प्रकारचा असहकार आणि अहिंसक प्रतिकार लोक करूं शकणार नाहींत. गांधींनी गेलीं २५ वर्षें आपलें सारें आयुष्य त्या पायीं खर्चीं घातलें तरीही राष्ट्र गांधीवादाच्या मार्गावर येऊं शकलें नाहीं,

मग यापुढें तरी तें तसें येईल, असें मानण्याला काय आधार आहे? ही शंका मानवी मानसशास्त्राचा विचार केला तर अस्थानीं आहे असें आढळून येईल. राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा प्रश्न २५ वर्षांच्या अल्पावधींत सुटणें कठीण आहे. गांधींचा मार्ग सोडून देऊन जगांतील सर्वच राष्ट्रें हिंसक प्रतिकाराचा जो मार्ग स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं घेतात, तो मार्ग जरी हिंदुस्थाननें घेतला असता तरी सुद्धां २५ वर्षांत काय झालें असतें? देशांतील १८ ते ४० वर्षांचा प्रत्येक तरुण लष्करी शिक्षण घेऊन शिपायी बनला पाहिजे. ज्यांच्याशीं सामना करावयाचा त्या राष्ट्रांपेक्षांही जास्त जय्यत अशी शस्त्रास्त्रांची सामग्री एकत्र केली पाहिजे; हिंसक प्रतिकारांतही जिवावर उदार होण्याची जी वृत्ति लागते ती राष्ट्रांतील सर्व सैनिकांत उत्पन्न झाली पाहिजे; स्वतःच्या बायकामुलांचा, संपत्तीचा, सुखसाधनांचा त्याग करण्याची तयारी राष्ट्रांतील तरुण वर्गांत आली पाहिजे. हें सर्व व्हावयाला काय कमी मेहनत पडली असती? आणि हें सर्व न व्हावें अशी सतत खबरदारी घेणारी परदेशी सत्ता जेव्हां देशावर राज्य करीत आहे तेव्हां हें सर्व करायचें तरी कसें? ही सर्व तयारी गुप्तपणें होऊं शकेल काय? शस्त्रास्त्रें कोठून आणायचीं? या सर्वांसाठीं लागणारा पैसा पुरविणारे जरी मिळाले, तरी तें सर्व देशांत येऊं कसें शकणार? त्या सर्वांचाच कबजा स्वातंत्र्य-विरोधी परकी सत्ता घेतल्याशिवाय राहील काय? आणि तसा कबजा घेऊन त्याच शस्त्रास्त्रांचा प्रजेच्याच विरुद्ध उपयोग केल्याशिवाय परकी सत्ता राहील काय?

याचे उलट अहिंसक प्रतिकारासाठीं समाजाला तयार करणें किती सोपें आहे! हल्लींच्या युद्धापायीं ब्रिटिशांना एका दिवसाचा जो खर्च येतो, तो जवळ जवळ १ कोटी पौंड म्हणजे १५ कोटी रुपये येतो असें मानून, इतके रुपये जर अहिंसक संघटनेसाठीं मिळाले तर किती कार्य होईल याचा विचार आपण करूं या. हिंदुस्थानांत सात लाख खेडीं आहेत. प्रत्येक खेड्यांत एक एक कार्यकर्ता पाठवावयाचा असें ठरविलें तर सात लाख कार्यकर्ते पाहिजेत. हिंदुस्थानच्या आजच्या स्थितींत कार्यकर्त्याला खेडेगांवांत सुखानें राहतां येईल या दृष्टीनें प्रत्येक कार्यकर्त्याला महिना ५० रुपये पगार दिला तर एका महिन्याला ७०००००×५०=३५०००००० म्हणजे साडेतीन कोटी रुपये लागणार. याशिवाय साधनसामग्रीचे पन्नास लाख रुपये धरले तर एका महिन्याचा खर्च चार कोटी रुपये येईल. म्हणजे चालू युद्धाच्या एका दिवसाच्या खर्चांत गांधी-

वादाच्या सिद्धान्ताप्रमाणें खेड्यांचें संघटन करण्याचें कार्य साऱ्या देशभर चार महिनेपर्यंत सतत चालेल ! यांत हिंदुस्थानचें एकही खेडें वगळलें जाणार नाहीं.

वरील आंकडे अशासाठीं दिले आहेत कीं हिंसक प्रतिकाराच्या तयारी-साठीं जो खर्च होतो त्याच्या मानानें अहिंसक प्रतिकाराचें शिक्षण राष्ट्राला देण्या-साठीं किती कमी खर्च येईल त्याची कल्पना वाचकांना बरोबर यावी. आज हिंदु-स्थानांत गांधीवादाच्या सिद्धान्ताप्रमाणें ग्रामसंघटन किती प्रमाणांत होत आहे ? प्रत्येक प्रांतांत ग्रामसेवक किती आहेत ? त्या पायीं किती पैसा खर्चला जातो ? किती खेड्यांतून ग्रामशिक्षणाचें काम चालू आहे ? या प्रश्नांचा विचार केला तर आपल्याला आढळून येईल कीं जें कार्य आपल्याला करावयाचें आहे त्या मानानें आपण कांहींच करूं शकलों नाहीं. मग गांधींना किंवा गांधीवादाला दोष देण्यांत काय अर्थ ? महत्त्वाचा प्रश्न हा आहे कीं कोणत्या मार्गानें राष्ट्राला तयार करणं जास्त सोपें आणि कमी धोक्याचें आहे ? याचें उत्तर ताबडतोब हेंच मिळेल कीं, गांधीवादाच्या मार्गानें राष्ट्राला तयार करण्यासाठीं पैसा कमी लागेल, त्याग कमी करावा लागेल आणि कार्यकर्त्यांची तशीच लोकांची हानिही कमी होईल. आणि इतक्या सुलभ रीतीनें तयारी होत असूनही स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं किंवा मिळविलेलें स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठीं लागणारी प्रचंड शक्ति राष्ट्रांत उत्पन्न होईल. इतकेंच नव्हे, तर युद्धानें शीर्ण विशीर्ण झालेल्या जगाला शांतीच्या मार्गानें स्वत्वाचें रक्षण करण्याचा मार्ग दाखवण्याचा अग्रमान भाग्यशाली भारतवर्षाला मिळेल.

वरील विवेचनानंतरही ज्यांना गांधीवादाच्या मार्गाची परिणामकारिता पटणार नाहीं, त्यांना हिंसक प्रतिकाराच्या दृष्टीनें तयार असलेल्या राष्ट्रांची काय स्थिति झाली त्याचा विचार करण्याची विनंति मी करितों. चीनसारखा प्रचंड देश असूनही जपाननें त्याची कशी स्थिति केली ! ऑस्ट्रिया, पोलंड, झेकोस्लोवाकिया, इटली, नॉर्वे, स्वीडन, वगैरे देशांची काय स्थिति झाली ? हिंसक प्रतिकारामध्यें ज्याची हिंसेची ताकत अधिक त्याचा विजय होणार. अशी हिंसक ताकत वाढवीत राहणें, हा आदर्श कोठल्याही राष्ट्रासाठीं इष्ट आहे काय ? त्यापेक्षां अहिंसक प्रतिकाराची शक्ति वाढविणें शतपटीनें श्रेयस्कर नाहीं काय ? "प्रतिपक्षांतील एकाही माणसाची प्राणहानि आम्ही करणार नाहीं" अशी ग्वाही सर्व जगाला देऊन राष्ट्र प्रतिकार—अहिंसक प्रतिकार—करूं लागेल, तर सारें जग आदरानें स्तिमित होऊन कौतुक पाहात राहणार नाहीं काय ?

या सर्व बाजूंनीं विचार केला असतां अहिंसक प्रतिकाराचें शस्त्र हिंसक प्रतिकाराच्या शस्त्रापेक्षां अनेकशः श्रेष्ठ आहे, हें कबूल करावें लागेल. मात्र प्रत्यक्ष प्रसंग आला असतां तें शस्त्र कशा रीतीनें वापरलें जाईल तें प्रसंग येईल तेव्हांच ठरविणें शक्य होईल.

# १३ युद्धें नाहींशीं होतील?

**आक्षेपः—** रावणाच्या काळापासून जगांत हिटलरशाही चालूच आहे आणि ती तशी राहाणारच. हिटलरशाही आहे तोंपर्यंत युद्धें टळत नाहींत. तेव्हां जगांतून युद्धें नाहींशीं होतील अशी आशा बाळगणें व्यर्थ आहे.

**उत्तरः—** जगांत रावण किंवा हिटलर नेहमीं राहाणार यांत शंका नाहीं. पण रावणशाही किंवा हिटलरशाही राहूं शकेलच असें म्हणतां येणार नाहीं. जगाचा इतिहास पाहिला तर प्राचीन काळीं लहान लहान मानवसमाज आपापले हितसंबंध संभाळून राहात असत. आणि त्या हितसंबंधांत विरोध आला तर आंतल्या आंत लढून कांहीं तरी निवाडा करण्याचा प्रयत्न करीत असत. हिंदुस्थानच्या इतिहासांतहीं आपल्याला हेंच आढळून येतें. शिंदे, होळकर, गायकवाड, भोसले, पेशवे, निझाम, नबाब, मोगल, पिंढारी, वगैरेंच्या संघटित शक्त्या एकमेकांशीं अखंड लढत होत्या. पण जेव्हांपासून हिंदुस्थानांत एक मध्यस्थ प्रबळ सत्ता स्थापन झाली आहे, तेव्हांपासून या सर्वांचे आपापसांतील कलह शांत झाले आहेत. याचें कारण त्यांच्या कलहाचा निवाडा शांत रीतीनें केन्द्रस्थ सत्तेनें नेमलेलीं न्यायासनें लावून देतील अशी खात्री त्या सर्वांना आहे. आज केन्द्रस्थ सत्ता परकीयांची आहे ती जाऊन त्या जागीं हिंदवासीयांचीच आली तरी या स्थितींत कांहींच फरक पडणार नाहीं. याचा अर्थ असा झाला कीं, युद्धाच्या क्षेत्राचीं जीं जीं लहान लहान वर्तुळें हिंदुस्थानांत होतीं तीं आतां नाहींशीं झालीं असून हिंदुस्थानापुढें जर लढाईचा प्रश्न आला तर तो दुसऱ्या राष्ट्राशीं लढण्यापुरताच येणार. म्हणजे हिंदुस्थानापुरताच विचार केला तर हिंदुस्थानांतून आंतरिक युद्ध नाहींसें झालें आहे, असें म्हणता येईल. जी स्थिति हिंदुस्थानची, तीच इंग्लंडची, जर्मनीची, रशियाची आज आहे. तीच अमेरिकेचीही आहे. युद्धें नाहींशीं झालीं नाहींत

तरी युद्धाचीं लहान लहान वर्तुळें नाहींशीं होऊन त्यांचे ऐवजीं मोठीं वर्तुळें झालीं आहेत, इतकें कबूल करावेंच लागेल.

या लहान वर्तुळांतून मोठीं वर्तुळें बनविण्यासाठीं जो मार्ग घेतला, त्याच मार्गानें या मोठ्या वर्तुळांना एकत्रित करून त्या सर्वांचें एकच अविभाज्य वर्तुळ बनविणेंही शक्य झालें पाहिजे. ज्याप्रमाणें इंग्लंडच्या पार्लमेंटच्या सत्तेचें प्रभुत्व इंग्लंड, स्कॉटलंड, वेल्स या तीन्ही प्रांतांच्या प्रजेनें स्वीकारलें आहे, ज्याप्रमाणें दिल्लीच्या व्हाईसरॉयचें प्रभुत्व सर्व प्रांतांनी आणि शिंदे, होळकर, गायकवाड, भोसले, पटवर्धन, निझाम वगैरेंनीं स्वीकारलें आहे, त्याचप्रमाणें एका प्रबळ जागतिक केन्द्र-संस्थेचें प्रभुत्व इंग्लंड, अमेरिका, हिंदुस्थान, चीन, जपान, जर्मनी, फ्रान्स वगैरेंनीं स्वीकारावें, यांत अशक्य असें कांहींच नाहीं. आज तसें तें स्वीकारलें गेलें नाहीं, म्हणून कधींही स्वीकारलें जाणार नाहीं असें नव्हे. वर्सेलीसच्या तहानंतर अमेरिकेच्या प्रेसिडेन्ट विलसननें राष्ट्रसंघाची ( League of Nations ) जी योजना सुचविली तिचा बहुतेक सर्व राष्ट्रांनी स्वीकार केला. त्यांतून जो राष्ट्रसंघ निर्माण झाला, तो प्रभावशाली होऊं शकला नाहीं म्हणूनच हें दुसरें युद्ध होऊं शकलें. पण एकदां राष्ट्रसंघ निष्फळ झाला, म्हणून पुन्हां तो प्रभावशाली होऊन सफळ होणार नाहीं असें कां मानावें ? लढाया टाळतां आल्या तर बरें असें सर्व राष्ट्रांना वाटत नाहीं काय ? लढायांमुळें जो अनन्वित संहार होतो तो कोणत्या राष्ट्राला पाहिजे ? मग शांतीच्या मार्गानें आपापसांतील कलहांचा अंत येऊं शकेल तर राष्ट्रें त्याचा स्वीकार कां नाहीं करणार ?

या युद्धानंतर एक केन्द्रस्थ राष्ट्रसंघ निर्माण करणें अशक्य नाहीं. तो राष्ट्रसंघ खरोखर प्रभावशाली होईल असें करणेंही अशक्य नाहीं. असा प्रभावशाली राष्ट्रसंघ निर्माण होऊन त्याचें प्रभुत्व सर्व राष्ट्रांनीं स्वीकारलें म्हणजे राष्ट्राराष्ट्रांतील हितसंबंधांच्या विरोधांचा निवाडा राष्ट्रसंघानें स्थापन केलेल्या न्यायासनाकरवीं दिला जाईल. मग दुसऱ्या राष्ट्रापासून स्वतःचें रक्षण करण्यासाठीं किंवा दुसऱ्या राष्ट्राला खाऊन जाण्यासाठीं मोठीं मोठीं लश्करें आणि युद्धसाधनें बाळगण्याची कोणत्याही राष्ट्राला गरज भासणार नाहीं. लश्कर लागलेंच तर राष्ट्राच्या आंतरिक शांतीसाठीं लहानसें राहील. तें लश्कर कसलें ? तें सशस्त्र पोलीस खातेंच असेल. ज्याप्रमाणें दोन पक्षकार लढत असले म्हणजे त्यांच्या लढाईचा निकाल कोर्ट देतें आणि कोर्टाच्या मागें शस्त्रांचें पाठबळ असल्यामुळें दोन्ही पक्ष तो निकाल मान्य करतात, त्याचप्रमाणें दोन राष्ट्रांतील झगड्याचा

निकाल राष्ट्रसंघाचें न्यायासन देईल आणि त्या न्यायासनाचे मागें सर्व राष्ट्रांनीं स्वीकारलेल्या शक्तीचें पाठबळ असल्यामुळें तो निकाल झगडणाऱ्या राष्ट्रांना स्वीकारावाही लागेल. लष्करी शक्ति फक्त राष्ट्रसंघाजवळ राहील. सर्वच राष्ट्रांत निःशस्त्रीकरण झाल्यावर आपापसांत लढण्याची इच्छा झाली तरी त्यांना लढतां येणार नाहीं, अशी स्थिति होऊं शकेल. असें झालें म्हणजे युद्धें टळतील.

अर्थातच, हें सर्व शक्य आहे. असें होईलच कीं नाहीं हें कोणीं सांगावें? त्याचा आधार सर्व राष्ट्रांतील विचारी लोकांच्या शहाणपणावर आहे. चालू युद्ध पुरें झाल्यानंतर सर्व राष्ट्रांचे पुढारी एकत्र जमतील तेव्हां त्यांना काय सुचेल कोणीं सांगावें? झाला तेवढ्या विध्वंसानें सर्वांचे डोळे उघडून युद्धाचा मार्ग आत्मघातक आहे असें सर्वांना पटलें, तर केन्द्रस्थ प्रबळ राष्ट्रसंघाची निर्मिति सर्व मिळून करतील आणि भविष्यकाळीं युद्धें टळतील. नाहीं तर युद्धें पुनः होतील. पण युद्धें टळणारच नाहींत असें म्हणणें बरोबर नाहीं. जगाच्या इतिहासाचा एकंदर क्रम पाहातां युद्धाचा मार्ग काढून टाकून त्याऐवजीं शांतीच्या मार्गानें झगड्यांचा निकाल लावावा, ही वृत्ति जगांतील सर्वच राष्ट्रांत वाढत्या प्रमाणांत दिसून येत आहे हें सुचिह्न आशाजनक आहे.

## १४ यंत्रांना विरोध कां?

**आक्षेपः—** गांधीवाद यंत्रांचा विरोध करितो. पण जगाची प्रगति इतकी झाली आहे कीं यंत्रांना मागें हटविणें शक्य नाहीं आणि इष्ट पण नाहीं.

**उत्तरः—** गांधीवाद यंत्रांचा विरोध करतो, पण कोणत्या यंत्रांचा? जीं यंत्रें मनुष्याचें स्थान घेऊन मनुष्याला बेकार करून सोडतात, त्या यंत्रांचा विरोध गांधीवाद करतो, दुसऱ्या नाहीं. उदाहरणार्थ, गांधीवादाचा शिवण्याच्या यंत्राला विरोध नाहीं. सिंगर किंवा फाफचें मशीन माणसावांचून चालत नाहीं. म्हणून तें मशीन गांधीवादाला स्वीकार्य आहे. पण गिरणींतील सूत कातण्याचें किंवा कापड विणण्याचें यंत्र मनुष्याच्या क्रियाशक्तीचें स्थान स्वतः घेतें म्हणून त्या यंत्राला गांधीवादाचा विरोध आहे. हातानें सूत कातण्याच्या रहाटाला गांधीवादाचा विरोध नाहीं, इतकेंच नव्हे तर तो रहाट जास्तींत जास्त सूत उत्पन्न करूं शकेल अशी त्याची शक्ति

वाढवावी या दृष्टीनें चरखासंघ सतत प्रयत्नशील आहे. त्यासाठीं एक लाख रुपयांचें बक्षीसही चरखासंघानें काढलें होतें, ही गोष्ट सुविख्यात आहे.

आतां गांधीवाद माणसांची जागा घेणाऱ्या यंत्रांचा तरी विरोध कां करतो, हा प्रश्न फारच महत्त्वाचा आहे. अशा यंत्रांमुळें माणसें बेकार होतात म्हणून. अशा यंत्रांमुळें हिंदुस्थानाचें गोधन नष्ट झालें आहे म्हणून. आपण अशी कल्पना करूं या कीं एखाद्या गांवांत १००० एकर जमीन आहे. ही सर्व जमीन नांगरण्यासाठीं प्रत्येक शेतकरी आपल्या घरीं एकापासून चार पर्यंत बैल ठेवतो. त्यासाठीं शेतकऱ्याला एकापासून चार-पांचपर्यंत मजूर किंवा नोकरही ठेवावे लागतात. या ऐवजीं जर एकच ट्रॅक्टर गांवांत आणून ठेवला तर सारी जमीन तो ट्रॅक्टरच नांगरून टाकील आणि किती तरी बैल बेकार होऊन जातील. त्याबरोबरच किती तरी माणसेंही! त्यामुळें बैलांच्या उपजीविकेचें साधन नष्ट झाल्यामुळें बैलांची जात दिवसेंदिवस कमी होत जाऊन शेवटीं नष्ट होऊन जाईल. ट्रॅक्टरच्या बरोबरच पेरणी, कापणी वगैरेंचीं यंत्रेंही येणारच. मग शेतकऱ्याचें काम अगदीं सोपें होऊन, या कामावर ज्या मजूरांना तो गुंतवूं शकतो ते मजूर बेकार होतील. त्या सर्वांच्या पोषणाचें साधन नाहींसें झालें म्हणजे समाजाच्या विषमतेंत भर पडेल, समाज जास्त दुःखी होईल. यंत्रांमुळें असंख्य लोकांची रोजी नाहींशी झाल्याचीं अनेक उदाहरणें आपल्याला सांपडतील. पूर्वी घरोघर सुताचे रहाट चालत असत तेव्हां प्रत्येक घर आपलें कापड निर्माण करीत असे. त्याचे ऐवजीं सुताच्या गिरण्या झाल्यापासून घरांतील रहाट नाहींसा झाला आणि ग्रामवासीयांना बाहेरच्या तयार कापडावर विसंबून राहावें लागलें. त्यामुळें पुष्कळच महाग कापड त्याला घ्यावें लागतें. जी गोष्ट कापडाची, तीच गोष्ट वहाणा, बूट, वगैरेंची. गांवांत दरवर्षी जनावरें मरतात. त्यांच्या चामड्यांतून गांवाला पुरेशा वहाणा वगैरे गांवचेच चांभार निर्माण करीत असत. आतां या सर्वांसाठीं यंत्रें आणि कारखाने झाल्यामुळें गांवच्या चांभारांची रोजी नष्ट झाली आहे आणि हळु हळु यंत्रानें तयार झालेला माल खेड्यापाड्यांत घुसूं लागला आहे. हीच गोष्ट कोष्ट्यांची. यंत्रांवर कापड विणलें जातें म्हणून कोष्टी बेकार झाले. शेंगांतून किंवा तिळांतून तेल काढण्याच्या गिरण्या निघाल्यापासून गांवचे तेली बेकार झाले आहेत. अशा प्रकारें कोष्टी, पिंजारी, तेली, चांभार वगैरे गांवचे कामगार एकामागून एक बेकार होऊन गेल्यामुळें त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न कठिण होऊन

गेला आहे. पोटासाठीं हे लोक शहराकडे धांव घेतात. पण शहरांतील कारखाने किती जणाला काम देणार ? त्यामुळें या सर्वांच्या पदरीं उपासमार आली आहे. यंत्रांमुळें खेड्याचें सारें धन शहरांत खेचलें जाऊन हिंदुस्थानचीं खेडीं दिवसेंदिवस जास्त जास्त कंगाल होत चाललीं आहेत. हिंदुस्थानाचें दारिद्य नाहींसें करावयाचें असेल तर खेड्यांतील जे उद्योगधंदे यंत्रांमुळें नाहींसे झाले आहेत त्यांचें पुनरुज्जीवन केलें पाहिजे, असें गांधीवादाचें म्हणणें आहे आणि त्याच दृष्टीनें ग्रामसंघटनेंत चरखा आणि इतर ग्रामोद्योगांना प्रमुख स्थान दिलें जात आहे.

आतां जगाच्या प्रगतींत यंत्रें नाहींशीं करणें शक्य आहे कीं नाहीं, तें पाहूं या. सर्वच यंत्रें नाहींशीं करणें शक्य नाहीं, ही गोष्ट खरी आहे. तशीं तीं नाहींशीं करण्याची आवश्यकताही नाहीं. उदाहरणार्थ, वाहतुकीचीं साधनें. वाहतुकीच्या साधनांमुळें बेकारी वाढते असें जेथें आढळून येतें, तेथें त्या साधनांचा विरोध गांधीवाद करतो. पण अशी बेकारी ज्यांमुळें वाढत नाहीं त्या साधनांचा विरोध गांधीवादाला नाहीं. उदाहरणार्थ, मोटारीच घेऊं या. मोटारीचा दोन प्रकारें उपयोग होतो. एक मालाची नेआण करण्यासाठीं आणि दुसरा माणसांच्या प्रवासासाठीं. मालाच्या ने-आणींत मोटारीनें बैलगाड्यांचें स्थान घेतल्यापासून शेतकऱ्यांचें धन विनाकारण मोटारवाल्यांच्या घरीं जाऊं लागलें आहे. म्हणून खेड्यांतील वाहतुकीचें साधन या दृष्टीनें मोटारी विघातक आहेत. मोटारींशिवायही ही वाहतुक फारच व्यवस्थितपणें होऊं शकते आणि त्यामुळें शेतकरी कसलाही खर्च केल्याशिवाय आपला माल खेड्यांतून जवळपासच्या शहरीं पाठवूं शकतो. त्या ठिकाणीं मोटार आणण्याचें कारण काय? शेतकऱ्याचे बैल मोटारीमुळें रिकामे बसले, तर शेतकऱ्याला त्या बैलांना फुकट खायला घालणें शक्य होत नाहीं. म्हणून बैलांची संख्या दिवसेंदिवस कमी होत जात आहे. बैलांचें पोषण करण्यासाठीं शेतकऱ्याला निराळा खर्च करावाच लागत नाहीं. त्याच्या चालू शेतीवरच बैलांचा निर्वाह होऊं शकतो. असें बिनखर्चाचें वाहतुकीचें साधन काढून टाकून, कोण्या तरी भांडवलवाल्या मोटारीच्या मालकाला प्रत्येक वेळीं भाडें भरीत बसायची पाळी शेतकऱ्यावर आल्यामुळें, त्याच्या शेतीवर फारच ताण पडतो आणि हिंदुस्थानची शेती दिवसेंदिवस नुकसानीचा धंदा होत चालली आहे. जेथें जेथें यंत्रें आलीं तेथें तेथें बेकारी वाढली आहे आणि खेड्याच्या लोकांवर अनेक प्रकारचे खर्च येऊन पडले आहेत. खेड्यांतून स्टेशनवर जाण्या-

साठीं जेथें मोटारी झाल्या आहेत, तेथें कारणाशिवाय प्रवास करण्याची संवय लोकांना लागून त्यामुळें खर्चही बेसुमार वाढला आहे. खेड्यांतील मोटार सर्व्हिसी पाहिल्या म्हणजे, नको हीं यंत्रें आणि नको ही गुलामी असेंच माणसाला होऊन जातें ! एका मोटारींत वीस माणसें बसावयाची जागा असेल तेथें पन्नास साठ माणसें ठासून भरायचीं आणि आठ दहा मैल अंतर अशा प्रकारें भयंकर गैरसोयींत बसून खेड्यांतील लोकांनीं स्टेशनवर किंवा शेजारच्या गांवीं जावयाचें! आणि याबद्दल मोटारवाल्याला मागेल तेवढे पैसे द्यावयाचे ! या मोटारींमुळें खेड्याला काय फायदा झाला ? पूर्वी घरोघर एक्के होते, गाड्या होत्या. कोठेंही जायचें झालें कीं एक्का किंवा गाडी जोडून शेतकरी आनंदानें जात असत, आणि त्यासाठीं खर्च कांहींच नाहीं ! बरें लांबचा प्रवास सहजासहजीं करण्याची वृत्तिच होत नसे. पण आतां सिनेमा पाहण्यासाठीं म्हणूनही खेड्याचे लोक शहराचा प्रवास करतात आणि एकाच खेपेंत दोन तीन रुपयांचें पाणी करून टाकतात ! !

हीं सर्व यंत्रें खेड्यांतून नाहींशीं करणें अगदीं शक्य आहे. सरकारी कायद्यानेंच ही गोष्ट घडवून आणतां येईल आणि असें करणें अत्यंत इष्ट आहे. त्यामुळें खेड्यांतील लोकांचा पैसा कितीतरी वांचेल. कित्येक वेळां असें करुण दृश्य पाहायला मिळतें कीं एखादा खेड्यांतील मनुष्य स्टेशनवर जातो आणि गाडी चुकतो. त्याला पांच किंवा दहा मैलच जायचें असतें. त्याचे जवळ सामानही फारसें नसतें. गाडी चुकली म्हणजे जवळ जवळ सात आठ तास त्याला दुसरी गाडी नसते. अशा स्थितींत तो मनुष्य दुसऱ्या गाडीची वाट पाहात स्टेशनवर बसून रहातो. त्याला असें वाटत नाहीं कीं हे दहा मैल आहेत, आपण तीन तासांत कापून काढूं. तो आपला सारा दिवस तेथें फुकट घालवतो, हॉटेलचे पैसे खर्चतो, गाडीचें भाडें भरतो आणि या सर्वांच्या बदल्यांत काय मिळवतो ? तर त्याचेमध्यें चालण्याची जी शक्ति होती ती गमावून बसतो ! ही परिस्थिति कल्याणप्रद आहे असें कोण म्हणेल ? आपण दुसरें दृश्य घेऊं या. पूर्वी घरोघर जातीं होतीं आणि श्रीमंत गणल्या जाणाऱ्या कुटुंबांतील बायकाही पहांटे उठून आपल्या घरापुरतें दळीत असत. आतां खेडोपाडीं पिठाच्या गिरण्या निघाल्यापासून गिरण्यांतून बायांच्या रांगा लागतात. बाया तेथें तीन तीन चार चार तास बसून राहतात आणि पीठ दळण्याचे पैसे देऊन पीठ दळवून घेतात. घरीं पीठ दळल्यामुळें जी मेहनत होत असे

आणि त्यामुळें आरोग्यरक्षणाला जी मदत होत असे, ती जाऊन तिच्या जागीं ऐदीपणा येऊन पुन्हां दळण्याचा खर्चेही जास्तीचा होतो, हा पिठांच्या गिरण्याचा परिणाम आपल्याला दिसून येतो. या गिरण्या काढून टाकल्या तर लोकांचें तिळमात्रही नुकसान नाहीं. उलट जात्यावर दळलेलें पीठ जास्त पौष्टिक असल्यामुळे आणि पहांटेच्या वेळीं जात्याचा व्यायाम नियमित रीतीनें मिळाल्यामुळें गांवच्या लोकांचें आरोग्य अधिक संभाळलें जाईल.

अशीं अनेक उदाहरणें देतां येतील. पण अधिक उदाहरणांची आवश्यकताच नाहीं. हिंदुस्थानच्या खेड्यांच्या दृष्टीनें तर यंत्रें अत्यंत विनाशक झालींच आहेत, यांत शंका नाहीं. आतां राहतां राहिला शहरांचा प्रश्न. शहरांतील जीवन निराळ्याच प्रकारचें असल्यामुळें तेथें यंत्रांना, विशेषतः वाहतुकीच्या साधनांना स्थान राहाणारच. बाकी गांधीवादाच्या दृष्टीनें शहरांची आजची रचनाच विघातक तत्त्वांवर आहे. शहरें म्हणजे खेड्यांतील संपत्तीचें शोषण करणारीं स्थानें अशी जी परिस्थिति आहे, ती गांधीवादाला स्वीकार्य नाहीं. शहरें खेड्यांतील संपत्तीच्या विनिमयाचीं द्वारें आणि संस्कृतीचीं केन्द्रें बनलीं पाहिजेत, हा गांधीवादाचा आदर्श आहे. शहरांतील यंत्रानीं चालणाऱ्या कारखान्यांमुळें व्यापारामुळें, आणि नोकरीधंद्यामुळें खेड्यांतील निवडक बुद्धिशाली लोक खेडीं सोडून शहराकडे धाव घेतात, ही परिस्थिति अनिष्ट आहे. खेड्यांची बुद्धि आणि संपत्ति खेड्यांतच राहील अशी शहरांची रचना गांधीवाद करूं पहातो. त्यामुळें गांधीवादाच्या कल्पनेप्रमाणें रचल्या जाणाऱ्या शहरांत आजच्या प्रमाणें यंत्रांना अवास्तव स्थान राहणार नाहीं. जीं कामें माणसाच्या हातानें होणें शक्यच नाहीं, अशा कामासाठीं यंत्रांची मदत घेणें सयुक्तिक आहे. पण जेथें तेथें यंत्रें आल्यामुळें हिंदुस्थानच्या जनतेचें अपरंपार नुकसान झालें आहे. गांधीवाद याच दृष्टीनें यंत्रांचा विरोधी आहे.

## १५ "सुताच्या धाग्यानें स्वराज्य ?"

**आक्षेपः—** "सुताच्या धाग्यानें स्वराज्य" हा गांधीवादाचा मंत्र अतिशयोक्तिपूर्ण व वेडेपणाचा द्योतक आहे.

**उत्तरः—** गांधीवाद ही विशिष्ट विचारसरणी आहे. ती स्वराज्यप्राप्तीचें साधनच केवळ आहे असें नव्हे. गांधीवाद फक्त

हिंदुस्थानापुरताच नसून जगासाठीं आहे. आज जगांत जी समाजरचना आहे ती अन्यायाची आहे; तिच्या जागीं न्यायावर रचलेली समाजरचना स्थापण्याचा प्रयत्न समाजवादानें केला आहे. तोच प्रयत्न गांधीवादाचाही आहे. तेव्हां गांधीवादाला हिंदुस्थानच्या स्वराज्यप्राप्तीचें साधन असें मर्यादित स्वरूप देणें हें बरोबर नाहीं. " सुताच्या धाग्यानें स्वराज्य " हा मंत्र गांधींनीं दिला आहे आणि तो गांधीवादाच्या सिद्धान्ताला अनुसरून आहे. हिंदुस्थानांत स्वराज्यस्थापना झाल्यानंतर " सुताच्या धाग्यानें स्वराज्य " हें त्या मंत्राचें स्वरूप आपोआपच बदलेल. " सुताच्या धाग्यानें सुख, शांति आणि समता " असें कांहीं तरी त्याचें स्वरूप राहील. या मंत्रांतील महत्त्वाचा भाग सुताचा धागा आहे. त्या धाग्यानें स्वराज्यसिद्धि होईल, त्याचप्रमाणें स्वराज्यसिद्धी-नंतर स्वराज्यरक्षाही होईल, हा गांधीवादाचा विश्वास आहे. हा मंत्र अति-शयोक्तिपूर्ण आहे किंवा काय हें आतां पाहूं या.

सूत म्हणजे हाताच्या श्रमानें उगवलेल्या कापसांतून, हातानें पेळू बनवून रहाटावर हातानें कातलेलें सूत. अशा सुतानें स्वराज्य मिळेल अशी घोषणा गांधींनीं अनेक वार केली आहे.

सूत म्हणजे खादी. सूत घरोघर उत्पन्न झालें पाहिजे आणि त्या सुतां-तून प्रत्येक खेड्यांत हातमागावर खादी उत्पन्न झाली पाहिजे, हें गांधींच्या रचनात्मक कार्यक्रमाचें अत्यंत महत्त्वाचें अंग आहे. या बाबतींत, हिंदुस्थानचा प्रत्येक मनुष्य अशा रीतीनें खादीधारी झाला तरी त्यामुळें जबरदस्त ब्रिटिश साम्राज्याची हिंदुस्थानावरची पकड कशी सुटणार, हा प्रश्न आक्षेपकापुढें उभा राहणें स्वाभाविक आहे. पण हें वरवर विचार करणाऱ्यालाच वाटणार; ज्यांनीं खादीच्या चळवळीचें खरें रहस्य जाणलें आहे, त्यांना अशी शंका येणें शक्य नाहीं. खादी म्हणजे ग्रामोद्योगाचें प्रतीक. एक खादी गांवांत दाखल झाली कीं तिच्या मागोमाग दुसऱ्या अनेक गोष्टी आपोआपच येतात. खादीचें हेंच वैशिष्ट्य आहे. एका दंतकथेंत एका अंधळ्यावर देव प्रसन्न झाला तेव्हां त्यानें देवापाशीं वर मागितला, " नातवाला राजा झालेलें मीं पहावें. " त्यानें मागितला एकच वर. पण त्यांत त्यानें कितीतरी गोष्टी मागितल्या. त्यानें नातवंड मागितलें म्हणजे स्वतःचें लग्न होऊन मुलाबाळांचा संसार थाटावा हें मागितलें. नातवंडानें राजसिंहासनावर बसावें असें मागितलें यांत सर्वोच्च वैभव मागितलें. त्याला राजा झालेलें मीं पाहावें असें म्हणून त्यानें आपली

दृष्टि परत मागितली आणि नातू मोठा होऊन गादीवर बसेपर्यंत स्वतः जगावें हें सूचित करून त्यानें दीर्घायुष्यही मागितलें! एकाच मागणींत त्यानें इतकें सर्व मागितलें हें त्याच्या तीव्र बुद्धीचें द्योतक आहे. त्याचप्रमाणें "खादीनें स्वराज्य" हा मंत्र देण्यांत गांधींनी किती तरी गोष्टी सांगितल्या आहेत. खादी म्हणजे साधेपणा आणि काटकसर; खादी म्हणजे सच्चाई; खादी म्हणजे सेवावृत्ति; खादी म्हणजे स्वराज्यासाठीं लढण्याची दीक्षा; खादी म्हणजे शरीर-श्रमाची आवड; खादी म्हणजे भांडवलशाहीचा नाश; खादी म्हणजे यंत्रांच्या गुलामींतून मुक्ति; खादी म्हणजे स्वावलंबन; खादी म्हणजे स्वराज्यसेवेचा गणवेष; खादी म्हणजे गरीबांशीं तादात्म्य; वगैरे गुणांचा विकास खादीच्या प्रचाराबरोबर आपोआपच होतो ही गोष्ट आतां अनुभवसिद्ध आहे. आचार्य कृपलानींना एका सभेंत एका श्रोत्यानें प्रश्न विचारला, "सुतानें स्वराज्य कसें मिळेल हें कळत नाहीं, तें समजवाल काय?" कृपलानींनीं त्याला उत्तर दिलें, "विमानांच्या द्वारें लढाई करणारें वैमानिक दल तयार करते वेळीं त्यांना विमान चालविण्याविषयींचें किंवा वैमानिक युद्धाचें ज्ञान देण्यापूर्वींच जमिनीवर तालबद्ध कूच कशी करायची याचें शिक्षण देण्यांत येतें. तें शिक्षण कशासाठीं दिलें जातें? विमानांत उड्डाण करणाऱ्याला जमिनीवर 'डावा–उजवा, डावा–उजवा' असे पाय उचलून तालबद्ध कवायत करण्याची काय जरूर आहे? 'या तालबद्ध कवायतीचा आणि वैमानिक युद्धाचा कांहींच संबंध नाहीं,' असें वैमानिक दलाच्या सैनिकानें म्हटलें तर आपण त्याला काय उत्तर देऊं? आपण त्याला म्हणूं, 'बाबारे, तो संबंध तुला आज कळणार नाहीं. तूं प्रत्यक्ष वैमानिक होशील तेव्हां तुला आपोआप कळेल. तुझ्यासाठीं ज्यांनीं हा अभ्यासक्रम ठरविला आहे, त्यांनीं अनुभवानें पाहिलें आहे कीं डाव्या-उजव्याची कूच ही आकाशांतील उड्डाणासाठीं अपरिहार्य आहे. म्हणून तुझें कर्तव्य 'हें असें कां?' असें विचारण्याचें नसून, पुढें ठेवलेला अभ्यासक्रम निष्ठेनें पुरा करण्याचें आहे, वैमानिकाच्या बाबतींत ज्याप्रमाणें कवायत, त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या अहिंसक स्वराज्यसैनिकाच्या बाबतींत सूत काढण्याची क्रिया आहे. सूत काढणें आणि स्वराज्यप्राप्ति यांचा संबंध सैनि-काला प्रारंभीं कळणें शक्य नाहीं. तो सूत काढूं लागला आणि संपूर्ण खादीधारी झाला म्हणजे त्याला आपोआपच त्याचें महत्त्व समजेल. एक सैनिक म्हणून

त्यानें त्याच्यासाठीं सेनापतीनें सूत कातण्याची जी कवायत नक्की केली आहे ती निष्ठापूर्वक केलीच पाहिजे. ”

कृपलानींनीं दिलेलें उत्तर अत्यंत अर्थपूर्ण आहे. या उत्तरांत त्यांनीं शिस्तीवर भार देऊन सैनिकाचें कर्तव्य काय आहे हें सांगितलें आहे. पण खरोखर सुताचा स्वराज्याशीं काय संबंध आहे, हें स्पष्टपणें कळण्याइतकी सामग्री आपल्याजवळ आहे. गेल्या बावीस वर्षांत खादीच्या चळवळीनें जी प्रगति केली आहे, तिचा विचार केला असतां आपल्याला सुताचा स्वराज्याशीं काय संबंध आहे हें स्पष्टपणें दिसून येईल.

रोगनिवारणाच्या दोन पद्धति वैद्यकशास्त्रांत आहेत. एक एसेप्टिक आणि दुसरी ॲन्टीसेप्टिक. यांपैकीं ॲन्टीसेप्टिक पद्धतीनें रोगाच्या जंतूंचा प्रत्यक्ष नाश केला जातो. एसेप्टिक पद्धतीनें मनुष्याच्या रक्तपेशींची शक्ति इतकी वाढविली जाते कीं रोगाच्या जंतूंचा मनुष्याचे शरीरावर परिणामच होऊं नये. यांपैकीं कोणत्या पद्धतीचा केव्हां उपयोग करावयाचा हें डॉक्टर लोक ठरवितात. बहुधा दीर्घकालीन रोगावर एसेप्टिक पद्धतीचे इलाज केले जातात आणि एकदम येऊन वेगानें वाढणाऱ्या रोगावर ॲंटिसेप्टिक पद्धतीचा इलाज केला जातो. गांधीवादानें स्वराज्यसिद्धीचा जो मार्ग दाखविला आहे, त्याचींही अशींच दोन अंगें आहेत. एक अहिंसक विरोधाचा मार्ग आणि दुसरा रचनात्मक कार्यक्रमाचा. जेथें जेथें अन्याय दिसेल आणि त्याच्याशीं वेगानें सामना करून न्याय स्थापन करावयाचा असेल तेथें तेथें सत्याग्रहात्मक अहिंसक विरोध किंवा सविनय कायदेभंगाचें हत्यार वापरावें असा गांधीवादाचा आदेश आहे. आणि समाजांत अनेक वर्षांपासून घर करून बसलेले रोग असतील त्यांना दूर करण्यासाठीं रचनात्मक कार्यक्रम गांधींनीं सुचविला आहे. रचनात्मक कार्यक्रम म्हणजे बैठी क्रान्ति. हिंदुस्थानच्या जनतेच्या निर्बळतेमुळेंच परदेशी साम्राज्य हिंदुस्थानावर लादलें गेलें आहे; ती निर्बलता नाहींशी करणें हा रचनात्मक कार्यक्रमाचा हेतु आहे. सविनय कायदेभंगाच्या सुव्यवस्थित आणि दीर्घकालीन चळवळीमुळें जुल्मी सत्ता हतबल होऊन आपलें वर्चस्व सोडून देईल, हा जसा गांधीवादाचा हिशोब आहे, त्याचप्रमाणें रचनात्मक कार्यक्रमाच्या सिद्धीमुळें परकी सत्तेच्या ऐवजीं लोकांची सत्ता आपोआप स्थापन होईल, हाही गांधीवादाचा हिशोब आहे. स्वतः गांधींनींच या बाबतींत रचनात्मक कार्यक्रमावरील आपल्या पत्रिकेंत म्हटलें आहे कीं—

*“ रचनात्मक कार्यक्रम म्हणजे काय हें दुसऱ्या शब्दांत व अधिक समर्पक रीतीनें सांगावयाचें झाल्यास, सत्य व अहिंसात्मक साधनांनीं संपूर्ण स्वराज्याचें रचनाकार्य असें म्हणतां येईल........ संपूर्ण रचनात्मक कार्यक्रमाची योजना वाचकांनीं डोळ्यापुढें उभी करावी म्हणजे त्यांना माझ्याप्रमाणेंच दिसून येईल कीं, रचनात्मक कार्यक्रम जर आपण यशस्वी रीतीनें अमलांत आणूं शकलों तर अंतीं आपणास पाहिजे असलेल्या स्वरूपाचें स्वातंत्र्य आपणांस मिळेल. ”*

गांधींचें वरील वचन “ सुताच्या धाग्यानें स्वराज्य या सूत्राचें स्पष्टीकरण आपल्याला देत आहे. गांधींनीं दुसऱ्या ठिकाणीं असें सांगितलें आहे कीं, ग्रामोद्योग म्हणजे एक सूर्यमंडळ कल्पिलें तर चरखा हा त्यांतील सूर्य असून इतर ग्रामोद्योग हे त्याचे आसपास फिरणारे ग्रह आणि उपग्रह आहेत. यावरून “ सुताच्या धाग्यानें स्वराज्य ” याचा अर्थ स्पष्ट होतो. ज्याप्रमाणें नेपोलियननें सर्व यूरोप पादाक्रान्त केलें असा शब्दप्रयोग आपण करितों त्या वेळीं त्यांत नेपोलियन म्हणजे मात्र व्यक्ति नेपोलियनच असा अर्थ अभिप्रेत नसतो, पण नेपोलियनच्या नेतृत्वाखालीं लढणारी सेना असा अर्थ अभिप्रेत असतो, त्याचप्रमाणें “ सुताच्या धाग्यानें स्वराज्य ” याचा अर्थ फक्त चरखाच नसून चरख्याला केन्द्रस्थानीं राखून चालविलेला रचनात्मक कार्यक्रम असा अर्थ घेतला पाहिजे. गांधींच्या रचनात्मक कार्यक्रमाचें व्यापक स्वरूप पाहिलें असतां, त्याच्या सफल प्रयोगाचे अंतीं संपूर्ण स्वातंत्र्य आपोआपच कसें सिद्ध होईल हें वाचकांना कळून येईल.

गांधींच्या रचनात्मक कार्यक्रमाचीं चौदा अंगें आहेत, ती अशीं:— ( १ ) जात्यैक्य ( २ ) अस्पृश्यतानिवारण ( ३ ) दारुबंदी ( ४ ) खादी ( ५ ) इतर ग्रामीण उद्योग ( ६ ) ग्रामसफाई ( ७ ) बेसिक शिक्षण ( वर्धा योजना ) ( ८ ) प्रौढ-शिक्षण ( ९ ) स्त्री-उन्नति ( १० ) स्वास्थ्य आणि सफाईचें शिक्षण ( ११ ) राष्ट्रभाषाप्रचार ( १२ ) मातृभाषाप्रेम ( १३ ) आर्थिक समानता ( १४ ) गोरक्षा.

वरील सर्व अंगांचा सांगोपांग विचार केला तर या रचनात्मक कार्यक्रमांत राष्ट्राच्या पुनरुज्जीवनाची केवढी प्रचंड शक्ति राहिली आहे तें दिसून

येईल. रचनात्मक कार्यक्रमानें स्वराज्य मिळेल एवढाच त्याचा परिणाम आहे, असें कोणीं म्हटलें तर त्यांत रचनात्मक कार्यक्रमाची शक्ति त्यानें कमी कल्पिली असें होईल. वरील कार्यक्रम म्हणजे राष्ट्राचा सर्वांगीण विकास. सर्वच बाजूंनीं राष्ट्राचा विकास झाला म्हणजे अशा राष्ट्राला गुलामींत राखून ठेवणें कोणाला शक्य होणार ? केवळ राजकीय स्वायत्ततेचाच विचार केला तर असहकाराच्या यशस्वी मोहिमेनेंही स्वराज्य मिळवितां येणें शक्य आहे. पण ती मोहीम यशस्वी करण्यासाठीं लोकांची जी तयारी करावयाची, ती या रचनात्मक कार्यक्रमाच्या सफलतेवांचून होऊं शकणार नाहीं. म्हणजे असहकार किंवा सविनय कानूनभंगाच्या मोहिमेसाठींही रचनात्मक कार्यक्रम अपरिहार्य आहे. याचे उलट रचनात्मक कार्यक्रम संपूर्णपणें यशस्वी झाला तर सविनय कानूनभंगाचा आश्रय घेतल्यावांचून आपोआपच स्वातंत्र्यसिद्धि होऊं शकेल ही गोष्ट सहज समजण्यासारखी आहे. या बाबतींत गांधींनीं असें स्पष्टीकरण केलें आहे कीं,

*"जर रचनात्मक कार्यक्रमाची उठावणी करण्यास सबंध राष्ट्राचें सहकार्य मिळेल तर संपूर्ण अहिंसामार्गानें स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं सविनय कायदेभंगाची बिलकूल जरूरी नाहीं. परंतु इतकें सौभाग्य क्वचित् व्यक्तींच्या अगर राष्ट्रांच्या वांट्यास येतें. यासाठीं राष्ट्रांतील अहिंसात्मक प्रयत्नाच्या क्षेत्रांत कायदेभंगाचें स्थान कोठें आहे, हें समजणें आवश्यक आहे. त्याचीं तीन मुख्य कार्यें आहेत. (१) स्थानिक अन्याय दूर करण्यासाठीं परिणामकारक रीतीनें कायदेभंग करतां येईल. (२) एकाद्या खास अन्यायाविरुद्ध अगर दुष्कृत्याविरुद्ध स्थानिक मंडळींना जाणीव उत्पन्न करण्याकरितां अगर त्यांची सदसद्विवेकबुद्धि जागृत करण्याकरितां आत्मबलिदानाच्या दृष्टीनें, परिणामाची पर्वा न करितां सविनय कायदेभंग करतां येतो. (३) रचनात्मक कार्यक्रमाचा जनतेमध्यें पुरासा उठाव न झाल्यास त्याचे ऐवजीं सविनय कायदेभंग करावा. उदाहरणार्थ, सध्या चालू असलेला सत्याग्रह. स्वातंत्र्याच्या लढ्याला मदत म्हणून अगर त्याचा*

भाग म्हणून जरी हा कायदेभंग चालू आहे तरी तो भाषणस्वातंत्र्याच्या एका विशिष्ट मुद्द्यापुरताच जाणून बुजून मर्यादित ठेवला आहे. स्वातंत्र्यासारख्या सर्वसामान्य प्रश्नासाठीं सविनय कायदेभंग कधींही करतां येत नाहीं. लढ्याचा मुद्दा निश्चित स्वरूपाचा, प्रतिपक्षाला स्पष्ट समजण्यासारखा आणि त्यावर समेटासाठीं कबूल होण्यास प्रतिपक्षाच्या शक्तीच्या आवांक्यांतला असला पाहिजे. हा मार्ग योग्य रीतीनें वापरला तर तो अंतिम यशाकडे नेल्याशिवाय रहाणार नाहीं.

"सविनय कायदेभंगाचें संपूर्ण क्षेत्र व त्याचे परिणाम कोटवर पोहोंचूं शकतात, याचें मीं परीक्षण केलें नाहीं. कायदेभंगाचा व रचनात्मक कार्यक्रमाचा परस्पर संबंध काय, हें वाचकांना समजावें इतक्यापुरतेंच मीं प्रश्नाचें स्पष्टीकरण केलें आहे. वर लिहिलेल्या तीन प्रकारांपैकीं पहिल्या दोन प्रकारांसाठीं सविस्तर रचनात्मक कार्यक्रमाची जरूरी नसते व आवश्यकताही नसते. परंतु जेव्हां स्वातंत्र्यसंपादनासाठीं सविनय कायदेभंगाची योजना ठरविण्यांत येते त्या वेळीं पूर्वतयारी करणें जरूर असतें; आणि त्या तयारीला स्वातंत्र्याच्या लढ्यांत जे सामील झाले आहेत त्यांच्या बुद्धिपुरःसर व दृश्य प्रयत्नाचा पाठिंबा असावा लागतो. या दृष्टीनें पहातां, सविनय कायदेभंग हा एकीकडे त्यांत भाग घेणाऱ्या लढवय्यांना उत्तेजन देतो व दुसरीकडे विरोधी पक्षाला आव्हान देतो. यावरून वाचकांना हें स्पष्टपणें कळून येईल कीं, स्वातंत्र्यासाठीं योजलेल्या सविनय कायदेभंगाला रचनात्मक कार्याच्या द्वारें जर लाखों लोकांचें सहकार्य नसेल तर तो कायदेभंग म्हणजे एक भपकेबाज साहस आणि म्हणून सर्वस्वी निरुपयोगीच नव्हे, तर त्याहीपेक्षां वाईट ठरेल."

वरील अवतरणांवरून स्पष्ट होतें कीं रचनात्मक कार्यक्रमांत स्वातंत्र्य-संपादनाची शक्ति आहे इतकेंच नव्हे, पण रचनात्मक कार्यक्रमाचे अभावीं स्वातंत्र्यसंपादनासाठीं योजिला जाणारा सविनय कायदेभंगाचा लढायक कार्यक्रमही यशस्वी होऊं शकणार नाहीं. सुरवातीला सांगितल्याप्रमाणें रचनात्मक कार्यक्रम ही एसेप्टिक पद्धति आहे. रचनात्मक कार्यक्रमानें राष्ट्राची शक्ति इतकी वाढेल कीं परकी सत्ता तेथून आपोआपच निघून जाईल. रचनात्मक कार्यक्रमाचा आश्रय घेतल्यावांचून कोठल्याही राष्ट्राचें स्वातंत्र्य टिकणें शक्यच नाहीं. रशियाची पंचवार्षिक योजना म्हणजे रचनात्मक कार्यक्रमच होय. पण रशियांत हिंसक मार्गानें स्वातंत्र्यसिद्धि करण्याचा प्रयोग झाल्यामुळें रचनात्मक कार्यक्रम स्वातंत्र्यसिद्धीचें साधन म्हणून स्वीकारला जाऊं शकला नाहीं. गांधीवाद अहिंसक मार्गाचा स्वीकार करीत असल्यामुळें स्वराज्यप्राप्ति आणि स्वराज्यरक्षा या दोहोंसाठीं रचनात्मक कार्यक्रमाची उपयुक्तता अनिवार्य आहे.

'सुताच्या धाग्यानें स्वराज्य' या सूत्राचा हा अर्थ आहे. यांत तिल-मात्र अतिशयोक्ति नसून वेडेपणाही नाहीं. चरख्याची व्यापक प्रवृत्ति काय करूं शकेल याची कोणालाही कल्पना करितां येणार नाहीं. एखाद्या खेड्यांत एक खादीप्रचारक जाऊन राहिला, तर खेड्यांतील गरीब लोकांना घरीं बसल्याबसल्या रोजचे ३।४ आणे मिळविण्याची युक्ति तो चरख्याच्या द्वारा दाखवीलच; पण त्याचबरोबर गांधीवादाचा संपूर्ण रचनात्मक कार्यक्रम अमलांत आणण्याचा प्रयत्नही तो करील. हिंदुस्थानच्या सर्वच खेड्यांतून असा प्रयत्न झाला, तर जनतेंत जी प्रचंड जागृति होईल तिच्या पुढें परकीयांची सत्ता, सूर्योदयानंतर अंधार जसा आपोआप नाहींसा होतो, तद्वत् त्वरेनें नाहींशी होईल.

# १६ गांधींचा ग्रामोद्योगाचा आदर्श वेडेपणाचा !

**आक्षेपः—** गांधीवादाचा ग्रामोद्योगाचा आदर्श वेडेपणाचा आहे. कमींत कमी श्रमानें, कमींत कमी वेळांत, जास्तींत जास्त वस्तु निर्माण करण्याचें सामर्थ्य यंत्रांनीं चालणाऱ्या कारखान्यांत आहे. सर्वच गोष्टींसाठीं असे कारखाने झाले तर मजूरांना पुष्कळ मोकळा वेळ मिळेल आणि त्यांना साहित्य किंवा कलेची उपासना करून आपली संस्कृति

वाढवितां येईल. त्याऐवजीं हातानेंच काम करण्याचा आग्रह बाळगून गांधीवादानें राष्ट्राच्या सांस्कृतिक विकासाचा मार्गच बंद केला आहे.

उत्तर:— या आक्षेपांत आक्षेपकानें स्वीकारलेली भूमिकाच गांधीवादाला स्वीकार्य नाहीं. लोकांना पुरेसें रिकामपण असावें यांत कोणाचाच मतभेद नाहीं. पण पुरेसें रिकामपण म्हणजे संपूर्ण निष्क्रियता नव्हे. गांधीवाद ज्या समाजरचनेची कल्पना करीत आहे तींत प्रत्येक व्यक्तीनें आपल्या उपजीविकेसाठीं सहा ते आठ तास श्रम केले पाहिजेत ही कल्पना आहे आणि ही कल्पना एक सिद्धान्त म्हणूनच गांधीवाद प्रतिपादीत आहे. रिकामपणांतून संस्कृतीचा विकास होतो हें मत वस्तुस्थितीला धरून नाहीं. जगाचा सबंध इतिहास पाहिला तर आपल्याला असें आढळून येईल कीं मानवसमाजांतील कला व संस्कृतीचा विकास उद्यमी लोकांच्या श्रमांमुळेंच झाला आहे. निरुद्यमी लोकांनीं आळसांत आणि विलासांतच नेहमीं खितपत पडून राष्ट्राच्या कलेला आणि संस्कृतीला अधोगतीला नेण्याचेंच काम केलें आहे. संगीत आणि नृत्यासारख्या कलांचें खेडेगांवांतील श्रमजीवी लोकांत जें शुद्ध आणि ओजस्वी स्वरूप आढळून येतें, तें बादशाहाच्या दरबारांत किंवा जमीनदारांच्या वाड्यांतून दिसून येत नाहीं. उलट श्रीमंतांच्या दारीं कला आली म्हणजे ती विलासाचें साधन बनून राष्ट्राच्या अधोगतीला कारणीभूत होते. शिक्षणशास्त्राचा एक मोठा सिद्धान्त हा आहे कीं मानवी जीवनाच्या विकासासाठीं हातानें केलेली क्रिया अपरिहार्य आहे. लहान मूल आपलें बहुतेक सारें ज्ञान हाताच्या क्रियांच्या द्वारा मिळवितें, तद्वतच मोठा मनुष्यही आपलें ज्ञान प्रत्यक्ष क्रियांच्या द्वाराच मिळवितो. या सिद्धान्ताच्या सत्यत्वाचे बाबतींत कोणाही शिक्षणशास्त्रज्ञाचा मतभेद नाहीं. शिक्षणशास्त्राचा हा सिद्धान्त मानवी जीवनाचाच सिद्धान्त आहे. त्याची अवगणना करून सुस्थित समाजाची रचना कशी करितां येणार? म्हणूनच गांधीवाद श्रमजीवी वर्गाला महत्त्व देतो. केवळ बुद्धीवर जगणें शक्य नाहीं आणि तसें जगायचें झालें तर अन्यायानें दुसऱ्याला लुबाडून जगतां येईल, ही गांधीवादाची दृष्टि आहे. आज आपण पाहातों कीं आठ ते दहा तास शरीरश्रम करणाऱ्या मजूराला मुंबईसारख्या शहरांतही रुपया दीड रुपयापेक्षां जास्त रोजी मिळत नाहीं. उलट थोडासा वेळ आपलें डोकें चालवणारा मनुष्य याहून फारच मोठा मोबदला मागतो आणि तो त्याला मिळतोही. श्रमाचें हें मूल्यांकन अन्यायमूलक आहे. तें बद-

लून टाकलेंच पाहिजे. म्हणूनच गांधीवादाच्या सिद्धान्ताप्रमाणें चालणाऱ्या चरखासंघानें "जीवनाला आवश्यक इतकी मजूरी" देण्याचा आदर्श स्वीकारून खादी महाग केली आहे.

बरें, कमींत कमी वेळांत जास्तींत जास्त उत्पादन करून फायदा काय? खेड्यांतील शेतकरी स्वतःचे हातानें सारीं शेतीचीं कामें करितो तरीही त्याला वर्षातून चार महिने स्वस्थ बसून राहावें लागतें, आणि या चार महिन्यांच्या सक्तीच्या मोकळेपणांत त्याला काय करावें हें सुचत नाहीं. मग यंत्रांच्या द्वारा शेती होऊं लागली तर वर्षातून ८।१० महिने शेतकऱ्याला रिकामें बसून राहावें लागेल आणि या ८।१० महिन्यांत त्यानें काय करावयाचें? शेतीशिवाय बाकीचे सर्व धंदे तर शहरांत केन्द्रीभूत झालेले. त्यामुळें खेड्यांतील चांभार, तेली, कोष्टी, पिंजारी, वगैरे कारागीर वर्ग रिकामा झालेलाच असणार. तशांत शेतकऱ्यांचाही वर्ग मिसळणार. मग या सर्वांनीं करावयाचें तरी काय? कला आणि संस्कृतीची उपासना कशी करावयाची? आणि ती सर्वांनां शक्य तरी आहे काय?

बरें, सर्वच वेळ प्रत्येक खेड्यांतून यंत्रें चालू ठेवलीं तर होणाऱ्या उत्पादनाचें काय करावयाचें? परदेशाला पाठवायचें? मग त्यासाठीं युक्त्या-प्रयुक्त्या करायला पाहिजेत. परदेशचा बाजार आपल्या ताब्यांत घेण्यासाठीं फसवेगिरी, जुलूम, अत्याचार, लूट वगैरेंचीं संभावित स्वरूपें अमलांत आणावीं लागणार. मँचेस्टरचें कापड खपावें म्हणून डाक्क्याच्या कातणाऱ्यांचे आंगठे ईस्ट इंडिया कंपनीच्या जुलमी अमलांत कापण्यांत आले म्हणून आम्ही संतापानें लाल होतों. पण यंत्रवादाचा स्वीकार केला तर दुसऱ्या देशांत जाऊन आम्हांला हेंच केलें पाहिजे, ही गोष्ट स्पष्ट नाहीं काय? प्रत्येक उत्पादनासाठीं यंत्रेंच पाहिजेत हा आग्रह यंत्रांच्या मोहिनींत गुरफटून गेल्यामुळें सारासार-विवेकशून्य झालेल्या बुद्धीचा द्योतक आहे. यंत्रांना स्थान आहे आणि तें गांधीवादाला स्वीकार्य आहे. पण त्यांत तारतम्य आहेच. गांधीही यंत्रांचा आमूलाग्र विरोध करीत नाहींत. गांधी म्हणतात—

*"खादी मनोवृत्तीचा अर्थ हा आहे कीं, जगण्याला आवश्यक अशा पदार्थांची पैदास व वाटणी यांचें विकेन्द्रीकरण (विखरणें). या दृष्टीनें पाहातां आतांपावेतों जो सिद्धान्त निघाला*

*तो असा कीं, प्रत्येक खेड्यानें स्वत:स आवश्यक अशा सर्व जिनसांची पैदास करावयाची व उपभोग घ्यावयाचा व त्या शिवाय शहरांच्या गरजा भागविण्यासाठीं आपली मदत म्हणून कांहीं प्रमाणांत जास्त पैदास करावयाची. भारी उद्योगधंद्यांचें केन्द्रीकरण जरूर होईल व ते राष्ट्रीय मालकीचे राहतील; परंतु खेड्यांतून सुरू राहणाऱ्या व्यापक राष्ट्रीय उद्योगधंद्यांच्या मानानें त्यांचें प्रमाण फारच अल्प राहील."*

गांधीवादाचा ग्रामोद्योगाचा हा आदर्श आहे. या आदर्शांत वेडेपणा कोठें आहे हेंच कळत नाहीं. समाजवादानें यंत्रवादाला प्रामुख्य देऊन जो प्रयोग सुरू केला आहे, त्याच्या यशाचीं चिन्हें रशियांतही अद्याप दिसून येत नाहींत. संपत्तीचें केन्द्रीकरण नाहींसें केलें पाहिजे, या बाबतींत समाजवाद आणि गांधीवाद एकाच कक्षेवर आहेत. पण तें केन्द्रीकरण कसें नाहींसें करावयाचें या बाबतींत दोहोंचे मार्ग निराळे आहेत. समाजवाद सक्ती म्हणजे हिंसेचा मार्ग स्वीकारतो, तर गांधीवाद अहिंसेचा मार्ग स्वीकारतो. म्हणूनच गांधीवादाची ग्रामोद्योगावर सारी भिस्त आहे. ग्रामोद्योग म्हणजे व्यक्तीच्या कार्यशक्तीवरच चालणारा उद्योग. यांत संपत्तीच्या केन्द्रीकरणाला वावच नाहीं. खादीचीच गोष्ट घेतली तर एक वार खादीचे आठ आणे धरले तरी ती लहानशी रकमही एका व्यक्तीला न मिळतां शेतकरी, मजूर, पिंजारी, कांतणारी, विणकर, परीट आणि व्यापारी यांत योग्य प्रमाणांत वाटली जाते. हें स्वाभाविक विकेन्द्रीकरण किती सुंदर आहे ! याचे ऐवजीं सक्तीनें विकेद्रीकरण करण्यांत काय फायदा ? यंत्रें आणून मग राष्ट्रीय केन्द्रीकरण करावयाचें आणि मग संपत्तीची समभाग विभागणी करावयाची हा खटाटोप द्राविडी प्राणायामासारखा भासतो. गांधीवादाच्या ग्रामोद्योगामुळें विकेन्द्रीकरण आपोआपच होऊन सक्तीचा किंवा समान विभागणीचा प्रश्नच उभा होत नाहीं.

गांधींचा ग्रामोद्योग जागतिक व्यापारी चढाओढींत टिकूं शकणार नाहीं, असा आक्षेप यावर कोणी घेईल. हल्लीं यंत्रांचीं उत्पादनें सर्वत्र झाल्यामुळें ग्रामोद्योगाच्या मार्गांतील ही अडचण सुरवातीला नडणार यांत शंका नाहीं. पण अशा कितीतरी अडचणींचा सामना केल्यावांचून राष्ट्र थोडेंच पुढें येऊं

शकेल ? आणि एकदां का निष्ठेनें काम सुरू झालें म्हणजे या सर्व कृत्रिम अड-चणी आपोआप नाहींशा होतात. मिलच्या कापडाच्या चढाओढींत खादी पुढें येणें शक्यच नाहीं, असा आक्षेप नेहमीं केला जातो. पण चरखा संघाचे १९४० चे आकडे घेतले तर "१३४५१ पेक्षां अधिक खेड्यांतील २,७५,१४६ लोकांना–पैकीं १९,६३४ हरिजन व '५७,३७८ मुसलमान आहेत–३४,८५६०९ रुपये कातण्या-विणण्याची मजूरी म्हणून मिळाले. सूत कातणारांमध्यें बहुतेक स्त्रियाच आहेत." हे आंकडे काय दाखवतात ? या आंकड्यांवरून ग्रामोद्योगाची शक्ति दिसून येत नाहीं काय ? खादी अद्याप सार्वत्रिक झाली नाहीं त्याचें कारण हिंदुस्थानचा कारभार परकीयांच्या हातीं आहे. हिंदुस्थान स्वतंत्र असता तर 'खादीचें कार्य राष्ट्रीय सरकारचें एक खातें झालें असतें आणि खेडोपाडीं खादी उत्पन्न होऊन घरोघरीं जशा चुली आहेत तसे घरोघरीं रहाट येऊन अन्न आणि वस्त्र या दोन्ही बाबतींत स्वावलंबन सिद्ध झालें असतें, आणि कापडाच्या द्वारा जे कोट्यवधि रुपये परदेशी आणि देशी भांडवलशाहीच्या घशांत ओतले जात आहेत ते वांचले असते ! ग्रामोद्योग हें स्वराज्यसिद्धीचें साधन मात्र नव्हे, पण समाजाच्या सुस्थितीचें, स्वराज्याच्या रक्षणाचें आणि आर्थिक समानतेचेंही साधन आहे. हातानें चालणारे ग्रामोद्योग आणि यंत्रानें चालणारे शहरी कारखाने यांच्यांत विरोध येण्याचा कधींच संभव नाहीं. गांधीवादाप्रमाणें हे दोन्ही प्रकारचे धंदे एकमेकांला पोषक होतील.

ग्रामोद्योगाचा आदर्श स्वीकारणें म्हणजे मानवी संस्कृतीच्या घड्याळाचा काटा मागें फिरविण्यासारखें आहे, असाही आक्षेप घेतला जातो. पण या आक्षेपांतही वस्तुस्थितीचा विपर्यास आहे. आधुनिक यंत्रवादामुळें जगाची संस्कृति प्रगतीच्या मार्गावर आहे कीं अधोगतीच्या हा प्रश्न विचारार्ह आहे. यंत्रवादाचा भीषण परिणाम म्हणजे आजचें अमानुषी युद्ध. सतत चार वर्षें मानवी संस्कृति आणि सामाजिक सुस्थितीचा अव्याहत संहार चालला असूनही यंत्रवाद जगाला उपयोगी आहे असें म्हणणें धाष्टर्याचेंच नव्हे तर वेडेपणाचें द्योतक आहे ! गांधीवाद यंत्रांचा नाश करण्याचा प्रयत्न करीत नसून यंत्रांना त्यांच्या योग्य स्थानीं ठेवूं पाहत आहे. यंत्रें आज माणसांवर स्वार झालीं आहेत, त्या ऐवजीं यंत्रांवर माणसांचा ताबा प्रस्थापित करणें, हा गांधीवादाचा हेतु आहे. आणि म्हणूनच ग्रामोद्योगाचा आदर्श गांधींवादानें समाजापुढें ठेवला आहे.

आतां राहतां राहिला फुरसतीचा प्रश्न. आजच्या विषम परिस्थितींत श्रमजीवी वर्गाला उपजीविकेसाठीं केल्या जाणाऱ्या मजूरींतून डोकेंच वर काढतां येत नाहीं, ही गोष्ट अगदीं खरी आहे. ही परिस्थिति अत्यंत भयंकर आहे. ही लवकरांत लवकर नाहींशी झाली पाहिजे यांत शंका नाहीं. आणि ही परिस्थिति नाहींशी करण्यासाठींच गांधीवादाचा सारा अट्टाहास आहे. दिवसांतून आठ तासांपेक्षां जास्त काम कोणालाही आपल्या उपजीविकेसाठीं करावें लागूं नये, हा गांधीवादाचा आग्रह आहे. आज जी काळी मजूरी करावी लागते, ती गांधीवादाला संमत नाहीं. आवश्यक मजूरी झाल्यानंतर सांस्कृतिक विकासाचा प्रयत्न खेडोपाडीं प्रत्येक व्यक्तीनें केला पाहिजे हाही गांधीवादाचा आग्रह आहे. म्हणूनच गांधीवादाच्या रचनात्मक कार्यक्रमांत जातीय ऐक्य, अस्पृश्यतानिवारण, प्रौढशिक्षण, राष्ट्रभाषाप्रचार, मातृभाषाप्रेम, स्त्री-उन्नति वगैरे अंगें आहेत. हीं सर्व सांस्कृतिक विकासासाठीं नाहींत असें कोण म्हणेल? खेड्यांतील प्रत्येक श्रमजीवी व्यक्तीला आपलें जीवन सर्व दृष्टींनीं उन्नत आणि सुसंस्कृत करण्याचा अवकाश मिळावा अशाच प्रकारची गांधीवादाची कार्यपद्धति आहे. ग्रामोद्योगांत प्रत्येक व्यक्तीला आपल्या विकासासाठीं आवश्यक इतकी फुरसत मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. ग्रामोद्योगाची रचनाच मुळीं या तत्त्वाला सुसंगत आहे.

## १७ श्रीमंत संपत्तीचे ट्रस्टी ?

**आक्षेपः—** भांडवलशाहीचें निमूलन करण्याचा मार्ग समाजवादानें जसा स्पष्टपणें दाखविला आहे, तसा गांधीवादांत दिसत नाहीं. गांधीवादाची "श्रीमंतांनीं संपत्तीचे ट्रस्टी बनून राहावें" ही आशा मनुष्यस्वभाव पाहतां कधींच सफल होणार नाहीं. श्रीमंतांचा स्वार्थ कधींच नष्ट होणार नाहीं. त्यांना कायद्याच्या दंडुक्यानेंच ठिकाणीं आणलें पाहिजे.

**उत्तरः—** आक्षेपकानें गांधीवादाच्या समग्र दृष्टीचा विचार करून जर गांधीवादाची ट्रस्टीपणाची कल्पना काय आहे हें समजण्याचा प्रयत्न केला असता, तर ही शंका उठलीच नसती. गांधीवाद मनुष्यस्वभावाला बरोबर ओळखतो. श्रीमंतांची स्वार्थी वृत्ति ही गांधीवादाला माहीत आहे. गांधीवादानें आपल्या तत्त्वांचा प्रचार केला म्हणून तेवढ्यानेंच

सर्व श्रीमंत लोक आपल्या संपत्तीचें ट्रस्टडीड बनवून राष्ट्रसेवक बनतील अशी गांधीवादाची अपेक्षाच नाहीं. गांधीवादाची ट्रस्टीपणाची कल्पना निराळ्याच प्रकारची आहे. गांधींचे या बाबतींतील संकलित विचारच आपण पाहूं या. ते म्हणतात—

*"हा शेवटचा कार्यक्रम ( आर्थिक समानता ) म्हणजे अहिंसक स्वराज्याची गुरुकिल्ली आहे. आर्थिक समानता स्थापण्याचें काम म्हणजे भांडवलवाले व मजूर यांच्यांतील सनातन झगडा नाहींसा करण्याचें कार्य. याचाच अर्थ असा कीं, एका बाजूला देशांतील संपत्तीचा प्रचंड ढीग एकवटून बसलेले जे मूठभर पुंजीवाले आहेत त्यांना खालीं खेचलें पाहिजे व दुसऱ्या बाजूला कोट्यवधि अर्धपोटी व वस्त्रहीन आहेत त्यांना वर उचललें पाहिजे. जोंपर्यंत श्रीमंत व कोट्यवधि भुकेकंगाल यांच्यामधील भयंकर अंतर कायम आहे तोंपर्यंत अहिंसात्मक राज्यपद्धति चालू होणें अगदीं अशक्य आहे. एका बाजूला दिल्लींतील राजवाडे व दुसऱ्या बाजूला गरीब मजूर वर्गाचीं खुराडें हें परस्परविरोधी दृश्य स्वतंत्र हिंदुस्थानांत एक दिवसही टिकणें शक्य नाहीं. कारण त्या हिंदुस्थानांत गरीबांतल्या गरीबाला श्रीमंतांतल्या श्रीमंत गृहस्थाइतकीच सत्ता व अधिकार राहील. आपल्या श्रीमंतीचा व त्यांतून हातीं आलेल्या सत्तेचा स्वतः होऊन त्याग करण्यास व त्याचा उपयोग सार्वजनिक हितासाठीं करण्यास श्रीमंत तयार झाले नाहींत, तर एक दिवस या देशांत अत्याचारी व रक्तपाताची क्रांति खात्रीनेंच झाल्याशिवाय राहणार नाहीं. श्रीमंतांनीं स्वतःला आपल्या संपत्तीचे मालक न समजतां विश्वस्त मानलें पाहिजे, या माझ्या सिद्धान्ताची कितीही टवाळी झाली तरी मी त्या सिद्धान्ताला चिकटून आहें. तो सिद्धान्त अमलांत*

येण्यास कठीण आहे, हें खरें आहे. परन्तु अहिंसेची साधनाही तशीच कठीण आहे. असें असतांना १९२० सालीं आपण अहिंसेची उंच दरड चढण्याचा आपल्या मनाशीं निश्चय केला व तो श्रमपूर्वक प्रयत्न करण्याइतका मूल्यवान् आहे असें आपणांस आढळूनही आलें ........................................सध्यांची आर्थिक विषमता—हिंसेनें असो अगर अहिंसेनें असो—कशी नष्ट करतां येईल हा प्रश्न त्यांनीं ( कॉंग्रेसजनांनीं ) स्वतःला वारंवार विचारला पाहिजे. हिंसेचा मार्ग आपणांस माहीत आहे असें मी समजतों. तो मार्ग कोठेंही यशस्वी झालेला दिसत नाहीं. रशियांत तो बऱ्याच प्रमाणांत यशस्वी झाला आहे, असा कांहींचा दावा आहे. मला मात्र त्याबद्दल शंका आहे. या बाबतींत आज निर्णयात्मक बोलणें फार घाईचें होईल; आणि सध्यां तर रशिया व जर्मनी यांच्यांत युद्ध जुंपल्यामुळें त्याचा अंतिम परिणाम काय होणार, हें सांगणें आपणांला शक्य नाहीं."

"आपला अहिंसामार्गाचा प्रयोग अद्याप चालू आहे; त्या मार्गाचा दृश्य परिणाम म्हणून दाखविण्यासारखें अद्याप आपल्याजवळ फारसें नाहीं; परन्तु मला जें दिसत आहे त्यावरून मला असें वाटतें कीं, अहिंसा-मार्गाचा परिणाम आर्थिक समता स्थापण्याच्या दिशेनें अगदीं सावकाश कां होईना पण होत आहे. शिवाय अहिंसा म्हणजे हृदयपालटाची क्रिया असल्यामुळें, हृदयपालट जर झाला तर तो कायमचाच झाला पाहिजे. अहिंसेच्या पायावर उभारलेल्या समाजाला किंवा राष्ट्राला आंतून बाहेरून येणाऱ्या सर्व हल्ल्यांना तोंड देऊन टिकाव धरतां आलाच पाहिजे. आपल्या कॉंग्रेसच्या संघटनेंत श्रीमंत गृहस्थ आहेत. त्यांनींच या बाबतींत पुढाकार घेतला पाहिजे."

वरील उताऱ्यांत गांधींची दृष्टि स्पष्टपणें दिसून येते. आर्थिक समतेच्या बाबतींत त्यांचे विचार कोणाही जहाल समाजवाद्याइतके उग्र आहेत. गांधीवादाचें मूलभूत तत्त्व मनुष्यस्वभावाच्या सज्जनतेवर विश्वास हें असल्यामुळें, गांधींनीं यांत श्रीमंतांनीं आर्थिक समानता स्थापण्याचे कामीं पुढाकार घेतला पाहिजे, असें त्यांना सांगितलें आहे. पण त्याबरोबरच श्रीमंत असें करणार नाहींत याचेंही त्यांना भान आहे. म्हणूनच " एक दिवस या देशांत अत्याचारी व रक्तपाताची क्रांति खात्रीनेंच झाल्याशिवाय राहणार नाहीं " असें भविष्यही त्यांनीं भाकिलें आहे.

गांधींच्या म्हणजे गांधीवादाच्या या विचारसरणीचें रहस्य काय आहे त जरा खोल उतरून पाहिलें पाहिजे. गांधी ज्या अहिंसक समाजाची स्थापना करूं इच्छितात, त्यांत श्रीमंतांना खालीं ओढलें पाहिजे, त्याबरोबरच गरीबांना वर उचललें पाहिजे ही दृष्टि आहे. श्रीमंतांना खालीं ओढायचें, पण तें अहिंसक रीतीनें. म्हणजे ज्या समाजरचनेच्या आधारावर ते अवास्तव उंचीला जाऊन पोहोंचले आहेत, ती समाजरचनाच अशा तऱ्हेनें बदलून टाकावयाची कीं श्रीमंतांचा आधार नाहींसा होऊन ते आपोआपच खालीं उतरतील. रचनात्मक कार्यक्रम सफल झाला म्हणजे धनाच्या केन्द्रीकरणाची संधिच कोणालाही मिळणार नाहीं. जे थोडेसे उद्योग केन्द्रीकरणाच्या तत्त्वावर चालवावे लागतील, त्यांत राष्ट्रीय केन्द्रीकरण असल्यामुळें त्यांत व्यक्तींना आपली संपत्ति वाढविण्याची संधिच मिळणार नाहीं. हिंदुस्थान स्वतंत्र होईल तेव्हां कायदेही असे होतील कीं गरीबांना पुढें येण्याची जास्तींत जास्त संधि मिळेल, पण कोणालाही श्रीमंत होतां होणार नाहीं. आजच्या समाजांत जी बेसुमार नफाखोरी आहे तिला आळा घातला जाईल. खेड्यापाड्यांत सावकार शेतकऱ्यांकडून अन्यायानें धन मिळवतात त्याला आळा घातला जाईल आणि त्याचे बरोबरच अज्ञानी आणि गरीब लोकांना जीवनाच्या सुखसोयी जास्त प्रमाणांत दिल्या जातील. श्रीमंतांना खालीं खेचणें आणि गरीबांना वर ओढणें याचा हा अर्थ झाला. आतां सार्वजनिक हिताचे दृष्टीनेंहि संपत्तीचा संग्रह विशिष्ट ठिकाणीं करावा लागेल. तो संग्रह सार्वजनिक स्वरूपाचा राहील आणि ज्यांच्या ताब्यांत ती संपत्ति जाईल ते तिचे फक्त ट्रस्टी बनून राहतील.

या प्रकाराची नवीन समाजरचना करण्याच्या प्रयत्नांत श्रीमंतांनीं सहकार कसा द्यावयाचा ? समाजवादी विचारसरणी वर्गविग्रहावर आपली सारी

इमारत रचते. गांधीवाद वर्गविग्रह विघातक समजतो. म्हणूनच श्रीमंतांनीं वेळींच सावध व्हावें या दृष्टीनें ट्रस्टीशिपची कल्पना गांधींनीं हिंदुस्थानच्या श्रीमंत लोकांपुढें ठेविली आहे. श्रीमंत लोक ही कल्पना स्वीकारणार नाहींतच. आणि त्यांनीं तशी ती स्वीकारली नाहीं तर ते स्वस्थपणें आपल्या संपत्तीचा उपभोग घेऊन चैनींत राहूं शकतील असें गांधीवाद म्हणत नाहीं. गांधीवाद प्रथम त्यांच्यांतील सद्वृत्ति जागृत करण्याचा प्रयत्न करील आणि त्या तशा जागृत झाल्या नाहींत तर नवीन येणाऱ्या समाजरचनेंत श्रीमंतांची संपत्ति त्यांच्या कबजांतून निघून राष्ट्राच्या मालकीची होईल हेंही गांधीवाद पाहील. मात्र गांधीवादाचा मार्ग अहिंसेचा राहील.

## १८ अहिंसेचा प्रयोग निष्फळ

**आक्षेपः**—गांधीवादाचा अहिंसेचा प्रयोग निष्फळ ठरला आहे.

**उत्तरः**—निष्फळता कशी ठरवावयाची हा प्रश्न फार बिकट आहे. गांधीवादानें किंवा गांधींनीं ती निष्फळता स्वीकारली नाहीं, तोंपर्यंत इतरांनीं निष्फळता ठरविणें जरा धोक्याचें आहे. दोन राष्ट्रें एकमेकांशीं लढत असतात तेव्हांही लहानसहान लढायांतील जय-पराजयावर सबंध युद्धाचा जयापजय नक्की करतां येत नाहीं. एखाद्या लढाईत एक पक्ष जिंकतो तर दुसऱ्या लढाईत दुसरा जिंकतो. अंतिम जय-पराजयाचा आधार कोणतें राष्ट्र आपला हेका सोडून दुसऱ्याला शरण जातें त्यावेवर असतो.

गांधींच्या अहिंसेच्या प्रयोगाचेंही असेंच आहे. एक तर हा प्रयोग अगदीं नवा आहे; दुसरें, अजून हा प्रयोग मोठ्या प्रमाणांत करण्याइतकें बहुजनसमाजाला अहिंसेच्या अंगोपांगांचें शिक्षण दिलें गेलें नाहीं; तिसरें, देशांत परदेशी सत्ता चालू असल्यामुळें स्वातंत्र्याशीं संलग्न असलेल्या कोणत्याही प्रयोगाला बिलकूल अवकाश मिळत नाहीं; चवथें, अहिंसेच्या प्रयोगासाठीं जो खर्च होणार तो खर्च करणें कोणत्याही सार्वजनिक संस्थेला शक्य नसल्यामुळें राज्यालाच तो खर्च करावा लागणार. पण हिंदुस्थानांतील परदेशी सत्ता या प्रयोगाला विरोधी असल्यामुळें या प्रयोगासाठीं कांहींच खर्च न करतां, हा प्रयोग निष्फळ करण्याचाच प्रयत्न करीत असल्यामुळें, हा प्रयोग

मोठ्या पायावर होऊं शकला नाहीं. या सर्व कारणांमुळें अहिंसेच्या प्रयोगाची सफलता सर्व जगाला दिसून येण्यासारखी होऊं शकली नाहीं ही गोष्ट खरी आहे. पण याचा अर्थ असा नव्हे कीं प्रयोग निष्फळ ठरला आहे. दक्षिण आफ्रिकेचा सफल सत्याग्रह, हिंदुस्थानांत चंपारण्य, खेडा जिल्हा, नागपूर, बोरसद, बारडोली वगैरे ठिकाणीं जे सफल सत्याग्रह झाले ते, त्याचप्रमाणे १९३० चा अंशतः सफल झालेला मिठाचा सत्याग्रह, या सर्वांवरून असेंच म्हणावें लागतें कीं अहिंसक विरोध हें एक परिणामकारक हत्यार आहे. आतां स्वातंत्र्यसंपादनासाठीं अहिंसक विरोध अद्याप यशस्वी होऊं शकला नाहीं हें खरें. पण त्याचें कारण अहिंसक विरोधांत यश प्राप्त करण्याची ताकत नाहीं हें नसून, असा विरोध करणाऱ्या प्रजेची तयारी पुरती नाहीं, हेंच आहे. पुरती तयारी न होण्याला कोणतीं कारणें आहेत, हें सुरवातीलाच आपण पाहिलें आहे. पण योग्य प्रयत्नान्तीं पुरती तयारी झाली म्हणजे अहिंसक विरोधाची अमोघ शक्ति प्रकट झाल्यावांचून राहणार नाहीं. गांधींचा प्रयोग निष्फळ झाला असें म्हणणें उतावळेपणाचें लक्षण आहे. गांधींचा प्रयोग अद्याप चालू आहे, आज त्याचा मात्र प्रारंभ आहे; पण प्रारंभींच्या अनुभवावरून इतकें स्पष्ट दिसून येतें कीं, अहिंसक विरोध हें खरोखर मोठें प्रबल हत्यार आहे.

## १९ गांधीवादाचे अनुयायी

**आक्षेपः—** गांधींचे निकटचे आणि श्रेष्ठ गणले जाणारे अनुयायीच गांधीवादाच्या सिद्धान्ताप्रमाणें वागूं शकत नाहींत, हें गांधींनींच कबूल केलें आहे. मग सामान्य जनसमूह गांधीवाद अमलांत आणूं शकेल, हें कसें शक्य आहे?

**उत्तरः—** गांधींनीं ज्या भूमिकेवरून आपल्या अनुयायांची अपूर्णता दाखविली आहे, ती भूमिका न समजल्यामुळेंच आक्षेपकानें वरील भ्रामक आक्षेप घेतला आहे. गांधी अहिंसेच्या सर्वोच्च आदर्शाच्या निकषावर आपल्या निकटच्या अनुयायांना घासत असतात. अहिंसेच्या उच्चतम आदर्शाच्या दृष्टीनें गांधी स्वतःलाही अपूर्णच समजतात. गांधींच्या श्रेष्ठ गणल्या जाणाऱ्या अनुयायांत मानवसहज दोष आहेत, यांत नवीन तें काय आहे? आजपर्यंत संपूर्ण दोषरहित असा कोणता देहधारी जगाच्या पाठीवर

अवतरला आहे? हिंदु लोक ज्या राम-कृष्णांची अवतार म्हणून पूजा करितात, त्यांचीं जीवनें तरी सर्वथा दोषमुक्त आहेत काय? मग गांधींच्या अनुयायी-वर्गापासूनच संपूर्ण निर्दोषतेची अपेक्षा कां करावी?

खरें पाहिलें तर अहिंसेच्या सार्वजनिक प्रयोगासाठीं प्रत्येक व्यक्तीला अहिंसेच्या उच्चतम धर्माचें पालन करण्याची आवश्यकताच नाहीं. आपण मागील विवरणांत पाहिलें आहे त्याप्रमाणें अहिंसेच्या लघुतम मर्यादेचें पालनच बहुजनसमाजासाठीं अपरिहार्य आहे, आणि असें पालन कधीं कधीं कां होईना बहुजनसमाज करूं शकतो, हें गेल्या पस्तीस वर्षांच्या इतिहासांत अनेक वेळां सिद्ध झालें आहे. जी गोष्ट आचरणें बहुजनसमाजाला कधीं कधीं शक्य होतें, त्याच गोष्टीचें आचरण योग्य अभ्यासानें नेहमींही करतां येईल, यांत शंका कां उठावी? अहिंसेचें जें धोरण बहुजनसमाजासाठीं ठेवण्यांत आलें आहे, तें सर्वग्राह्य असेंच असल्यामुळें त्याचें पालनही सर्वग्राह्यच असणार. आज तें तसें दिसलें नाहीं तर त्याचें कारण अद्याप गांधीवादाचा व्हावा तसा प्रचार झाला नाहीं, हेंच होय.

आतां गांधींच्या निकटच्या अनुयायांविषयीं. त्या सर्वांमध्यें मानवसहज अनेक दोष असले तरी आदर्शसेविता, त्याग, एकनिष्ठा, स्वातंत्र्यप्रेम, देशसेवा या सर्व गुणांमध्यें गांधींचे निकटचे अनुयायी इतर राष्ट्रांतील देशसेवकांपेक्षां कमी दर्जाचे मुळींच ठरणार नाहींत. हे सर्वच प्रयत्नशील साधक आहेत. यांपैकीं कित्येकांनीं तर आपलें सर्व जीवनच या साधनेला वाहिलें आहे. अशा पुरुषांच्या सामान्य दोषांना मोठें स्वरूप देऊन त्यावरून गांधीवादाच्या व्यवहार्यतेचा अभाव सिद्ध होऊं शकत नाहीं.

## २० स्वातंत्र्यासाठीं असत्याचरण धर्म्य आहे?

**आक्षेपः—** श्रेष्ठ वस्तु सिद्ध करण्यासाठीं थोड्याशा गौण मार्गाचा अवलंब केला तर त्यांत अनुचित कांहींच नाहीं. पांडवांच्या पक्षाला विजय मिळवून देणें हें जगाच्या कल्याणाच्या दृष्टीनें आवश्यक होतें. म्हणून कधीं कधीं असत्याचा अवलम्ब करूनही श्रीकृष्णासारख्यांनीं पांडवांची बाजू सावरून धरली. या दृष्टीनें हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासारख्या उच्च ध्येयाच्या सिद्धीसाठीं कधीं कधीं असत्याचा अवलंब केला तरी तो दोषार्ह

होऊं शकत नाहीं. उलट असा असत्याचा अवलंब हा धर्मच होतो. गांधी सत्याला सोडून स्वराज्य मिळत असेल तर तें स्वराज्य मला नको असें म्हणतात, यांत गांधींचा धर्मवेडेपणाच नाहीं काय ? असा धर्मवेडा पुरुष स्वातंत्र्यसेनेचा सेनानी कसा होऊं शकणार ? आणि अशा पुरुषानें प्रतिपादिलेल्या सिद्धान्ता-वर रचलेला गांधीवाद स्वातंत्र्यसिद्धीला उपकारक कसा होणार ?

**उत्तर:—** हा आक्षेप फारच महत्त्वाचा आहे. सत्यासत्याचा हा झगडा फारच जुना आहे. टिळकांनीं "**शठं प्रति शाठ्यं**" हें तत्त्व प्रतिपादिलें आणि हेंच तत्त्व व्यवहारांत उपकारक आहे असें मानणारा एक प्रबल पक्ष जगांत आहे. पण गांधीवादाला '**शठं प्रति शाठ्यं**' चें तत्त्व बिलकूल मान्य नाहीं. गांधीवादाचें तत्त्व आहे "**शठं प्रत्यपि सत्यम्.**" तेव्हां आक्षेपकानें जो आक्षेप केला आहे तो वस्तुस्थितीला धरूनच आहे.

आक्षेपकानें आक्षेपांत तीन मुद्दे उपस्थित केले आहेत. ( १ ) उच्च ध्येयाचे प्राप्तीसाठीं हीन मार्गाचा अवलम्ब करायला कांहींच हरकत नाहीं. ( २ ) स्वातंत्र्यप्राप्तीसारख्या महान् ध्येयाच्या सिद्धीसाठीं असत्याचा अवलंब केला तरी हरकत नाहीं आणि ( ३ ) **शठं प्रति शाठ्यं** हाच सिद्धान्त बरोबर असून **शठं प्रति अपि सत्यं** हा गांधीवादाचा सिद्धान्त चुकीचा आहे. यांपैकीं प्रत्येक मुद्याचा क्रमशः विचार आपण करूं या.

ध्येयप्राप्ति ही उत्तरोत्तर उत्क्रान्तीची प्रक्रिया आहे. एखादा विद्यार्थी परीक्षेला बसतो तेव्हां परीक्षेंत यश संपादन करण्याच्या क्रियेचा आधार परीक्षे-पूर्वीं वर्षभर त्यानें जी बौद्धिक मेहनत केली त्याचेवर आहे. परीक्षेसाठीं केलेल्या साऱ्या मेहनतीची एकंदर बेरीज म्हणजेच परीक्षेंतील यश किंवा अपयश. त्या मेहनतीपासून परीक्षेच्या परिणामाला निराळें पाडतां येणें शक्यच नाहीं. कोणी जर असें म्हणेल कीं परीक्षेसाठीं केलेली मेहनत ही एक प्रकारची क्रिया आहे आणि परीक्षेंत मिळालेलें यश हा एक निराळ्याच प्रकारचा परिणाम आहे, तर तें म्हणणें चुकीचें ठरेल. कोणाला मुंबईहून कलकत्त्याला जायचें आहे अशी कल्पना आपण करूं या. यांत कलकत्त्याला जाऊन पोहोंचणें हें ध्येय झालें आणि प्रत्यक्ष प्रवास हें त्याचें साधन झालें. मुंबईहून निघून कलकत्त्याच्या दिशेनें टाकलें जाणारें प्रत्येक पाऊल, कापलें जाणारें प्रत्येक फुटाचें अंतर, हें त्या ध्येयप्राप्तीचाच एक भाग आहे. तें पाऊल किंवा तें अन्तर कलकत्त्याला पोहोंच-

ण्याच्या क्रियेहून निराळें आहे असें मानणें चुकीचें होईल. उंच स्थानावरून एखादा पदार्थ हातांतून आपण सोडला तर तो जमिनीवर येऊन पडतो. पृथ्वींतील गुरुत्वाकर्षणाच्या शक्तीमुळें तो तसा पडतो. पण प्रतिक्षणीं गुरुत्वाकर्षणाची शक्ति वाढत असते. पहिल्या क्षणीं जें आकर्षण झालें त्यामुळें पदार्थांत पृथ्वीच्या दिशेनें विशिष्ट गति उत्पन्न होते, पण आकर्षण सतत चालू असल्यामुळें प्रत्येक क्षणीं गतींत वाढ होत जाते आणि दुसऱ्या क्षणाची गति म्हणजे पहिल्या क्षणाची गति, अधिक दुसऱ्या क्षणाच्या नवीन आकर्षणामुळें मिळालेली गति, असें समीकरण येतें. त्यामुळ पदार्थ जसजसा पृथ्वीच्या जवळ जवळ येत जातो तसतशी त्याची गति वाढते आणि शेवटीं तो पृथ्वीवर येऊन पडतो. गणितशास्त्रांतील हा नियम सर्वांनाच माहीत आहे. यांत पडण्याची गति आणि पृथ्वीला पोहोंचण्याची क्रिया या निराळ्या आहेत असें म्हणतां येत नाहीं.

वरील उदाहरणांवरून एवढेंच दाखवावयाचें आहे कीं ध्येयप्राप्ति ही ध्येयप्राप्तीच्या मार्गाहून किंवा उपायांहून निराळी असूं शकत नाहीं. ध्येयप्राप्तीचा सारा मार्ग, ध्येयप्राप्तीची सुरवातीपासून शेवटपर्यंतची सारी क्रिया, ही ध्येयप्राप्तीचाच भाग असते. असें जर आहे तर मार्ग निराळाच घेऊन ध्येयप्राप्ति निराळीच होईल असा हिशोब करणें चुकीचें नाहीं काय? मुंबईहून कलकत्त्याला जावयाचें असेल तर, कलकत्त्याचे दिशेनेंच चाललें पाहिजे. शुद्ध ब्रह्मचर्याची सिद्धि मिळवायची असेल तर सर्व वेळ ब्रह्मचर्याच्याच मार्गानें चालायला पाहिजे. उच्च-पर्वतारोहण करायचें असेल तर सर्व वेळ वर चढण्याचीच क्रिया करायला पाहिजे. त्याचप्रमाणें उच्च ध्येयाची प्राप्ति करायची असेल तर उच्च मार्गाचाच अवलंब करायला पाहिजे, उच्च साधनेंच स्वीकारलीं पाहिजेत. हलक्या कोटीच्या साधनांनीं उच्च ध्येयाची प्राप्ति होईल, हें मानणें चुकीचें आहे.

आतां स्वराज्यसिद्धीच्या मार्गाचा विचार आपण करूं या. गांधीवादाचें स्वराज्य म्हणजे केवळ राजकीय पारतंत्र्याचा अभावच नव्हे. असें अभावात्मक स्वराज्य गांधीवादाला नको आहे. गांधीवादाची स्वराज्याची कल्पना निराळीच आहे. गांधी आपल्या स्वराज्याला 'रामराज्य' या नांवानें ओळखवितात. या शब्दांत पुष्कळच अर्थ अभिप्रेत आहे. गांधीवादाच्या स्वराज्याची इमारत सत्यावर रचलेली असेल; त्याचें मुख्य सूत्र समता असेल; त्या स्वराज्यांत अन्यायाला, साम्राज्यतृष्णेला, कपटाला स्थान असणार नाहीं. असें स्वराज्य प्राप्त करण्यासाठीं साधनेंही त्याच प्रकारचीं वापरलीं पाहिजेत. असत्याचा

कपटाचा किंवा चोरीचा अवलंब करून या प्रकारचें स्वराज्य मिळवितां येणें शक्य नाहीं. म्हणूनच गांधीवादाच्या राजकारणांत असत्याला अवकाश नाहीं. स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं शत्रूंशीं कपट केलें तरी हरकत नाहीं, असें मानणारे निधड्या छातीचे पुष्कळ देशभक्त आहेत. त्यांची देशभक्ति आणि त्यांचा त्याग यांमुळें ते अत्यंत आदरणीय असले तरी त्यांचा मार्ग चुकीचा आहे, असेंच म्हणावें लागतें. कपटाचरणामुळें शत्रु फसून तात्कालिक विजय मिळाला असें वाटलें तरी तो विजय स्वराज्यप्राप्तीचें ध्येय जवळ आणीत नसून, त्या ध्येयापासून देशाला दूरच नेत आहे, हें विसरतां कामा नये. या दृष्टीनें विचार केला असतां असत्य किंवा कपटाच्या मार्गानें मिळालेलें स्वराज्य मला नको असें जें गांधी म्हणतात त्याचा अर्थ आपल्याला बरोबर समजेल. उच्च ध्येयाच्या प्राप्तीसाठीं उच्च मार्गाचाच अवलम्ब केला पाहिजे हा गांधीवादाचा आग्रह कशासाठीं आहे, हें एवढ्यावरून स्पष्ट होईल, असें वाटतें.

"प्रेमांत आणि लढाईंत सर्व कांहीं न्याय्यच असतें" अशी एक इंग्रजींत म्हण आहे. कोण्या महापुरुषानें ही म्हण शोधून काढली कोण जाणे ! पण या दुर्दैवी वचनाचा आधार नेहमीं घेतला जातो ही आश्चर्याची गोष्ट आहे. वैयक्तिक किंवा सामाजिक जीवनाला पोषक अशा कोणत्याही विचारसरणींत वरील सिद्धान्ताला स्थान देतां येणार नाहीं. युद्ध असो किंवा युवतीचें प्रेम जिंकण्याची खटपट असो, त्यांत वाटेल त्या प्रकारचें वर्तन करायला हरकत नाहीं, या म्हणण्याला नैतिक किंवा धार्मिक पाठिंबा कशाचाच नाहीं. कोणीतरी घाईघाईनें आपल्या सोईसाठीं हें वचन फेंकलें आहे आणि त्याचा उल्लेख वरवर विचार करणारे लोक वाटेल त्या वेळीं करतात. खरें पाहिलें तर स्वातंत्र्य-सिद्धीसाठीं लढल्या जाणाऱ्या युद्धालाही नीतीचें बंधन आहेच. महाभारत युद्धाचे नियम आपण पाहिले तर त्यांत नीतीचीं कितीतरी बंधनें आपल्याला दिसून येतात. "सूर्यास्तानंतर युद्ध बंद झालेंच पाहिजे, निःशस्त्रावर हत्यार चालवितां कामा नये, लढाईच्या सर्व नियमांचें पालन झालें पाहिजे" वगैरे बंधनें होतींच. एका काळीं स्त्री असलेल्या शिखंडीवर हत्यार चालविण्याऐवजीं भीष्माचार्यांनें स्वतःचा मृत्यु जास्त पसंत केला, ही गोष्ट त्या वेळच्या युद्धविषयक नीतीची कल्पना आपल्याला देत आहे. आक्षेपकानें श्रीकृष्णानें पांडवांना विजय प्राप्त करून देण्यासाठीं अनेक वेळां असत्याचा आश्रय केला, हें उदाहरण दिलें आहे. यांत श्रीकृष्णाच्या चारित्र्याविषयींच्या लौकिक दंतकथांवरच जास्त भिस्त

ठेवलेली आपल्याला आढळून येते. श्रीकृष्ण म्हणजे फसव्या मनुष्य, कारस्थानी पुरुष अशी कल्पना पुराणिकांनीं बहुजनसमाजाची करून दिली आहे. श्रीकृष्णाला सोळा हजार एकशें आठ स्त्रिया होत्या हें धडधडीत असत्य बहुजन-समाज अत्यंत श्रद्धेनें सत्य म्हणून स्वीकारतोच कीं नाहीं! आणि तशांत श्रीकृष्णाच्या प्रत्येक स्त्रीला दहा दहा पुत्र होते म्हणजे सोळा हजार एकशें आठला दहांनीं गुणिलें असतां श्रीकृष्ण एक लाख एकसष्ट हजार ऐंशी पुत्रांचा अद्भुत बाप ठरतो! काय ही विटंबना!! पण या अद्भुत विटंबनेपेक्षां श्रीकृष्णासारख्या अद्वितीय पुरुषाला कपटाची आणि असत्याची मूर्ति म्हणून लोकांपुढें रूजू करणें ही जास्त कठोर विटंबना आहे. महाभारत युद्धांत "नरो वा कुंजरो वा" असें अर्धसत्य सांगवून द्रोणाचार्यांचा वध श्रीकृष्णानें करविला, हा प्रसंग येतो. पण त्या प्रसंगाला गौरवास्पद रूप महाभारतकारानें कधींच दिलें नाहीं. हें अर्धसत्य म्हणजे असत्य सांगितल्यामुळें धर्माचा—युधिष्ठिराचा—रथ पृथ्वीला स्पर्श केल्यावांचून चालत होता, तो एकदम पृथ्वीवर चालूं लागला हाही प्रसंग युधिष्ठिराच्या असत्यकथनाचा परिणाम म्हणून सांगितला आहे. इतकेंच नव्हे पण मृत्यूनंतर या असत्यकथनाबद्दल युधिष्ठिराला थोडा वेळ नरकाचें दुःखही सहन करावें लागलें असा कथाभाग आहे. श्रीकृष्ण किंवा श्रीराम यांच्या जीवनांत कित्येक दोषार्ह वस्तु आपल्याला दिसून आल्या, तरी त्या अनुकरणीय आहेत किंवा धर्म्य आहेत असें सिद्ध होत नाहीं. "**यानि अस्माकं सुचरितानि तानि त्वयोपास्यानि, नो इतराणि**" हें श्रुतिवचनच महापुरुषांच्या जीवनाच्या अनुकरणाचे वेळीं आपल्याला मार्गदर्शक झालें पाहिजे. महापुरुषांच्या गुणांचें अनुकरण विहित आहे, त्यांच्या दोषांचें नव्हे. म्हणून श्रीकृष्णानें आपल्या राजकारणांत असत्याचा अवलंब केला, असें मानलें तरीही राजकारणांत असत्याचा अवलंब करणें श्रेयस्कर आहे, हें सिद्ध होऊं शकत नाहीं.

"**शठं प्रति शाठ्यं**" हा सिद्धान्त टिळकांनीं प्रतिपादिला म्हणूनच तो खरा आहे असें म्हणतां येत नाहीं. त्याचप्रमाणें "**शठं प्रत्यपि सत्यं**" हा सिद्धान्त गांधींनी प्रतिपादिला म्हणूनच तो खरा आहे असेंही म्हणतां येत नाहीं. आपल्याला या बाबतींत तारतम्यानें विचार केला पाहिजे. '**शठं प्रति शाठ्यं**' ची नीति फार जुनी आहे. पण या नीतीमुळें समग्र मानव-समाजाला फायदा झाला आहे कीं नुकसान, हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

त्या त्या वेळीं विशिष्ट व्यक्तीला या नीतीमुळें फायदा झाला, एवढ्यावरून ही नीति समग्र मानवसमाजाला उपकारक आहे, असें सिद्ध होत नाहीं. **शठं प्रति शाठ्यं** याचा अर्थ एका कपटाला हाणून पाडण्यासाठीं दुसऱ्या कपटाचा आश्रय घेणें. परिणाम काय होणार? जगांत कपटाचेंच प्राबल्य होणार. एका माणसानें माझी गाय मारली म्हणून मीं त्याचें वासरू जाऊन मारलें, तर एकंदर दोन प्रण्यांची हिंसा होऊन जगांतील अन्याय द्विगुणित झाला. माझ्या वासरूं मारण्यांत मला सूड घेतल्याचा संतोष मिळेल यापेक्षां दुसरा कुठला महत्त्वाचा परिणाम येणार? आणि जगांतील एका ऐवजीं दोन प्राण्यांची हिंसा करूनही हें समाधान मिळविणें माझें कर्तव्य कसें होऊं शकेल? ख्रिस्तानें सांगितलें कीं "जशास तसें ही नीति हितावह नाहीं; तिचा अवलंब करूं नका." बुद्धानें सांगितलें कीं "अक्रोधानें क्रोधाला जिंका." मग "ठोशाला ठोशा" हा सिद्धान्त कोणत्या प्रकारें जगाच्या कल्याणाचा ठरतो? फसवेगिरीवर रचलेलें युद्ध जगांत सुखशांतीची स्थापना कशी करूं शकणार? हे आणि अशा प्रकारचे सर्व सिद्धान्त उथळपणाचे असतात. तात्कालिक परिणामावर नजर ठेवून हे सिद्धान्त प्रतिपादिले जातात. वास्तविक रीतीनें 'अ' चा पक्ष जिंकतो कीं 'ब' चा हा प्रश्न महत्त्वाचा नसून सत्पक्ष जिंकतो कीं नाहीं, हा प्रश्न महत्त्वाचा आहे आणि सत्पक्षानें जिंकण्यासाठीं असत्याचा अवलंब केला तर त्यांत त्याचा गौरव तो काय? त्याला विजय कसा म्हणतां येईल? सत्पक्ष असत्यानें विजय मिळवील, तर आत्महत्या करून मिळविलेला तो पराजय होईल. सत्पक्षानें असत्याचा आश्रय घेतला यांतच त्यानें आपला पराजय करून घेतला. सत्याची स्थापना करण्यासाठीं असत्याचा आश्रय, न्यायाची स्थापना करण्यासाठीं अन्यायाचरण, युद्धें नाहींशीं करण्यासाठीं लढाया लढणें, नीतीचा विजय करण्यासाठीं अनीतीचा आश्रय, हीं सर्व वदतोव्याघाताचीं उदाहरणें आहेत. यांतील सर्व विचारसरणीच चुकीची आहे.

व्यावहारिक दृष्टीनें जरी विचार केला तरी जेवढें सत्य असेल तेवढ्या पुरताच विजय मिळतो. मूठभर पोह्यांत मापटेंभर कोंडा मिसळून ते पोहे फुंकून फुंकून खाण्यांत, पोहे खाण्याला वेळ अधिक लागेल आणि त्यामुळें पोहे जास्त खाल्ले असें वाटेल, तरी पण पोहे मूठभरच पोटांत जाणार! कोंडा फुंकण्याची व्यर्थ मेहनत मूर्खपणामुळेंच केली असें होणार!! त्याचप्रमाणें सत्यांत असत्य मिसळून लढलेल्या लढ्यांत विजय सत्याचाच होणार, अस-

त्याची मेहनत फुकट जाणार, इतकेंच नव्हे तर ती सत्याच्या विजयाच्या मार्गांत विघ्नरूप होणार. या बाबतींत १९३०–३२ च्या सत्याग्रहाचा इतिहास आपण पाहूं या.

१९३० सालचा सत्याग्रह हा गांधीवादाच्या सिद्धान्ताला जास्तींत जास्त अनुसरणारा सत्याग्रह होता. सत्याग्रही सैनिकांमध्यें बलिदानाची जणुं अहमहमिका लागली होती. सत्याग्रहाचे सर्व डाव उघडपणें खेळले जात होते. प्रतिपक्षाला कोठेंही फसविण्याचा प्रयत्न नव्हता. सर्वत्र वीरतेचें वातावरण होतें. उघड उघड मिरवणुकी निघत होत्या, लाठीहल्ले शांतपणें सहन केले जात होते. या सत्याग्रहाचें पर्यवसान उभय पक्षांमध्यें समाधान होऊन झालें आणि गांधी-इरविनकरारनाम्यावर सह्या होऊन सत्याग्रह थांबला. यानंतर गोलमेजी परिषद् झाली आणि त्या परिषदेंतून गांधी परत आले तेव्हां सरकारनें लागलीच त्यांना आणि इतर प्रमुख पुढाऱ्यांना पकडलें. यानंतर सत्याग्रहाची दुसरी मोहीम सुरू झाली. या दुसऱ्या मोहिमेंत सुरवातीलाच पुढारी तुरुंगांत गेल्यामुळें मागें राहिलेल्या लोकांनीं निराळीच नीति स्वीकारली. सत्याग्रहांत गुप्तता आणि असत्य हीं दोन तत्त्वें दाखल झालीं. प्रत्येकजण आपल्या रक्षणाचा प्रयत्न करूं लागला आणि अहिंसक विरोधाचा मुख्य कार्यक्रम बाजूला राहून कार्यकर्त्यांना सरकारपासून लपवून ठेवून कार्य चालू ठेवण्याची वृत्ति सर्वत्र पसरली. याचा परिणाम हा झाला कीं धड सत्याग्रहही राहिला नाहीं आणि धड राजकारणाचें डावपेंची युद्धही राहिलें नाहीं ! सत्याग्रहाच्या मूलभूत सिद्धान्ताला विरोधी असें फसवेगिरीचें रूप सर्वत्र पसरल्यामुळें सत्याग्रहाचें हत्यार निष्प्रभ झालें आणि दोन वर्षांनंतर गांधींना सत्याग्रह परत घ्यावा लागला.

वरील अनुभवावरून असें दिसून आलें कीं गांधीवादाच्या सत्याग्रहांत विरोधी तत्त्वें दाखल केलीं कीं सत्याग्रहाची शक्ति नष्ट होऊन जाते, आणि तसें होणें अगदीं स्वाभाविक आहे. कारण कीं सत्याग्रहाचा सिद्धान्त ज्या मूलभूत तत्त्वावर रचलेला आहे, त्या तत्त्वाला विरोधी अशा भावना आणि क्रिया सत्याग्रहांत घुसल्या तर सत्याग्रहाची शक्ति क्षीणच होणार. सत्याग्रहाचा मूळ पायाच सत्य आहे. सत्याला विरोधी अशी वृत्ति म्हणजे फसवेगिरी. ही वृत्ति दाखल झाली म्हणजे सत्याग्रहाचें शुद्ध स्वरूप नाहींसें होऊन त्याला विकृत स्वरूप येतें आणि त्यामुळें सत्याग्रहांतून विरोधी पक्षाचें हृदयपरिवर्तन हा जो

परिणाम थावयाचा तो येऊं शकत नाहीं. परिणामीं सत्याग्रहाची मोहीम अयशस्वी ठरते.

आतां गांधीवाद सत्याचें पालन इच्छितो त्याचें तादृश स्वरूप काय आहे, तें आपण पाहूं या. आपण पाहिलें कीं अहिंसक संघटनेच्या अथवा सत्याग्रहाच्या दोन बाजू आहेत. एक रचनात्मक कार्यक्रम आणि दुसरी सविनय कायदेभंग, (यालाच आपण सत्याग्रहाच्या नांवानें ओळखतों ). या दोन्ही प्रकारच्या कार्यांत सत्य हाच पाया घेऊन सारी इमारत रचावी लागते. रचनात्मक कार्यक्रमासाठीं जें संघटनातंत्र उभें केलें जाईल त्यांत शंभर टक्के प्रामाणिकपणा असला पाहिजे. बहुजनसमाजाला अहिंसक समाजरचनेसाठीं तयार करते वेळीं त्यांना सत्याच्या निर्भय मार्गानें चालण्याचें शिक्षण समाज-सेवकानें दिलें पाहिजे. प्रत्येक व्यक्ति आपल्या नित्याच्या व्यवहारांत प्रामाणिक-पणें आणि सत्याला धरून वागेल असें शिक्षण सेवकानें समाजाला दिलें पाहिजे. खेड्यांतील समाजांत वेळोवेळीं अनेक प्रश्न उपस्थित होतात; कधीं कधीं तीव्र मतभेद निर्माण होऊन भयंकर पक्ष उपस्थित होतात; कधीं कधीं स्वार्थाचा संघर्ष होऊन एकमेकांशीं लढाया होतात. या सर्व प्रसंगीं सत्याच्या आणि अहिंसेच्या सिद्धान्ताला अनुसरून कसें वागावयाचें याचें शिक्षण समाज-सेवकानें लोकांना दिलें पाहिजे. या बाबतींत कोणाचाही मतभेद असण्याचें कांहींच कारण नाहीं. नवी समाजव्यवस्था सत्य आणि अहिंसेच्या पायावर झाली तर कोणाला नको आहे ?

पण मतभेद येतो तो लढायक स्वरूपच्या सत्याग्रहाचे वेळीं. सत्याग्रहाचे मोहिमेचे वेळीं विरोधी पक्ष अहिंसक विरोधाला अवकाशच मिळूं नये अशा प्रकारचा बंदोबस्त सतत ठेवीत असतो. अशा वेळीं सत्याग्रही लोकांची संख्या मर्यादित असली तर काय करावें हा प्रश्न उपस्थित होतो. अहिंसक विरोधाच्या मोहिमेचें संचालन करणारे मूठभर सत्याग्रही विरोधी सत्तेकडून पकडले जाऊन कारागृहांत डांबले गेले तर सत्याग्रहाची मोहीम कोण चालवणार, हा प्रश्न सत्याग्रह्यांपुढें उभा होतो आणि या प्रश्नाचें एकच निराकरण त्यांना दिसतें आणि तें हें कीं सत्याग्रह्यांना पकडलें न जाऊं देणें. यांतूनच फसवेगिरीचा उद्भव होतो आणि सत्याग्रहाचें सारें तंत्र बिघडून जातें.

सकृद्दर्शनीं फसवेगिरींत कांहींच दोष नाहीं असें वाटतें. पण फसवेगिरी हें सत्याग्रहाला विरोधी तत्त्व आहे, हें विसरतां कामा नये. सत्याग्रहाची शक्तिच

उघडपणें प्रतिपक्षाला आव्हान देण्यांत असते. हा उघडपणा हेंच सत्याग्रहाचें बळ आहे. या उघडपणांतूनच स्वतःच्या प्राणाचीही पर्वा न करतां झगडण्याची शक्ति सत्याग्रह्याला मिळते. या उघडपणामुळेंच सत्याग्रह्याच्या पक्षाचा न्यायीपणा जगाला तावडतोब पटतो. या उघडपणामुळेंच बहुजनसमाजांत अन्यायाच्या प्रतिकाराची शक्ति येते. जेथें असत्यावर रचलेली गुप्तता आली तेथें बहुजनसमाजाचा संबंध कमी होतो, इतकेंच नव्हे तर तो नाहींसाही होतो. हिंसक क्रान्तिकारी पक्षाच्या गुप्त संस्था आपल्या देशांतही पुष्कळ होत्या, अजूनही असतील. या सर्वांनीं ज्या उज्ज्वल देशभक्तीचें दर्शन साऱ्या देशाला करविलें त्याबद्दल आपल्या मनांत अभिमान आणि आदराची भावना जागृत होते; पण या सर्वांचें संघटन गुप्त रूपाचें असल्यामुळें त्याचा समाजाशीं कांहींच संबंध येत नाहीं. त्यामुळें या देशभक्तांच्या सर्व प्रवृत्ति, त्यांचें बलिदान, त्यांचें संघटनाचातुर्य त्यांच्याच मर्यादित क्षेत्रांत शेवटपर्यंत राहातें आणि त्याचा समाजाला स्पर्शही होत नाहीं. परिणामीं बहुजनसमाजाचा सक्रिय सहकार न मिळाल्यामुळें देशव्यापी क्रान्तीची भावना उत्पन्न होऊं शकत नाहीं आणि क्रांतीचा प्रयत्न निष्फल ठरतो. याचे उलट अहिंसक संघटनाची सारी शक्तिच उघड आणि निर्भय विरोधांत असल्यामुळें या विरोधाची भावना बहुजनसमाजांत जागृत होऊं शकते आणि त्यामुळें विरोध सफल होऊं शकतो.

जो मार्ग घ्यावयाचा त्याचें तंत्र संभाळलें नाहीं तर तो मार्ग यशस्वी होणें शक्य नाहीं. हिंसक विरोधाचें जसें तंत्र असतें, तसेंच अहिंसक विरोधाचेंही असतें. अहिंसक विरोधाच्या तंत्राचे आधारस्तंभ आहेत सत्य आणि अहिंसा. या दोहोंचें पालन झालें नाहीं तर अहिंसक विरोधाची सारी इमारतच ढासळून पडणार. आतां सत्याचें पालन म्हणजे काय, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. सत्याचें पालन म्हणजे सर्वच बऱ्या-वाईट गोष्टी चव्हाट्यावर आणणें असा अर्थ कोणीं केला तर तो चुकीचा होईल. गुप्तता न राखणें याचा अर्थ प्रत्येक गोष्ट वेशीवर टांगलीच पाहिजे असा कोणीं केला तर तोही चुकीचा होईल. सत्याग्रह्यासाठीं असत्य न बोलण्याचें कडक बंधन असतें हें खरें; पण प्रत्येक सत्य प्रकट केलेंच पाहिजे हें बंधन त्याला नसतें. जें सत्य प्रकट केल्यानें सत्पक्षाचें नुकसान होण्यासारखें असेल तें सत्य प्रकट न करणें हाच त्याचा धर्म होतो. अशा प्रकारें सत्य प्रकट न करणें याचा अर्थ गुप्तता नव्हे. असत्याशीं निगडित झालेली गुप्तता सत्याग्रहाला विरोधी असते. हिचेंच दुसरें नांव

फसवेगिरी आहे. सत्याग्रहांत आंत एक आणि बाहेर दुसरें ही नीति समाविष्ट होऊं शकत नाहीं.

मग सत्यपालनाची आणि गुप्ततेची मर्यादा कोणती ? याचेसाठीं एकच कसोटी आहे. वस्तुस्थिति आहे त्याहून निराळी भासविण्याचा प्रयत्न ज्या क्रियेंत येतो अशी क्रिया सत्याग्रहाच्या तंत्रांत बसूं शकत नाहीं. कारण कीं त्यांत असत्य आलें. पण असलेली वस्तुस्थिति प्रकट करतां कामा नये अशी परिस्थितिही संभवते. अशा वेळीं सत्य प्रकट न करण्यासाठीं जी गुप्तता पाळावी लागते ती सत्याग्रहांत समाविष्ट आहे. उदाहरणानें ही गोष्ट अधिक स्पष्ट करितां येईल. आपण असें समजूं या कीं लोकपक्षीं सत्याग्रहाची चळवळ चालू आहे. गांधीवादाच्या सिद्धान्ताप्रमाणें सत्याचा आग्रह न सोडतां प्रतिपक्षाशीं समाधान होऊं शकेल तर तें करणें, हें सत्याग्रह्याचें कर्तव्य आहे. त्याप्रमाणें समाधान घडवून आणण्याचा प्रसंग उपस्थित झाला (मग तो सत्याग्रही पक्षाकरवीं होवो किंवा विरोधी पक्षाकरवीं होवो किंवा एखाद्या तटस्थ पक्षाकरवीं होवो), तर त्या समाधानाच्या अटी नक्की करण्यासाठीं जो पत्रव्यवहार किंवा ज्या वाटाघाटी प्रतिपक्षाशीं किंवा इतरांशीं कराव्या लागतात, त्यांचा निकाल लागेपर्यंत त्या प्रकट न करणें सत्याग्रहाच्या चळवळीच्या दृष्टीनें आवश्यक असतें. अशा वेळीं पत्रव्यवहार किंवा वाटाघाटी गुप्त ठेवणें, म्हणजे त्या विशिष्ट व्यक्तीशिवाय इतर सत्याग्रह्यांना कळणार नाहींत अशी खबरदारी घेणें आवश्यक असतें. ही गुप्तता सत्याग्रहांत किंवा इतरत्रही ठेवावीच लागते आणि अशी गुप्तता ठेवण्यांत सत्याचा अपलाप करावा लागत नसल्यामुळें सत्याग्रहाच्या प्रवृत्तीची शक्ति त्यामुळें क्षीण होत नाहीं. १९३० च्या सत्याग्रहांत सप्रू-जयकरांच्या मध्यस्थीनें गांधी आणि व्हाइसरॉय यांच्यामध्यें ज्या वाटाघाटी झाल्या, त्या प्रत्यक्ष गांधी-इरविनकरारावर सह्या होईपर्यंत गुप्त ठेवण्यांत आल्या. अशा प्रकारच्या गुप्ततेंत आंत एक आणि बाहेर एक ही नीति नसते म्हणून त्यांत सत्याचा भंग होत नाहीं. म्हणून ही नीति सत्याग्रहाला अविरोधी आहे.

पण दुसऱ्या प्रकारची गुप्तता सत्याग्रहाला त्याज्य असते. एका प्रकारचें कार्य करावयाचें आणि जगाला निराळेंच भासवावयाचें अशा प्रकारची गुप्तता सत्याग्रहांत समाविष्ट होऊं शकत नाहीं. कारण कीं यांत असत्याचरण होतें. या प्रकारच्या गुप्ततेच्या मुळाशीं भयवृत्ति असते, म्हणूनच असत्याचा आश्रय

घेणें आवश्यक वाटतें. जेथें भय नाहीं, तेथें असत्याची जरूरच नसते. आणि भयावर रचलेला कोणताच कार्यक्रम सत्याग्रहांत समाविष्ट होऊं शकत नाहीं. म्हणूनच गांधी असत्यमय गुप्तलेला नेहमीं धिक्कारतात. The sin of Secrecy या नांवानें ते या गुप्ततेला ओळखतात. गांधींच्या जीवनांत या प्रकारच्या गुप्ततेला बिलकूलच स्थान नाहीं. त्यांनीं अनेक वेळां आपल्या स्वतःच्या जीवनांतील लौकिक दृष्टया गुप्त ठेवण्यासारख्या गोष्टी चव्हाट्यावर आणल्या आहेत. पण याबरोबरच गांधींनीं अनेकांचीं रहस्येंही अगदीं गुप्त ठेविलीं आहेत. १९२०–२१ च्या सत्याग्रहाच्या चळवळीच्या वेळीं आणि त्यानंतरही हिंसक अत्याचाराचा मार्ग चुकीचा वाटल्यामुळें अनेक क्रान्तिकारी युवकांनीं गांधींच्या मार्गानें जाण्याचा निश्चय केला आणि तो त्यांना कळविते वेळीं त्यांनीं आपल्या क्रान्तिकारी जीवनाचीं रहस्येंही गांधींना सांगितलीं. पण हीं सारीं रहस्यें गांधींनीं आपल्या मनांतच ठेविलीं आणि कधींही बाहेर पाडलीं नाहींत. ही गुप्तता मनुष्याचा धर्म आहे. या गुप्ततेंत कोठेंही सत्याचा विरोध नाहीं.

गांधीवादाच्या सत्याच्या आग्रहाचा विरोध करतांना आक्षेपक एक उदाहरण नेहमीं देतात आणि तें गाईच्या मागें लागलेल्या कसायाचें. ते म्हणतात एका गायीच्या मागें एक कसाई सुरा घेऊन लागला आहे. गाय पुढें धावते आहे आणि कसाई मागें. असें करतां करतां सुदैवानें गाय कसायाला चुकवून कोठें तरी नाहींशी होते. गाय कोठें गेली हें रस्त्यावरील एक मनुष्य पाहतो. मागून येणारा कसाई त्या मनुष्याला गाय कोणत्या दिशेनें गेली असें धमकावून विचारतो. अशा वेळीं त्या मनुष्यानें गाय ज्या दिशेनें गेली ती दिशा दाखवावी काय? ती दिशा त्यानें दाखविली तर गायीची हत्या होण्यास तो कारणीभूत होईल. म्हणून त्यानें गायीची खरी दिशा न दाखवतां त्याहून भलतीच दिशा दाखवून त्या अत्याचाऱ्याची दिशाभूल केली पाहिजे. यांत असत्याचरण असलें तरी तेंच त्याचा धर्म, त्याचें कर्तव्य होतें.

आक्षेपकांची ही विचारसरणी सत्याग्रहाच्या तत्त्वाला मान्य नाहीं. अशा प्रसंगीं सत्याग्रह्याचें कर्तव्य असत्य बोलणें होऊं शकत नाहीं. त्याबरोबरच सत्य बोलणेंही त्याचें कर्तव्य होऊं शकत नाहीं. त्यानें दृढतेनें कसायाशीं त्या बाबतींत सहकार करण्याचा इनकार केला पाहिजे. त्यानें कसायाला सांगितलें पाहिजे कीं गायीच्या बाबतींत मला तुला कांहींच सांगतां येत नाहीं. असें सांगण्यानें सत्याग्रह्यावर तो कसाई चिडेल आणि कदाचित् त्याचेवर हत्यार

चालवील, तरीही सत्याग्रह्याचा धर्म सत्य बाहेर न पाडणें हाच होतो. सत्याग्रही असत्यही बोलणार नाहीं, सत्यही प्रकट करणार नाहीं, आणि जो परिणाम येईल तो सहन करील.

सत्य प्रकट करण्याच्या मर्यादा आहेत. वैयक्तिक जीवनांतही "**सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् न ब्रूयात् सत्यमप्रियम्**" हा नियम सर्वमान्य गणला जातो. अप्रिय सत्य प्रकट न करणें हें पुष्कळ वेळां आवश्यक असतें. उदाहरणार्थ, रोग्याला क्षयासारखा रोग लागू झाला असेल तर तो रोग्यापुढें प्रकट न करणें कधीं कधीं आवश्यक असतें. तो तसा प्रकट न करणें हा वैद्याचा धर्म होतो. पण सत्य प्रकट न करणें म्हणजे असत्य सांगणें असा अर्थ होत नाहीं. या दोन वस्तु भिन्न आहेत.

एवढ्यावरून गांधीवादाची दृष्टि स्पष्ट व्हायला पाहिजे. "**शठं प्रत्यपि सत्यम्**" याचा हा अर्थ समजावयाचा. "**शठं प्रति शाठ्यम्**" ही नीति धोक्याची आहे, कारण कीं "**शठं प्रति शाठ्यम्**" चें पर्यवसान "**सर्वं प्रति शाठ्यम्**" या नीतींत नेहमीं होतें. शठ कोणाला म्हणावें हें कसें नक्की करावयाचें ? आणि एकदां शठत्व शोधण्याची दृष्टि आली कीं जो कोणी भेटेल तो शठच आहे असें मानण्याची वृत्ति होते आणि "**सर्वं प्रति शाठ्यम्**" चें वर्तन होऊं लागतें.

सत्य एक असतें, तर असत्य बहुशाख आणि अनन्त असतें. त्यामुळें सत्याचरणी माणसाची बुद्धि भगवद्गीतेच्या भाषेंत "व्यवसायात्मिका" होऊं शकते, पण असत्याचरणी माणसाच्या बुद्ध्या बहुशाख आणि अनन्त होतात. सत्याचरणी माणसावर सर्वांचाच विश्वास असतो, असत्याचरणी माणसावर कोणीच विश्वास करीत नाहीं. सत्याचरण हें भूमितीच्या सुरेखेसारखें सरळ असतें, असत्याचरण वक्ररेखेसारखें जटिल असतें. सत्याचरण नीति म्हणून स्वीकारलें कीं अगदीं सामान्य सैनिकालाही आपला मार्ग सरळ आणि स्पष्ट वाटतो, पण तेंच असत्याचरण आलें कीं भलभल्यांनाही मार्ग जटिल होऊन जातो. सत्य एकच असल्यामुळें त्याचें पालन केल्यानें समग्र सत्याग्रही सेना आपोआपच एकाच दिशेनें प्रगति करते, पण असत्य अनेकविध आणि जटिल असल्यानें असत्याचरणी सैनिक भिन्न भिन्न आचरण करतात आणि त्यामुळें प्रतिकाराची शक्ति विच्छिन्न होऊन जाते. या कारणामुळेंच गांधीवादानें सत्य हें आपलें आदिसूत्र म्हणून स्वीकारलें आहे. सत्याची नीति चुकीची आहे असें म्हणणारे

लोक या सर्व गोष्टींचा विचार करतील, तर त्यांना सत्याच्या आग्रहाचें महत्त्व पटल्याशिवाय राहणार नाहीं.

राजकारण असो किंवा जीवनाचें दुसरें कोणतेंही क्षेत्र असो, सत्याचा आग्रह हेंच एक श्रेयस्कर तत्त्व आहे, हीच कल्याणप्रद नीति आहे. शठाचें शठत्व नाहींसें करणें हा गांधीवादाचा आदर्श असल्यामुळें "शठं प्रत्यपि सत्यम्" ही सोज्ज्वल नीति गांधीवादानें स्वीकारली आहे आणि ही नीति कोठेंही विघातक होत नाहीं, हें वरील विवेचनावरून वाचकांना पटलें पाहिजे असें वाटतें.

# २१ अहिंसक समाजरचना

**आक्षेपः—** गांधीवाद "अहिंसक समाजरचना" असा शब्दप्रयोग नेहमीं योजितो. ही अहिंसक समाजरचना कशी असेल त्याचें स्पष्टीकरण गांधीवादानें कोठेंच केलें नाहीं. त्यामुळें ती एक काल्पनिक समाजरचना आहे असेंच म्हणावें लागतें, कारण कीं अद्याप इतिहासानें अशी समाजरचना जगाला कधींच दाखविली नाहीं.

**उत्तरः—** जगाच्या इतिहासांत आजपर्यंत विशिष्ट प्रकारची समाजरचना येऊं शकली नाहीं, म्हणून ती पुढें कधींही येणें शक्य नाहीं, हें म्हणणें तर्कविहित नाहीं. पूर्वीं कधींही नसलेले सिद्धान्त आतां दिसून येतात. पूर्वीं कधींही नसलेल्या राज्यपद्धति आज दिसून येतात. पूर्वीं कधींही नसलेली युद्धपद्धति आज दिसून येते. मग पूर्वीं कधींही नसलेली समाजरचना आज अथवा उद्यां होऊं शकणार नाहीं असें म्हणायला काय आधार आहे? बरें, गांधीवादाची समाजरचना काल्पनिक (Etopian) आहे असें आज कसें म्हणतां येईल? ती काल्पनिक आहे कीं व्यवहार्य आहे याचा निर्णय इतिहास करील. गांधीवादाची समाजरचना आज अस्तित्वांत नाहीं, म्हणून ती केव्हां अस्त्विांत येईल, अथवा येईल किंवा नाहीं हें कसें सांगतां येणार?

ही समाजव्यवस्था केव्हां अस्तित्वांत येणार हें आज ठरवणें अशक्य असल्यामुळें त्या बाबतींत विवाद करणें निरर्थक आहे. पण गांधीवादाची अहिंसक समाजरचना कशी असेल याविषयींचें स्पष्टीकरण अवश्य केलें पाहिजे.

अहिंसक समाजरचना म्हणजे अहिंसेच्या सूत्रानें बांधलेली समाजरचना. आज जगांत ज्या समाजरचना आपल्याला दिसून येतात, त्यांतही अहिंसेला प्राधान्य देण्याचा प्रयत्न आहेच. समाजाचे घटक म्हणजे व्यक्ति एकमेकांशीं प्रेमानें आणि सलोख्यानें वागाव्यात, असेच कायदे आणि नियम आजच्या समाजरचनेंत दिसून येतात. पण या प्रयत्नाच क्षेत्र अत्यंत मर्यादित असल्यामुळें आजची समाजरचना अहिंसक आहे असें म्हणतां येत नाहीं. स्थूल अर्थानें परपीडन न व्हावे असे कायदे जरी असले तरी आजच्या समाजरचनेंत सूक्ष्म परपीडनाला अवकाश आहे इतकेंच नव्हे तर कायदे आणि रूढी त्याला जाणून बुजून किंवा अजाणतां उत्तेजनच देत आहेत. उदाहरणार्थ, गांवोगांवीं गरीब शेतकऱ्यांना लुबाडणाऱ्या सावकारांचे कारभार, गरीब मजूर वर्गाला पिळून काढणारे भांडलवाले, श्रमजीवी वर्गाला लुबाडणारा बुद्धिजीवी वर्ग, कायदा आणि व्यवस्थेच्या नांवानें निर्दोष आणि सदोष जनतेवर जुलूम करणारें पोलीस खातें, स्त्रीवर्गाला चिरडून टाकून त्यांना अबला बनविणारा पुरुषवर्ग, मागणी आणि पुरवठ्याच्या अनिष्ट तत्त्वानुसार गरजू लोकांना मातीमोल किंमतीनें विकत घेणारे कारखानदार, राज्यतृष्णेमुळें किंवा वैयक्तिक महत्त्वाकांक्षेमुळें क्षुल्लक कारणावरून राष्ट्राराष्ट्रांत बखेडे उत्पन्न करून युद्धाच्या दावानळांत अनेक निर्दोष माणसांची आहुति देणारीं राज्यतंत्रें—हीं सारी हिंसक समाजरचनेंतील जळजळीत जुलमाचीं उदाहरणें आहेत. याशिवाय खेड्यांना लुटून समृद्ध बनणारीं शहरें, समाजांत बेकारी पसरून आपलें उखळ पिवळें करणारे यंत्रांचे मालक कारखानदार, वाजवीपेक्षां अधिक उत्पादन करून जगांतील देशांवर तें उत्पादन लादून त्यांना लुबाडणारा व्यापारीवर्ग, हे सव हिंसक समाजरचनेचे आधारस्तंभ आहेत.

यांतून गांधीवादाला अहिंसक समाजरचनेची स्थापना करावयाची आहे. हें काम किती अवघड आहे याची कल्पना कोणालाही सहज येण्यासारखी आहे. आज जगांत ज्या अत्याचारी शक्ति प्रबल होऊन बसल्या आहेत त्यांना हटवून त्यांचे जागीं अनत्याचारी शक्तीची स्थापना करण्याचें काम गांधीवादाला अभिप्रेत आहे.

यासाठीं सर्वांत प्रथम समाजरचनेंतील आर्थिक विषमता नाहींशी केली पाहिजे. गांधीवादाच्या रचनात्मक कार्यक्रमांतील खादी, ग्रामोद्योग आणि आर्थिक समानता हे तीन कार्यक्रम आर्थिक विषमता दूर करण्याचे हेतूनेंच

योजिले आहेत. आर्थिक विषमता संपत्तीच्या केन्द्रीकरणामुळें झाली आहे, हें समाजवादाचें मूलभूत तत्त्व गांधीवादालाही मान्य आहे. तें केन्द्रीकरण दूर करण्यासाठीं समाजवाद उद्योगधंद्यांचें राष्ट्रीकरण आणि खाजगी मिळकतीचा संचय न होऊं देणें या दोन गोष्टी सुचवितो. गांधीवादानें उद्योगधंद्यांचे दोन विभाग केले आहेत. एक राष्ट्रीय केन्द्रीकरणाच्या दृष्टीनें चालणारे धंदे आणि दुसरे ग्रामोद्योग. जे उद्योग माणसाच्या हातानेंच फक्त होऊं शकणार नाहींत आणि जे उद्योग मानवी जीवनाच्या प्राथमिक गरजा पुऱ्या पाडण्यासाठीं नसून इतर उत्पादनासाठीं आहेत, त्या उद्योगधंद्यांचें राष्ट्रीय केन्द्रीकरण गांधीवाद करूं इच्छितो. मनुष्याच्या प्राथमिक गरजा म्हणजे अन्न, वस्त्र आणि घर. यासाठीं शेती, विणकाम आणि गवंडीकाम हे धंदे आहेत. सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर या तीन मुख्य धंद्यांच्या आसपास किती तरी उद्योग रचले गेले आहेत. उदाहरणार्थ शेतीच्या बरोबरच दळणें, कांडणें, विहिरी खणणें, कुंभारकाम, तेलीकाम, वगैरे उद्योग येतात. विणकामाचे बरोबर कांतणें, पिंजणें, रंगविणें, धुणें, चांभारकाम वगैरे धंदे येतात. गवंडीकामाचे बरोबरच सुतारीसारखे धंदे येतात. या सर्व धंद्यांना विकेन्द्रीकरणाच्या पद्धतीनें चालवून माणसांच्या हाताच्या मजूरीनेंच सर्व उत्पादन व्हावें, हा गांधीवादाचा आदर्श आहे. अशा तऱ्हेनें जीवनाच्या प्राथमिक गरजा मानवी श्रमाच्या बळावरच उत्पन्न होऊं लागल्या म्हणजे तेवढ्या धंद्यापुरतें तरी संपत्तीचें केन्द्रीकरण होऊं शकणार नाहीं, आणि खेडींपाडीं तरी केन्द्रीकरणाच्या अनिष्ट परिणामांतून वांचतील.

आतां शहरांत चालणारे जे धंदे आहेत ते हातच्या मजूरीनेंच चालण्यासारखे नाहींत. त्यांना यंत्रांची जरूर पडणारच. उदाहरणार्थ मोटारगाड्यांचे कारखाने. मोटारींचीं यंत्रें बनविण्यासाठीं दुसरीं यंत्रें लागणार आणि मोटारी बनविण्यासाठीं केन्द्रीभूत कारखाने चालवावे लागणार. कारण कीं मोटारींचा कारखाना ग्रामोद्योगाच्या तत्त्वावर चालविणेंच शक्य नाहीं. हा कारखाना केन्द्रीकरणाच्या तत्त्वावरच चालवावा लागणार आणि तें केन्द्रीकरण समाजवादाच्या सिद्धान्ताप्रमाणें राष्ट्रीय केन्द्रीकरण असणार.

अशा प्रकारें खेड्यांतील विकेन्द्रीकरणाच्या तत्त्वावर चालणारे हस्तोद्योगाचे कारखाने आणि जेथें हस्तोद्योग शक्य नाहीं अशा उत्पादनासाठीं शहरांतून राष्ट्रीय केन्द्रीकरणाच्या तत्त्वावर चालणारे यांत्रिक कारखाने या जोड कार्यक्रमानें आर्थिक समतेची भूमिका गांधीवाद तयार करूं इच्छितो.

गांधीवाद ज्या स्वायत्त आणि स्वयंपूर्ण खेडेगांवाची रचना कल्पीत आहे, तें चित्र भारतवर्षात नवीन नाहीं. अगदीं हल्लीं हल्लींपर्यंत ग्रामपंचायतीच्या तत्त्वावर चालणारीं खेडीं हिंदुस्थानांत होतीं. खेड्यांतील केन्द्रशक्ति म्हणजे शेतकरी. त्या शेतकऱ्याचे आसपास इतर सर्व धंदे गुंफले जाऊन एक सुंदर समाजरचना आपल्या खेडेगांवांत होती. वर दाखविल्याप्रमाणें खेड्यांतील सारे ग्रामोद्योग शेतकऱ्याकडूनच पोषिले जात असत. प्रत्येक खेड्यांत हिंदुधर्माच्या वर्णव्यवस्थेला अनुसरून ब्राह्मण असायचाच. त्याचें काम मुलांना शिकविणें, धर्मोपदेश करणें आणि लग्नादि क्रिया करविणें आणि तिथिवारादिकांचें ज्योतिष सांगणें. हें काम ब्राह्मण करीत राही आणि त्याचे बदलीं त्याला वर्षाचे शेवटीं सुगीच्या वेळीं प्रत्येक शेतकऱ्याकडून अमुक इतकं धान्य नियमितपणें मिळे. वस्त्रादिकांचें उत्पादन इतरांप्रमाणें तो स्वत: घरींच सूत कातून करी. खेड्याचा इतर कारागीरवर्ग त्याला जरूर पडेल तेव्हां आपल्या कलेची मदत देई. उदाहरणार्थ, सुतार त्याचें घर बांधून देई, तेली त्याला तिळांतून तेल काढून देई, कोष्टी त्याला कपडे विणून देई, हजाम त्याची हजामत नियमितपणानें करी. सारांश त्याच्या जीवनाला आवश्यक सर्वच गोष्टी खेड्यांत या खेड्यांत त्याला मिळत आणि या सर्वाचें मूल्य म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें अध्यापनादि कामें करून तो चुकवीत असे. याचप्रमाणें इतर वर्गाची गोष्ट. शेतकऱ्याचें काम धान्य उत्पन्न करणें. बाकीचे कारागीर लोक आपापले धंदे चालवीत. सुतार प्रत्येकाचे घरीं लाकूडकाम करीत असे. त्याचे बदलीं तेली त्याला तेल काढून देई, हजाम त्याची हजामत करी, कोष्टी त्याचे कपडे विणून देई, ब्राह्मण त्याचे मुलांना शिकवी आणि शेतकरी त्याला धान्य देई ! म्हणजे कोणत्याही कामासाठीं पैशांत त्याचें मूल्य नक्की करावें लागत नसे. परस्परावलंबनाच्या सुंदर तत्त्वावर सारें खेडें ओतप्रोत झालेलें असल्यामुळें स्पर्धा किंवा द्वेष याला अवकाश कमींत कमी राही. या पद्धतींत क्रियेची, शक्तीची, मालाची देवघेव होई. त्यांत मध्यें पैशांची किंवा नाण्यांची जरूर भासत नसे. त्यामुळें संपत्तीच्या केन्द्रीकरणाचा प्रश्नच उभा होत नसे. सर्वांना आपल्या सर्वच गरजा मिळत असत आणि सर्वचजण सुखानें आणि सलोख्यानें राहात.

आतां कधीं काळीं तंटे झालेच तर ते मिटविण्यासाठीं ग्रामपंचायत असे. पंचायतींत गांवचे धुरीण लोक असत त्यांना गांवांतील आबालवृद्ध

प्रत्येक व्यक्तीच्या अंतर्बाह्य स्वरूपाचें ज्ञान असे. त्यामुळें एखाद्या व्यक्तीनें गुन्हा केलाच तर तो शोधून काढणें त्यांच्या हातचा मळ असे ! आणि अशा प्रकारें गुन्हा करणारी व्यक्ति बहुधा पंचायतीसमोर आली कीं आपला गुन्हा कबूलच करीत असे. परगांवांतील कोणी इसमानें येऊन गुन्हा केला तर गांवांत पावलांवरून त्या गुन्हेगाराला शोधून काढणारे कुशल लोकही असत. रात्रींच्या वेळीं गांवाचें रक्षण करणारे रामोशी लोक चोर पकडण्यांत फारच कुशल असत. पकडल्या गेलेल्या चोराला आपल्या गुन्ह्याचा इनकार करणें अशक्य होई आणि तो चोरीचा माल परत आणून देई. दुसऱ्या गुन्ह्यांचे बाबतींतही हीच स्थिति होती. सारांश, खेड्यांतून होणाऱ्या प्रत्येक गुन्ह्याचा शोध ताबड-तोब लागून त्याचें पारिपत्यही ताबडतोब होत असे. या बाबतींत निर्णय करते वेळीं सबंध गांवच बहुधा हजर राही आणि सर्वांच्या संमतीनेंच गुन्हेगाराला योग्य ती शिक्षा दिली जाई, त्यामुळें अन्यायाला फारसा वाव राहात नसे. आजच्या कोर्टपद्धतीपेक्षां ग्रामपंचायतीची ही पद्धति किती तरी अधिक साधी, निष्पक्षपाती आणि बिनखर्चाची आहे! कोर्टापायीं आपलें सर्वस्व पणाला लावून लढण्याच्या वृत्तीला त्या वेळीं अवकाशच नव्हता. वकीलाचे खिसे भर-ण्याचा प्रश्नच नव्हता, कारण कीं वकीलाची आवश्यकताच नव्हती.

आजच्या अर्थव्यवस्थेंत नाणें हें देवघेवीचें माध्यम असल्यामुळें, त्याचा संग्रह करणें फार सुलभ झालें आहे. धातूचें नाणें, त्यांतून पुढें कागदाचें नाणें आणि त्यांतूनहि पुढें कागदाची हुंडी अशा प्रकारें हजारों रुपये संग्रहित करण्याची युक्ति आज आपल्याजवळ आहे. ही सर्व पद्धति भांडवलशाहींतून निघाली आहे आणि भांडवलशाहीलाच पोषक आहे. पूर्वी श्रम हेंच विनि-मयाचें माध्यम असल्यामुळें संपत्तीच्या संग्रहाला किंवा केन्द्रीकरणाला कमींत कमी वाव होता. ज्याचे जवळ ज्यास्तींत ज्यास्त जमीन असेल असा शेतकरी श्रीमंत गणला जाई. पण त्याच्या श्रीमंतीचें स्वरूप कोणतें? त्याचे जवळ धान्याचा मोठा संग्रह असे, त्याचेजवळ कपडेलत्ते पुष्कळ असत, त्याचा वाडा मोठा असे, त्याचे घरीं नोकरचाकर जास्त असत, त्याचेकडे अंथरूण-पांघरूण अधिक असे. पण या सर्व अधिक वस्तूंचा उपभोग तो एकटा कसा घेणार ? धान्य खाऊन खाऊन किती खाणार ? कपडे वापरून वापरून किती वापरणार ? मोठ्या वाड्यांत एकटा कसा राहाणार ? म्हणून स्वतःच्या उपयोगानंतर राहिलेल्या साऱ्या वस्तु सार्वजनिक उपयोगासाठीं वापरल्या जात-

तशा त्या वापराव्या लागत. गांवांत कोणी पाहुणा आला तर उतारा या पाटलाचे घरींच. कोणाचें लग्न झालें तर ते पाटलाच्या वाड्यांत, कोणाला वापरायला दागदागिने पाहिजे झाले तर ते पाटलाकडून आणायचे, कोणाला धान्य कमी पडलें तर तें पाटलाच्या कोठारांतून मिळायचें! सारांश पाटलाजवळ जें कांहीं अधिक असे तें सर्व लोकांना उपयोगी पडत असे. गांधीवादाची ट्रस्टीपणाची कल्पना याहून भिन्न अशी नाहींच आणि गांधीवाद जी समाजरचना करूं इच्छितो ती या तत्त्वावरच आहे.

खेड्यांतून वरील तत्त्वांप्रमाणें समाजरचना झाली म्हणजे हिंदुस्थानच्या प्रश्नाचा नव्वद टक्के तरी निकाल लागला. मग उरतो दहा टक्क्यांचा प्रश्न म्हणजे शहरांचा प्रश्न. हा प्रश्न सोडविण्यासाठींही अशाच प्रकारची कांहीं तरी समाजरचना गांधीवादाला अभिप्रेत आहे. त्याची स्पष्ट रूपरेखा आज गांधीवादाजवळ नाहीं. कारण कीं अशी समाजरचना आपोआप घडली जाते. ती पहिल्यापासून ठरवितां येत नाहीं. भारतवर्षांत पूर्वीं जीं शहरें होतीं, त्यांच्या व्यवस्थेचा ऐतिहासिक दृष्टीनें अभ्यास करून आणि खेड्यांतील नवरचनेला अनुसरून शहरांची पुनर्रचना गांधीवादाला करायची आहे. यांत मूलभूत तत्त्व हें आहे कीं समाजांतील कोणत्याही व्यक्तीला किंवा वर्गाला समाजाचें शोषण करण्याची संधिच मिळूं नये. सारें समाजतंत्र इतकें परस्परावलंबी करून टाकावें कीं एका व्यक्तीला किंवा वर्गाला इतर वर्ग किंवा व्यक्ति वांचून चालूंच नये. आज पैसा हीच केन्द्रीभूत शक्ति आहे तिला पदच्युत करून तिच्याऐवजीं क्रिया ही शक्ति व्हावी. सट्टयासारखे निष्क्रियतेने धन होण्याचे धंदे बंद व्हावेत. शहरें म्हणजे खेड्यांचें शोषण करणारीं केन्द्र आज आहेत, त्याऐवजीं खेड्यांना एकसूत्रानें बांधणारी संस्कृति, व्यापार आणि उद्यमाचीं केन्द्रें तीं बनावींत. प्रांताप्रांतामध्यें दळणवळण चालू ठेवण्याचीं द्वारें म्हणून शहरांनीं आपली जबाबदारी चोखपणें संभाळावी. उच्च शिक्षणाचीं केन्द्रें म्हणून शहरांनीं खेड्यांतील उच्च प्रतीच्या बुद्धीला पोषण देऊन देशाचें बुद्धिवैभव समृद्ध करावें. कॉलेजें, विद्यापीठें, ग्रंथालयें, वाङ्मयनिर्मितीचीं केन्द्रें, कलाकौशल्याचीं केन्द्रस्थानें वगैरे प्रवृत्ति शहरांत असाव्या. उद्योगधंदे शहरांनीं चालवावे, पण ते राष्ट्रीय केन्द्रीकरणाच्या तत्त्वावर. संस्कृतिपोषक राज्यव्यवस्थेचीं मुख्य केन्द्रें शहरांतच असावीं, वगैरे सामान्य कल्पना शहरांविषयीं आपल्याकरितां देईल.

सारांश, शहरें काय किंवा खेडीं काय, गांधीवादाच्या तत्त्वांप्रमाणें त्यांची

पुनर्रचना करावयाची झाली तर त्यांत वरील दिशेनें काम केलें पाहिजे. ज्याप्रमाणें समुद्रांतील पाणी सूर्याच्या उन्हानें तापून त्याची वाफ होते आणि पुनः पावसाच्या रूपानें तें पाणी गोड होऊन साऱ्या जगाची तृष्णा शांत करितें, त्याचप्रमाणें खेड्यांतील लोकांच्या श्रमांतून उत्पन्न झालेली संपत्ति आणि शक्ति शहरांच्या द्वारा सर्वत्र वांटली जाऊन तिनें सर्वांना—खेड्यांनाही अधिक समृद्ध करावें, ही गांधीवादाच्या शहरांच्या रचनेची मूलभूत कल्पना आहे.

राजकीय बाबतींत नवीन समाजरचना कशी असावी हा प्रश्न सर्वांत शेवटीं उद्भवणारा आहे. जसा समाज तशीच राज्यपद्धति असणार. पण गांधीवाद संपूर्ण लोकशाहीच्या मताचा आहे या गोष्टीविषयीं कोणालाही शंका वाटण्याचें कारणच नाहीं. हिंदी राष्ट्रीय महासभे ( Indian National Congress ) ची घटना आपण पाहिली तर नैतिक बळावर रचलेलें लोकशासन कसें असतें त्याची कल्पना आपल्याला येईल. कॉंग्रेसजवळ लष्कर नाहीं किंवा पोलीसांची ताकतही नाहीं. तरी पण कॉंग्रेस आज हिंदी बहुजनसमाजावर जी नैतिक सत्ता चालवीत आहे, त्याची तुलना जगांतील दुसऱ्या कोणत्याही संस्थेंत आपल्याला सांपडणार नाहीं. अहिंसा हें समाजरचनेचें मुख्य सूत्र घेऊन तदनुसार जसजशी समाजरचना विकसित होत जाईल तसतसें अहिंसक राज्यतंत्रही विकसित होईल. कारण कीं राज्यतंत्र म्हणजे समाजाच्या विचारांच्या दिशेनें चालणारी सत्ता. समाजांतील व्यक्तींमधील परस्पर व्यवहारांत जितक्या प्रमाणांत अहिंसा आली असेल, तितक्याच प्रमाणांत राज्यतंत्रांत अहिंसा येऊं शकेल. म्हणूनच गांधीवादानें रचनात्मक कार्यक्रमावर इतका भार दिला आहे. रचनात्मक कार्यक्रमाचें सारें उद्दिष्टच समाजाची अहिंसक रचना हें आहे. त्या कार्यक्रमाची जीं [illegible] अंगें आहेत, त्या सर्वांची यथोचित सिद्धि म्हणजे अहिंसक समाजाची स्थापना. ही स्थापना झाल्यानंतर असा अहिंसक समाज जें राज्यतंत्र उभें करील तें अहिंसक ( संपूर्ण नाहीं तरी बहुंशीं अहिंसक ) राज्यतंत्र असेल. त्यापूर्वीं अहिंसक राज्यतंत्राची अपेक्षा करणच चुकीचें आहे. म्हणूनच मुंबई इलाख्यांत कॉंग्रेस मंत्रिमंडळाचें राज्य होतें तेव्हां गिरणगांवांतील दंगे थांबवण्यासाठीं जो गोळीबार करण्यांत आला त्याचा गांधींनीं जाहीर रीतीनें धिक्कार केला नाहीं. कारण कीं प्रचलित समाजरचनेंत हिंसक साधनांचा आश्रय घेतल्याशिवाय राज्यतंत्र चालविणेंच शक्य नाहीं, हें गांधींना बरोबर कळतें.

असें आहे तरी मुंबईत १९४१ सालीं झालेल्या हिंदु-मुसलमान दंग्याचे वेळीं शांतिसेनेची आपली योजना गांधींनीं लोकांपुढे ठेविली होती. तदनुसार शांतिसेना स्थापन करण्याचा प्रयत्नही करण्यांत आला होता. पण त्या वेळीं आंतरराष्ट्रीय परिस्थिति झपाट्यानें बदलत असून जपानच्या आक्रमणाची भीति देशांत पसरल्यामुळें, शांतिसेनेचा प्रश्न बाजूला राहिला. गांधींची ही शांतिसेनेची योजना गांधीवादाच्या अहिंसक राज्यतंत्राचें दिशासूचन आपल्याला देत आहे. पण तें मात्र दिशासूचकच आहे. अहिंसक राज्यतंत्राचें प्रत्यक्ष स्वरूप अहिंसक समाजाच्या स्थापनेनंतरच आपोआप विकसित होऊं शकेल. म्हणून त्याविषयीं अधिक विचार येथें होऊं शकत नाहीं.

अहिंसक समाजांत ज्या गोष्टी मुख्यत: दिसून येतील त्या गांधीवादानें आपल्या तेरा मुद्यांच्या रचनात्मक कार्यक्रमांत विशद केल्या आहेत. अहिंसक समाजांत भिन्नधर्मीयांचें ऐक्य राहील, जातिजातींतील वैमनस्य जाऊन त्याचे जागीं प्रेमभाव येईल, स्त्रिया सुशिक्षित होऊन त्यांना पुरुषांच्या बरोबरीचें स्थान मिळेल, समाजांतील साक्षरतेचें प्रमाण शेंकडा शंभर टक्के असेल, ग्रामोद्योग चालून खेडीं स्वाश्रयी होतील, खादीचा प्रचार सर्वत्र होईल, अस्पृश्यतेचें नांवनिशाणही राहणार नाहीं, स्वाश्रयी आणि क्रियाप्रधान शिक्षणपद्धति सर्वत्र सुरू होईल, मातृभाषेला तिचें महत्त्वाचें स्थान मिळेल, राष्ट्रभाषा हिंदुस्थानी सर्व देशांत चालू होईल आणि राष्ट्राचे सर्व कारभार राष्ट्रभाषेंत चालतील. सर्व धर्मांविषयीं समान बुद्धि राष्ट्रांतील लोकांत राहील. खेड्यांचा शहरांशीं परस्परावलंबनाचा प्रेमसंबंध राहील. कोठेंही अन्याय किंवा जुलूम रहाणार नाहीं. वगैरे लक्षणें गांधीवादाच्या रचनात्मक कार्यक्रमांत गर्भित आहेत. गांधी म्हणतात त्याप्रमाणें ही समाजरचना हळु हळू पण निश्चितपणें आज होत आहे. या प्रगतीची गति वाढण्याचा आधार बहुंशीं आंतरराष्ट्रीय परिस्थितीवर आज तरी आहे. पण अहिंसक समाजाची स्थापना केव्हांही होणारी असो, त्या दिशेनें हिंदुस्थान प्रगति करीत आहे, यांत तिळमात्रही शंकेला स्थान नाहीं.

## २२ गांधीवाद रूक्ष आणि नीरस?

**आक्षेप:—** गांधीवादानें साऱ्या समाजाला तपस्वी जीवनाची दीक्षा देण्याचा जणुं आग्रह राखला आहे. गांधीवाद

कला, स्थापत्य, वगैरेंच्या विकासाविषयीं उदासीनच नव्हे तर कधीं कधीं विरोधक दिसून येतो. नाटक, सिनेमा, वगैरे कला आणि करमणुकींच्या साधनां-विषयीं गांधीवादाला तिरस्कार आहे. या कारणांमुळें गांधीवाद सामान्य जनसमूहाला रुक्ष आणि नीरस वाटतो. म्हणूनच गांधींचे पूजकही गांधीवादाचे अनुयायी होऊं शकत नाहींत. गांधीवादानें आपली तपस्वी वृत्ति कमी केल्या खेरीज गांधीवाद सर्वमान्य होणें शक्यच नाहीं.

**उत्तर:—** गांधीवादांत आणि इतर प्रचलित विचारसरणींत एक महत्त्वाचा फरक हा आहे कीं गांधीवाद नैतिक जीवनावरच आपली सर्व इमारत रचितो. कोठेंही अनैतिकतेला ठाव नसावा अशी गांधी-वादाची अखंड जागृति आहे. वैयक्तिक किंवा सामाजिक जीवनांत कोठेंही मालीन्य आलेलें गांधीवादाला खपत नाहीं. आणि म्हणूनच राजकीय, सामा-जिक किंवा वैयक्तिक जीवनाचे बाबतींत पवित्रतेवर गांधीवाद फारच भार देतो. राजकीय किंवा सामाजिक जीवनांत सत्य आणि अहिंसेवर कसा भार दिला जातो हें आपण या पूर्वीं पाहिलेच आहे. त्याचप्रमाणें वैयक्तिक जीवनांत गांधीवाद पवित्रतेवर किती भार देतो याची यथार्थ कल्पना गांधीवादाच्या कोण्याही अभ्यासकाला आल्यावांचून राहणार नहीं. गांधींनीं हिंदुस्थानच्या राजकारणांत प्रवेश केला त्यापूर्वीं राजकारणाच्या क्षेत्रांत काम करणाऱ्या पुढा-ऱ्यांच्या वैयक्तिक चारित्र्याचा प्रश्न फारसा महत्त्वाचा गणला जात नसे. पण गेल्या २५ वर्षांत राजकारणांत जीं स्थित्यंतरें झालीं त्यामुळें ज्याचें चारित्र्य बावनकशी शुद्ध असेल तोच लोकांच्या आदराला पात्र होऊं शकेल अशी परि-स्थिति आली आहे. अमुक एक पुढारी दारू पितो अशा प्रकारची नुसती वदंता जरी लोकांत प्रचलित झाली, तरी त्यामुळें त्या पुढाऱ्याच्या विषयींचा बहुजन-समाजाचा आदर कमी झाल्यासारखा दिसतो. लैंगिक नीतीच्या बाबतींत तर गांधीवादाच्या मार्गानें काम करणाऱ्या सामान्य कार्यकर्त्यालाही अत्यंत पवित्र राहावें लागतें, मग पुढाऱ्यांची गोष्टच कशाला? अनेक वर्षांची एकनिष्ठ सेवा आणि अविरत त्याग करणाऱ्या सेवकांत दुर्दैवानें जर लैंगिक नीतीच्या बाबतींत क्षति उत्पन्न झाली तर सेवेच्या क्षेत्रांतून त्याला दूर व्हावें लागल्याचीं अनेक उदाहरणें आपल्याला माहीत आहेत.

गांधीवादाचा हा प्रखर नीतिवादच त्याचेवर रुक्षतेचा किंवा नीरसतेचा

जो भार देतो त्याचा विरोध करणें आक्षेपकाला शक्यच नसतें, म्हणून गांधीवादाची नीतिपरायणता असह्य वाटल्यामुळें जी असंतुष्ट वृत्ति उत्पन्न होते तिचें आविष्करण कला आणि साहित्य यांचा आश्रय घेऊन आक्षेपकाला करावें लागतें. वास्तविकपणें गांधीवादाला कलेचें किंवा साहित्याचें किंवा स्थापत्याचें वावडें मुळींच नाहीं. गांधीवादाचे प्रणेते महात्मा गांधी यांनीं आपल्या प्रत्यक्ष मालकीच्या आणि स्वतःच्याच धोरणाप्रमाणें चाललेल्या संस्थांतूनही कलेला पुष्कळ महत्त्वाचें स्थान दिलें आहे. साबरमतीच्या आश्रमांत चालणाऱ्या शाळेंत संगीत आणि चित्रकामाचें शिक्षण दिलें जात होतें. सेवाग्रामच्या आश्रमांत संगीत आणि कलेचें वातावरण पुरत्या प्रमाणांत आहे. गांधींची संगीताविषयींची आवड सुविख्यात आहे. प्रत्येक उपवासाचे वेळीं भक्तांचीं भजनें उत्तम गायकानें गायिलेलीं ऐकण्याचा गांधींचा उपक्रमच असतो. साबरमती आश्रमांतील संगीतशास्त्री कै. वा. नारायणराव खरे यांनीं गुजराथेंत संगीताचा प्रचार करण्याची जी अव्याहत मेहनत केली, त्याच्या मागें गांधींची प्रेरणा होतीच. कांग्रेसनगर बनविण्यासाठीं शांतिनिकेतनचे सर्वोच्च कलाधर पसंत करण्यांत गांधींची प्रेरणाच कारणीभूत आहे. गांधींच्या निकटच्या अनुयायांत आणि गांधीवादाच्या प्रचारकांतही कलाभिरुचि पुरत्या प्रमाणांत दिसून येते. श्री. काका कालेलकरांच्या तोडीचा कलारसिक पुरुष शोधूनही आढळणें कठीण आहे. कै. वा. महादेव देसाई हे साहित्यकलेचे मोठे आचार्य होते. आचार्य कृपलानीजींनीं गुजराथ विद्यापीठाचे आचार्य म्हणून कलेला जें उत्तेजन दिलें तें सुविख्यात आहे. गांधींच्या आश्रमांतून बाहेर पडलेले विद्यार्थी कलाभिरुचींत वाढलेले आढळून येतात. गांधी-कुटुंबांतील जीं मुलें आज देशकार्यांत पडलीं आहेत त्यांचेमध्यें संगीत, फोटोग्राफी वगैरे शोक आढळून येतात.

हीं सर्व उदाहरणें एवढ्यासाठीं दिलीं आहेत, कीं गांधींचा कलेला विरोध आहे ही कल्पना कोणाच्या मनांत असेल तर त्यांनीं ती काढून टाकावी. गांधींचें जीवनच कलामय आहे. गांधींनीं कोठेंही कलेचा विरोध केला नाहीं. उलट त्यांनीं प्रत्येक वेळीं कलेला उत्तेजनच दिलें आहे. गांधींच्या छायेखालीं चालणाऱ्या शिक्षणसंस्थांतील विद्यार्थी संगीत, नाट्य, चित्र वगैरे कलांची अव्याहत उपासना करीत असतात ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. गुजराथ विद्यापीठांतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या तरुणांतूनच गुजराथला सर्वश्रेष्ठ

गांधीवादाच्या विचारांची स्पष्ट छाप आपल्याला दिसून येते. गांधी स्वतः गुजराथी साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष झाले होते, ही गोष्ट सुविख्यात आहे.

असें आहे तर मग गांधीवाद कलेचा विरोधी आहे ही खोटी कल्पना आक्षेपकांना कशी सुचली ? याचें कारण सामान्यतः कलेच्या नांवानें ज्या गोष्टी समाजांत घुसडल्या जातात त्यांपैकीं पुष्कळशा समाजहिताला विघातक असल्यामुळें गांधीवादी त्यांचा विरोध करतात आणि हा विरोध अस्थानीं आहे असें कोण म्हणेल ? आपण महाराष्ट्राकडेच पाहिलें तर महाराष्ट्रांत चांगलीं म्हणून गणलीं जाणारीं मासिकें समाजाला आकर्षित करण्यासाठीं कलेच्या नांवानें कोणते उपाय योजितात ? मुखपृष्ठावर तरुण-तरुणींच्या श्रृंगाराचें दृश्य, किंवा एखाद्या सुरेख सिनेमानटीचें छायाचित्र या शिवाय दुसरी कोणतीच कला आपल्या मासिकांना आढळत नाहीं ! ही काय कलोपासना आहे कीं समाजाच्या उत्तान श्रृंगारप्रियतेला तोषवून कसा तरी आपला माल खपविण्याची कलाशून्य स्वार्थी वृत्ति आहे ? नग्न स्त्रियांचीं चित्रेंही अनेक मासिकांवर आपल्याला आढळून येतात. याला जर कला म्हणावयाचें असेल तर वारांगनेला स्त्रीत्वाचा आदर्श म्हणावा लागेल ! कलेला तिच्या उच्च स्थानावरून खालीं खेचून बाजारबसवीच्या पायरीला नेऊन पोहोंचविणारे आपले प्रकाशक कलेची किती विडंबना करीत आहेत, हें आपण सावध होऊन पाहिलें पाहिजे.

गांधीवादी कलेच्या या अधोगतीचा विरोध करितो, कलेचा नाहीं. पण हा विरोध स्वतःला कलारसिक समजणारे आक्षेपक सहन करूं शकत नाहींत. अत्यंत स्वच्छ राहणाऱ्या मनुष्याची निंदा घाणेरडे लोक नेहमींच करतात, त्यांतलाच हा एक प्रकार आहे. कलेच्या नांवानें राजरोस वावरणारी आणि लोकांच्या आवडीला पात्र झालेली वस्तु आहे चित्रपट. कोण्याही चित्रपट-निर्मात्याची मुलाखत घेतली तर तो कलेविषयीं लांब लांब प्रवचनें पुष्कळच देतो. पण त्याच्या प्रत्यक्ष कलाकृति पाहिल्या म्हणजे निर्वीर्य प्रेमकथांच्या भारुडाशिवाय दुसरें कांहींच आपल्याला पाहायला मिळत नाहीं. प्रकाश पिक्चर्सनीं बाहेर पाडलेलें "रामराज्य" चित्रकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून सर्वांनाच—गांधीवाद्यांनाही—आकर्षक वाटेल. पण अशीं किती चित्रें बाहेर पडतात ? चित्रपट पाहण्यांत दोन घटका मनोरंजन एवढाच परिणाम असता तरी सुद्धां गांधीवाद्यांनीं चित्रपटाचा विरोध केला नसता. पण निर्दोष आनंद देणें हेंच चित्रपटाचें लक्ष्य नसून प्रेक्षकांच्या मनांतील प्रसुप्त विषयवासना

जागृत करण्याचा मुख्य उद्देश निर्माते आणि दिग्दर्शक यांनीं आपल्यापुढें ठेविला असावा, असें वाटतें, आणि हें सर्व कशासाठीं? तर पैसे मिळविण्यासाठीं. जो धंदा पैसे मिळविण्यासाठीं चालतो, त्याला कला कसें म्हणावयाचें? कला कधीं पैशानें विकली जाते? आणि जी कला पैशानें विकली जाते, जी कला मनुष्याच्या अधोगामी वृत्तींना पोषण देते, तिला कला हें उज्ज्वल नांव कसें द्यावयाचें? आजचे चित्रपट आणि कला या दोहोंचा नांवापुरताही संबंध नाहीं असें म्हणावें लागतें. दारूचे गुत्ते आणि सिनेमाचीं थिएटरें दोन्ही आज सारखेंच काम करीत आहेत. दारू मनुष्याच्या शरीराची खराबी करते आणि निंद्य गणली जाते, पण सिनेमा मनुष्याच्या मनाला कमकुवत बनवितो आणि तरीही प्रतिष्ठित गणला जातो. या त्याच्या प्रतिष्ठितपणामुळेंच दारूपेक्षांही तो जास्त भयंकर आहे, असें म्हणावें लागतें. घरीं खायला पोटभर मिळत नसलें तरीही सिनेमासाठीं पैसे खर्चणारे लोक असंख्य आहेत. सिनेमाचा हा कैफच सिनेमाच्या विरोधाला प्रबल कारण आहे. कोणत्याही चांगल्या वस्तूचा कैफ कधीं चढत नसतो. चहा, अफू, दारू, तमाखू यांचा कैफ चढतो तसा कधीं दूध, ताक यांचा चढत नाहीं. सिनेमा जर समाजपोषक प्रवृत्ति असती तर तिचा कैफ कधींच चढला नसता.

वरील विवेचनानंतर गांधीवाद किंवा गांधीवादी कलेच्या नांवानें वावरणाऱ्या समाजहितविरोधी वस्तूंचा विरोध कां करितो तें स्पष्ट होईल, अशी आशा आहे. येथें वाचकांपुढें सहजच प्रश्न उपस्थित होईल कीं गांधीवाद ज्या कलेला आपल्या विचारसरणींत स्थान देतो त्या कलेचें स्वरूप तरी काय आहे? या प्रश्नाचा विचार करणें आवश्यक आहे.

एका वाक्यांत सांगायचें झालें तर जिच्या योगें मनुष्यजीवन विकासाच्या मार्गानें जातें तीच कला. गांधीवादाची कलेची ही अशी व्याख्या आहे. उलट, जिच्या योगें मनुष्यजीवन विलासाच्या मार्गानें जातें ती कला नव्हे, पण कलेचें पांघरूण घेऊन वावरणारी उच्छृंखलता आहे, असें गांधीवादाचें म्हणणें आहे. इंद्रियांच्या क्षणिक आवेगांना तृप्ति देण्यासाठीं केलेलीं सर्जनें कलेचीं सर्जनें कधींच होऊं शकणार नाहींत. "कलेसाठीं कला" असूंच शकत नाहीं. कला असेल तर ती जीवनविकासासाठीं. जिच्या योगानें व्यक्तिजीवन किंवा समाजजीवन विकसित होत नाहीं ती कला नव्हे. जिच्या योगानें समाजांत विलासाची वृत्ति वाढते ती कला नव्हे. कला म्हणजे पावित्र्य, कला

म्हणजे उन्नति, कला म्हणजे हृदयाच्या उच्चगामी वृत्तींचें पोषण, कला म्हणजे मानवी जीवनाच्या अपूर्ण आदर्शाचें आलेखन, कला म्हणजे इंद्रियांच्या गुलाम होऊन बसलेल्या मानवी वृत्तींना विलासप्रियतेंतून बाहेर खेंचून विकासाचे मार्गानें नेऊन जाणारी शक्ति. गांधीवादाची कलेची ही व्याख्या आहे आणि म्हणूनच गांधीवाद कलेच्या नांवानें वावरणाऱ्या विघातक प्रवृत्तींचा विरोधक आहे.

यावर कोणी असें म्हणेल कीं असें आहे तर गांधीवाद कलेच्या क्षेत्रांत प्रवेश करून कलेचें खरें स्वरूप समाजापुढें कां ठेवीत नाहीं? ही शंका स्वाभाविक आहे आणि गांधीवादानें या दृष्टीनें पुष्कळच कार्य केलें आहे. गांधीवादाच्या तालमींत वाढलेले कलाधर कमी नाहींत. मराठी, गुजराथी, हिंदी वगैरे भाषांच्या वाङ्मयांत गांधीवादाची छाप सर्वत्र दिसून येते. काव्यांतून गांधीवादानें रंगलेल्या भावना आढळून येतात. आतां सिनेमासृष्टींत आणि नाटक-कादंबऱ्यांत अद्याप गांधीवादानें प्रवेश केला नाहीं ही गोष्ट खरी आहे. पण त्याचें कारण गांधीवाद या क्षेत्राविषयीं उदासीन आहे किंवा या क्षेत्राचा समाजावर जो जबरदस्त प्रभाव आहे त्याची कल्पना गांधीवादाला नाहीं असें नव्हे. पण गांधीवादाला आज हें सर्व करायला पुरता अवकाश नाहीं. गांधीवादाची सारी शक्ति आज मुख्यतः भारतवर्षाची गुलामी आणि तद्भव दारिद्र्य-दुःख या दोहोंचा नाश करण्यांत गुंतलेली आहे. सिनेमा-नाटकादि कलांचा विचार गांधीवाद सावकाशपणेंच करूं शकणार. लोकांना पोटभर खायाला मिळूं लागलें आणि हिंदुस्थान जगांतील स्वतंत्र देशांच्या पंक्तीला जाऊन बसला म्हणजे या गोष्टींकडे गांधीवादाला लक्ष देतां येईल. स्वतंत्र भारतांत गांधीवादी राज्यसत्ता स्थापन झाल्यावर भारतीय राज्यतंत्रच कलेच्या व्यभिचाराला थांबवून आदर्श कला समाजापुढें ठेवील. तोंपर्यंत कलेच्या चालू व्यभिचाराचा मात्र विरोध करण्याशिवाय गांधीवादाला गत्यंतरच नाहीं.

गांधीवादाच्या तपस्वी वृत्तीबद्दल आतां आपण विचार करूं या. जी विचारसरणी किंवा समाजरचना समाजाला उन्नतीचा मार्ग दाखविणार नाहीं ती काय कामाची? गांधीवाद किंवा दुसरा कोठलाही वाद जर समाजाला असें म्हणेल कीं, "बाबांनो, तुमच्यांत दोष आहेत, पण त्याबद्दल वाईट वाटूं देऊं नका. दोष हे सर्वांतच असतात. मी तुमच्या दोषांवर पांघरूण घालीन.

तुम्ही खुशाल तुमच्या मार्गानें चाला. त्यांतल्या त्यांत सुख मिळविण्याचा मार्ग मी तुम्हांला दाखवीन–", तर त्या वादाचें महत्त्व काय? भांडवलवाद समाजाला हेंच सांगत नाहीं काय? समाजाच्या स्वार्थी दृत्तीला पोषण देऊन समष्टीचें किती जरी नुकसान झालें तरी व्यक्तीनें सुखी होण्याचा मार्ग कोणता, हें भांडवलशाही आपल्याला शिकवते. म्हणूनच भांडवलशाही विघातक आहे. म्हणूनच भांडवलशाहीचा नाश करण्याचा विडा उचलून समाजवाद अखंड प्रगति आज करीत आहे. समाजवादाच्या मुळाशीं समाजहिताचा उच्च हेतु आहे म्हणूनच समाजवाद प्रशस्य आहे. तद्वतच गांधीवादाच्या मुळाशीं उच्च हेतु आहे. समाजवाद मात्र समाजाच्या भौतिक आबादीचा विचार करितो, तर गांधीवाद भौतिक आबादीची नैतिक संपन्नतेशीं सांगड घालूं पाहातो. म्हणूनच गांधीवाद व्यक्तिजीवनाच्या पावित्र्याविषयीं अत्यंत जागरूक आहे. व्यक्तिजीवन जितक्या प्रमाणांत नीतिमय बनेल, तितक्याच प्रमाणांत समाजाची नीतिमत्ता वाढेल, ही गोष्ट सहज पटण्यासारखी आहे आणि नीतीचा मार्ग आचरण्याला कठीण असणारच. नेहमींच चढण्याचें काम श्रमाचें असतें. पर्वतारोहणाला फारच श्रम पडतात. उडी मारून पर्वताचे टोकावर जातां येत नाहीं. एक एक पाऊल उचलीत, घामानें डबडबून जाऊन, छाती भरून येऊन, हळू हळू प्रगति करावी तेव्हांच पर्वताचें शिखर गाठतां येतें. पण पर्वताच्या शिखरावरून पायथ्याशीं येण्याला तितके श्रम पडत नाहींत. एकाच उडींत एकदम पायथ्याशीं येतां येतें. जी गोष्ट स्थूल आरोहणाची, तीच नैतिक आरोहणाचीही आहे. नैतिक उन्नति अत्यंत श्रमाचें काम आहे, तर नैतिक अवनतीला मुळींच श्रम नकोत !

गांधीवाद नैतिक उन्नतीचा आदर्श मुख्यतः आपल्या डोळ्यांसमोर ठेवीत असल्यानें, गांधीवादाचा कार्यक्रम लोकांना कठीण वाटतो. नैतिक उन्नतीचा मार्ग श्रमाचाच असतो, पण नैतिक उन्नति सिद्ध झाल्यानंतर जें सुख आणि आनंद प्राप्त होतात, त्यामुळें सारा श्रम नाहींसा होऊन श्रम केल्याची आठवणही राहात नाहीं. सामान्य जनसमूहाला गांधीवाद अनाकर्षक वाटतो याचें हेंच कारण आहे. पण वस्तु अनाकर्षक आहे, एवढ्यानेंच ती त्याज्य आहे असें म्हणणें वेडेपणाचें होईल. श्रेय आणि प्रेय यांच्यांत विरोध उत्पन्न झाला असतां शहाणा मनुष्य प्रेयाला दूर करून श्रेयाचाच आश्रय घेतो. प्रेयाचें आकर्षण माणसाला किंवा समाजाला नेहमींच असतें. श्रेयाचें आक-

षण प्रयत्नानेंच सिद्ध होतें. कोण्याही व्यक्तीला इंद्रियांचे उपभोग घेण्यासाठीं उपदेश करण्याची जरूर असत नाहीं. इंद्रियांचा स्वभावच उपभोग घेण्याचा असतो. पण उपभोगांत श्रेय नसल्यामुळें उपभोग किती जरी आकर्षक असले तरी त्यांचा संयमच करावा लागतो. संयमानेंच व्यक्तीची किंवा समाजाची शक्ति वाढते म्हणून गांधीवाद प्रत्येक बाबतींत संयमाचाच मार्ग दाखवितो. संयमाचेंच दुसरें स्वरूप आहे त्याग. गांधीवादाची रचना त्यागावर आहे. वैयक्तिक त्यागामुळें समाजाचें कल्याण सिद्ध होईल हा गांधीवादाचा विश्वास आहे आणि म्हणूनच गांधीवाद प्रत्येकाला त्यागाचा मार्ग दाखवितो. त्याग ही गोष्ट सोपी किंवा आकर्षक नसल्यानें गांधीवाद समाजाला अनाकर्षक वाटणें स्वाभाविक आहे.

पण आकर्षकतेनें समाजाचें थोडेंच कल्याण होणार आहे! तसें असतें तर ठिकठिकाणीं दारूचे गुत्ते उघडणें हा कार्यक्रम गांधीवादानें ठेविला असता. समाजाला जें आकर्षक वाटतें तें समाजाला देणें हा गांधीवादाचा मार्ग नाहीं. कोणत्याही समाजपरिपोषक विचारसरणींत आकर्षकतेवर भार देणें शक्यच होणार नाहीं. समाजाला उपकारक असणारी वस्तु आकर्षक स्वरूपांत समाजापुढें रुजू करणें ही एक गोष्ट आहे, आणि समाजाला जें आकर्षक वाटेल तेंच त्याचेपुढें ठेवणें ही गोष्ट निराळी आहे. पहिली गोष्ट आवश्यक आहे आणि सर्वच समर्थ नेते कोणतीही हितकारक वस्तु आकर्षक स्वरूपांत समाजापुढें ठेवण्याचा प्रयत्न करितात. "एक वर्षांत स्वराज्य" ही गांधींची घोषणा असहकाराला आकर्षक स्वरूप देण्याचाच एक प्रयत्न होता. "सुताच्या धाग्यानें स्वराज्य" हाही रहाट लोकप्रिय करण्याचा प्रयत्न आहे. पण आकर्षक करण्याच्या प्रयत्नांत मूळ वस्तु गमावून बसतां कामा नये. मोन्टीसोरी पद्धतीप्रमाणें अर्भकांचा इंद्रियविकास करण्यासाठीं मॅडम मोन्टीसोरीनें जीं साधनें शोधलीं आहेत, तीं होतां होई तों आकर्षक बनविलीं आहेत. पण आकर्षकता हें त्यांतील मुख्य लक्ष्य नसून इंद्रियविकास हें आहे. त्याचप्रमाणें गांधीवादाचे सिद्धान्त आकर्षक रीतीनें लोकांपुढें ठेविले पाहिजेत असें कोणीं म्हटलें तर त्यांत अस्वीकार्य कांहींच नाहीं. पण त्यांत आकर्षकता आनुषंगिक राहून सिद्धान्त मुख्य वस्तु राहील. आज गांधीवादाचे सिद्धान्त आकर्षक वाटत नसले तर ते सिद्धान्त प्रतिपादण्याची पद्धति अनाकर्षक आहे असें कोणीं म्हटलें तर तें कदाचित् खरें ठरेल. पण समाजाला आकर्षक वाटेल तेवढेंच गांधीवादानें

सांगावें असें कोणीं म्हटलें तर तें गांधीवादालाच काय पण दुसऱ्या कोणत्याही विचार-सरणीला स्वीकार्य होणार नाहीं.

साऱ्या समाजाला तपस्वी जीवनाची दीक्षा देण्याचा जणूं आग्रह गांधीवादानें राखला आहे, ही आक्षेपकाची भूमिका अतिशयोक्तिपूर्ण आहे. गांधीवादाला हास्यास्पद ठरविण्याची ही एक युक्ति आहे. यांत तपस्वी शब्द ज्या अर्थानें वापरला आहे, त्या अर्थानें गांधीवाद समाजाला तपस्वी बनवूं पाहात नाहीं. तप म्हणजे आत्मोन्नतीचा प्रयत्न अशी जर तपाची व्याख्या केली तर समाजांतील प्रत्येक व्यक्तीनें तपस्वी जीवन स्वीकारावें अशी गांधीवादाची अपेक्षा आहे यांत शंका नाहीं. मानवी जीवनांत सर्वश्रेष्ठ अवस्था गृहस्थाची गणली जाते. "सर्वोपकारक्षम" आश्रम असें त्याचें कालिदासानें यथार्थ वर्णन केलें आहे. या गृहस्थाश्रमाचें स्वरूप कसें असावें याचें विवरण आपल्या स्मृतिग्रंथांतून सविस्तर दिलें आहे. गांधीवादानेंही गृहस्थाश्रमाचा आदर्श स्पष्टपणें मांडला आहे. त्यांत संयमित गार्हस्थ्यावर पुष्कळच भर दिला आहे. स्त्रीपुरुष-संबंधांत विषयोपभोगाला बिलकूल वाव नाहीं आणि स्त्रीपुरुषसंयोग केवळ प्रजोत्पत्तीच्या इच्छेनेंच करितां येईल—इंद्रियजन्य संभोगाचे दृष्टीनें कधींच करितां कामा नये, हा गांधीवादाचा आदेश आहे. ही गोष्ट आचरण्याला सोपी आहे असें गांधीवाद कधींच म्हणत नाहीं. पण विवाहित दंपतीपुढें हा उच्च आदर्श गांधीवादानें ठेविला आहे. याचे उलट, स्त्रीपुरुषांचें संभोगसुख ही अत्यंत आवश्यक आणि आनंददायक वस्तु असल्यानें प्रजोत्पादनाची जबाबदारी टाळून विषयसुख अखंड घेतां यावें म्हणून संततिनियमनाच्या कृत्रिम साधनांचा उपयोग विवाहित दंपतींनीं राजरोसपणें करावा असाही आदर्श विवाहित दंपतीपुढें दुसऱ्या विचारसरणीकडून ठेविला जातो. या दोहोंपैकीं कोणता आदर्श श्रेयस्कर आहे याचा निर्णय कोणीही विचारी पुरुष सहज करूं शकेल. ज्या आदर्शामुळें संयमशक्ति वाढते तोच आदर्श श्रेष्ठ असणार. ज्या आदर्शामुळें भोगलालसा वाढून संयमशक्ति क्षीण होते तो आदर्श समाजाला अधोगतीचे मार्गानें घेऊन जाणार यांत शंकेला स्थानच नाहीं. गांधीजींनीं आपल्या "संयम कीं स्वैराचार" नांवाच्या पुस्तकांत या प्रश्नाची सांगोपांग छाननी करून संयमाच्या आदर्शाचें श्रेष्ठत्व प्रस्थापित केलें आहे. वाचकांनीं गांधीजींचें हें पुस्तक अवश्य वाचावें म्हणजे जीवनांतील एका महत्त्वाचे प्रश्नावर गांधीवादाची कोणती भूमिका आहे, हें त्यांना स्पष्टपणें समजून येईल.

वरील प्रकारच्या आदर्शवादामुळेंच गांधीवादावर तपस्वीपणाचा आरोप केला जातो. या आरोपांत गांधीवादाला खालीं पाहावें लागेल असें कांहींच नाहीं. "हमचें जीवन तपोमय होत चाललें आहे," असें कोणीं कोणाला म्हटलें तर त्यांत ऐकणाऱ्यानें गौरव मानला पाहिजे. त्याचप्रमाणें गांधीवादावरील या आक्षेपाचें आहे. पण ह्या आक्षेपाचा रोख गांधीवादाच्या आदर्शवादितेपेक्षां, गांधीवादाच्या अनुयायांच्या बाह्य जीवनाकडे विशेषतः आहे. गांधींचे अनुयायी म्हटले जाणारे कित्येक सेवक आहार-विहाराचे बाबतींत ज्या कडक नियमांचें पालन करितात, शरीराच्या बाह्य दर्शनांत तपस्याला साजेशी वेषभूषा धारण करितात, त्यामुळें गांधीवाद साऱ्या समाजाला अशा प्रकारचे बैरागीच बनवूं पाहातो असें सामान्यतः वाटण्याचा संभव आहे. पण ही कल्पना चुकीची आहे. गांधीवादांत वैयक्तिक विकासाचा संपूर्णतया विचार केला असल्यामुळें विशिष्ट श्रेयःसाधक व्यक्तींसाठीं यमनियमांचीं कठोर व्रतेंही त्यांत समाविष्ट आहेत. अशा व्रतांचें आचरण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्ति गांधीवादाच्या अनुयायांत आहेत. पण तेवढ्यावरून गांधीवाद साऱ्या समाजाला बैरागी करूं पाहातो असें म्हणतां येत नाहीं. कोणत्याही नैतिक विचारसरणीच्या अनुयायीवर्गांत श्रेयःसाधक तपस्वी हे असणारच. हिंदु धर्मांतील संन्यासी किंवा जैन धर्मांतील साधु किंवा ख्रिश्चन धर्मांतील फादर्स, किंवा मुसलमान धर्मांतील फकीर हे अध्यात्म क्षेत्रांतील साधक म्हणून आपल्यापुढें असतातच. त्याचप्रमाणें गांधीवादाच्या विशिष्ट विचारसरणींत अध्यात्मक्षेत्राचे यात्रीही आहेत. पण गांधीवादानें बहुजनसमाजासाठीं ज्या नैतिक जीवनाचा आदर्श ठेविला आहे, त्यांत इतक्या कठोर तपस्वी जीवनाची अपेक्षा नाहीं. मनुष्याला श्रेयाच्या मार्गानें घेऊन जाणारा नीतिमय जीवनाचा सामान्य आदर्शच गांधीवादानें समाजापुढें ठेविला आहे. त्या आदर्शाचें पालन जो तो आपल्या शक्तीप्रमाणेंच करूं शकणार.

थोडक्यांत सांगायचें म्हणजे गांधीवाद समाजाला तपस्वी जीवनाची दीक्षा देत नसून, समाजापुढें तपस्वी जीवनाचा आदर्श ठेवून समाजानें नीतिमय जीवनच अखंड ठेवावें असा आग्रह गांधीवादानें बाळगला आहे. यांत अनाकर्षक कांहींच नाहीं. यांत भिण्यासारखेंही कांहींच नाहीं. या मार्गानेंच कोणत्याही समाजाचें कल्याण होईल या बाबतींत मतभेद होण्याचेंही कारण नाहीं.

# २३ गांधीवाद तर्कशून्य आहे?

**आक्षेपः—** गांधीवाद जर प्रभावी असता तर त्यानें हिंदुस्थानच्या सुशिक्षित वर्गावर आपला पगडा केव्हांच बसवला असता. पण सारे सुशिक्षित तरुण समाजवादाच्या मागें वेडे झालेले दिसतात आणि गांधीवादापासून दूर राहाण्याचाच प्रयत्न करितात, असें दिसून येतें. यावरून गांधीवादांत बुद्धीचें समाधान होईल अशी तार्किक विचारसरणीच नाहीं, हें सिद्ध होतें. जो वाद तार्किक भूमिकेवर रचला गेला नसून केवळ भावनावश आदर्शवादितेवर रचला गेला आहे तो चिरस्थायी कसा होणार?

**उत्तरः—** आक्षेपकानें गांधीवाद सुशिक्षित समाजाला पटत नाहीं ही भूमिका कल्पून तो तर्कशून्य वाद आहे असा निष्कर्ष काढला आहे. पण यांत कल्पिलेली भूमिकाच चुकीची आहे. गांधीवाद सुशिक्षित समाजाला पटत नाहीं, हें म्हणणें चुकीचें आहे. समाजवादाचे अनुयायी आणि गांधीवादाचे अनुयायी यांची संख्या हिंदुस्थानांतील सुशिक्षित वर्गात मोजून काढली तर गांधीवादाचे अनुयायी फारच अधिक निघतील. समाजवादाचे अनुयायी जास्त भासतात, याचें कारण समाजवाद फार बोलका आहे, तसा गांधीवाद बोलका नाहीं. गांधीवाद क्रियेला प्राधान्य देतो, तर समाजवाद विशिष्ट प्रकारच्या विचारसरणीला प्राधान्य देतो. गांधीवाद म्हणेल "समाजांत तुम्हांला समानता पाहिजे ना? तर तुम्ही प्रत्यक्ष मजूरी करून गरीबांच्या सारखे गरीब व्हा." समाजवाद म्हणेल, "तुम्हांला समानता पाहिजे ना? तुम्ही, श्रीमंतांनीं सर्वांचें किती नुकसान केलें आहे याचा अभ्यास करून वर्गविद्वेषाचें वारें समाजांत पसरवा." म्हणजे गांधीवाद प्रत्यक्ष क्रियेचा आदेश देतो, तेव्हां समाजवाद प्रचाराचा आदेश देतो. म्हणूनच हिंदुस्थानांत स्वतःला समाजवादी म्हणविणारे सुशिक्षित तरुण समाजवादाच्या उच्च सिद्धान्तांविषयीं मुक्तकंठानें बोलत, लिहीत असतांनाही प्रत्यक्ष कृतींत समाजवादी दिसून येत नाहींत. गांधीवाद प्रत्येकानें रहाट कातलाच पाहिजे असा आदेश देतो. रहाट कातण्याचें सोपें कामही पुष्कळांना कठीण वाटतें. समाजवाद व्यक्तिजीवनावर असला कोणताच बोजा ठेवीत नाहीं. म्हणून विशिष्ट विचारसरणी धारण केल्यामुळेंच कोणालाही समाजवादी होतां येतें.

गांधीवादांत हा अवकाश नाहीं. गांधीवादाची विचारसरणी स्वीकारली कीं लागलीच तदनुरूप क्रिया करावी लागते. म्हणून बुद्धीनें गांधीवादाची विचारसरणी पटली असूनही जोंपर्यंत ती विचारसरणी प्रत्यक्ष क्रियेत आली नाहीं, तोंपर्यंत कोणतीही व्यक्ति गांधीवादी गणली जात नाहीं. विचारसरणीच्याच दृष्टीनें पाहिलें तर समाजांत गांधीवादाची विचारसरणी स्वीकारणारे पुष्कळच लोक आहेत. त्यांच्या प्रमाणांत समाजवादी विचारसरणी स्वीकारणारे फारच कमी आहेत. पण केवळ विचारसरणीवरूनच मनुष्य गांधीवादी होत नसल्यामुळें, त्याला समाजवाद्याप्रमाणें स्वतःचा बौद्धिक विश्वास समाजापुढें मांडतां येत नाहीं. म्हणूनच गांधीवादाच्या विचारसरणीचा स्वीकार करणारे लोक गांधीवादाविषयीं मुखर होऊं शकत नाहींत. हा प्रत्यवाय समाजवाद्यांना नसल्यामुळें केवळ विचारसरणीच्या स्वीकारानेंच ते समाजवादी बनून इतरांना त्या विचारसरणींत खेचण्याचा प्रयत्न करितात.

खरें पाहिलें तर हिंदुस्थानांत गांधीवाद आणि समाजवाद यांचें असें बेमालूम मिश्रण झालें आहे कीं शुद्ध गांधीवादी आणि शुद्ध समाजवादी असे विभिन्न वर्ग पाडणें कठीण आहे. रशियाच्या कम्युनिस्ट पार्टीचे विधिसर सदस्य वगळले, तर सामान्यतः समाजवादी विचारसरणी धारण करणारे सुशिक्षित तरुण ५० टक्के तरी गांधीवादी असतातच. किती तरी समाजवादी तरुण शुद्ध खादीधारी आहेत. किती तरी समाजवादी पुरुष गांधींच्या तंत्रानें चालणाऱ्या कॉंग्रेसच्या पुढारी वर्गांत आहेत. कॉंग्रेस सोशलिस्ट-पार्टीही गांधीवाद आणि समाजवाद या दोहोंच्या मिश्रणांतून पैदा झालेली संस्था आहे.

हें असें आहे याचें कारण गांधीवाद आणि समाजवाद यांच्यांतील ध्येयाचें अंशतः एकत्व. गांधीवादाला सामाजिक समानता पाहिजे, भांडवलशाही नको. समाजवादालाही सामाजिक समानता पाहिजे, भांडवशाही नको, अशी परिस्थिति असल्यामुळें दोन्ही विचारसरणींतील रुचतील तेवढ्या गोष्टी स्वीकारून स्वतःची विचारसरणी घडण्याची वृत्ति हिंदुस्थानांतील सुशिक्षित वर्गांत आढळून येते.

समाजवादाची विचारसरणी तर्कशुद्ध आहे आणि गांधीवादाची नाहीं, हें म्हणणें चुकीचें आहे. दोन्ही विचारसरण्या तर्कशुद्ध आहेत. पण समाजवादानें आपल्या विचारसरणीची मांडणी जितक्या तर्कशुद्धपणें केली आहे, तितक्या तर्कशुद्धपणें गांधीवादानें अद्यापपावेतों केली नाहीं, ही गोष्ट अगदीं खरी

आहे. ऐतिहासिक जडवाद किंवा मार्क्सवाद ही शास्त्रीय पद्धतीनें मांडलेली विचारसरणी आहे. गांधीवादाची अशी शास्त्रीय मांडणी अद्याप झालेली नाहीं. गांधीवादाचें तर्कशास्त्र अद्याप रचलें गेलें नाहीं. गांधीवादाचे प्रणेते गांधी यांची पद्धति दार्शनिक आहे, तार्किक नव्हे. सत्याची उपासना करतां करतां त्यांना जे नवे नवे शोध मिळत गेले ते त्यांनीं समाजापुढें मांडले. वर्धा-योजनेसारख्या शिक्षणपद्धतीच्या बाबतींतही त्यांनीं दार्शनिक पद्धतीनेंच ती पद्धति समाजापुढें मांडली. त्यानंतर शिक्षणशास्त्रवेत्त्यांनीं त्या पद्धतीचें परीक्षण करून, तिच्या बाबतींत प्रयोग करून, ती पद्धति शास्त्रशुद्ध आहे असें तार्किक रीतीनें सिद्ध करून दाखविलें. गांधींनीं ज्या ज्या सिद्धान्तांचें प्रतिपादन केलें आहे, त्या त्या सिद्धान्तांची तार्किक भूमिका पाश्चात्य विचारकांच्या विश्लेषणात्मक ( analytic ) तर्कपद्धतीनें त्यांनीं समाजापुढें मांडली नाहीं. हें काम सुटक सुटक व्यक्तींनीं निरनिराळ्या प्रसंगीं केलें आहे. गांधीवादाच्या विशदीकरणाच्या दृष्टीनें कै. वा. महादेव देसाई, श्री. किशोरलाल मश्रूवाळा, श्री. काका कालेलकर, श्री. विनोबा भावे, आचार्य कृपालानी, आचार्य भागवत, वगैरे नांवें आपल्यापुढें प्रामुख्यानें येतात. या सर्वांनीं निरनिराळ्या प्रसंगीं गांधीवादाच्या मूलतत्त्वांवर आणि त्याच्या तपशीलावर प्रकाश पाडला आहे. अमेरिकन लेखक रिचर्ड ग्रेग यांनींही गांधीवादाची तार्किक भूमिका विशद करण्याचा प्रयत्न आपल्या The power of non-Violence सारख्या पुस्तकांतून केला आहे. हे सर्व सुटक सुटक प्रयत्न सोडून दिले तर ज्याप्रमाणें समाजवादावर तर्कशुद्ध ग्रंथ लिहिले गेले आहेत, तसे अद्याप गांधीवादावर लिहिले गेले नाहींत. याचें कारण गांधीवादाची तार्किक भूमिका भारतवर्षाला तरी नवी नाहीं. गांधींचा मार्ग नवा आहे, त्यांचा कार्यक्रम नवा आहे, जीवनाकडे पाहाण्याची त्यांची दृष्टि नवी आहे, पण ज्या मूलभूत तत्त्वांवर त्यांची विचारसरणी रचली आहे तीं तत्त्वें सनातन धर्मांचींच तत्त्वें आहेत. म्हणून गांधीवादाची तात्त्विक भूमिका निराळी समजावून देण्याची आवश्यकता हिंदुधर्मीयांच्या दृष्टीनें तरी नाहींच. पण हिंदुस्थानांतही हिंदु संस्कृतीहून भिन्न संस्कृति आहेत त्यांच्या दृष्टीनें, त्याचप्रमाणें गांधीवाद केवळ हिंदूंसाठीं किंवा हिंदुस्थानासाठीं नसून समग्र मानवसमाजासाठीं असल्यामुळें, समाजवादानें ज्या प्रकारें आपली तात्त्विक भूमिका तर्कशुद्ध रीतीनें स्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे, त्याचप्रमाणें गांधीवादाची तात्त्विक

भूमिका कोणी समर्थ विचारकानें जगापुढें मांडली पाहिजे यांत शंका नाहीं. हें काम कोण करील हें कोणीं सांगावें ?

पण अशी भूमिका मांडली जात नाहीं म्हणून गांधीवादाचा प्रसार थांबून राहिला आहे असें म्हणणें बरोबर नाहीं. बहुजनसमाजाला तात्त्विक विचारसरणीची भूक फारशी नसते. त्यांना अत्यंत सोप्या भाषेंत जीवनाचें तत्त्वज्ञान समजावून सांगणाऱ्या व्यक्तीचें नेतृत्व हवें असतें. आणि या बाबतींत गांधींच्या तोडीचा दुसरा कोणताही पुरुष आज साऱ्या जगांत आढळत नाहीं. गांधींनीं अगदीं सोप्या भाषेंत जीवनाचीं प्रगूढ तत्त्वें हिंदुस्थानच्या समाजापुढें मांडलीं आहेत आणि त्याचा इतका परिणाम दिसून येतो कीं गांधींच्या विचारसरणीचा ध्वनि हिंदुस्थानच्या कोपऱ्यांतील लहानशा खेड्यांतही घरोघरीं ऐकायला मिळतो. जगांत जितके धर्मसंस्थापक झाले त्यांनीं याच पद्धतीनें समाजाशीं काम केलें आहे. बुद्धानें किंवा ख्रिस्तानेंही अगदीं सोप्या भाषेंत आपलें तत्त्वज्ञान जगापुढें मांडलें. या दोन्ही महात्म्यांच्या विचारसरणीची तात्त्विक भूमिका मागाहून त्यांच्या अनुयायीवर्गांतील समर्थ विचारकांनीं शास्त्रशुद्ध रीतीनें जगापुढें मांडली. जगांत दुसऱ्या कोणत्याही समाजधुरीणाला अद्यापपावेतों न मिळालेली अनुयायांची प्रचंड संख्या गांधी मिळवूं शकले आहेत. गांधींच्या श्रेष्ठ व्यक्तिमत्त्वामुळें गांधींना सर्वश्रेष्ठ पुरुष म्हटलें जातें. असें आहे तर केवळ तात्त्विक भूमिका तर्कशुद्ध रीतीनें मांडणारे ग्रंथ नाहींत एवढ्यावरून गांधीवादाचा प्रचार कमी आहे असें म्हणणें सत्याला धरून आहे असें कसें म्हणतां येईल ?

गांधीवाद भावनाश आदर्शवादितेवर रचला गेला आहे असें म्हणणें डोळे असून पाहाण्याचें नाकारण्यासारखें आहे. गांधीवाद प्रत्येक व्यक्तीला प्रत्यक्ष क्रियाशील करूं पाहातो म्हणूनच गांधीवादाचें आचरण सर्वांना कठीण वाटतें, हें आपण सुरवातीलाच पाहिलें आहे. गांधीवाद म्हणजे अंतर्बाह्य व्यवहारसंगत क्रिया. गांधीवादांत पोकळ स्वप्नवादाला किंवा निष्क्रिय भावनांना जागाच नाहीं. मग आक्षेपकाला भावनावश आदर्शवादिता गांधीवादांत कोठून दिसली ? गांधीवादाचा रहाट, गांधीवादाचा ग्रामोद्योग, गांधीवादाचें अस्पृश्यतानिवारण, गांधीवादाचा सत्याग्रह, गांधीवादाचा सविनय कायदेभंग—या आणि इतर सर्वच गोष्टींत परिस्थितीला अनुसरून, व्यवहारी बुद्धीनें विचार करून निश्चित केलेली विचारसरणी आणि कार्यप्रणालि आपल्याला आढळून येते.

गांधीवाद पोकळ भावनांना स्थान देत नाहीं, इतकेंच नव्हे तर गांधीवाद क्रियेवर फारच भार देतो अशी अनेकांची तक्रार आहे. एखादा लक्षाधिपति मनुष्य समाजवादी म्हणून मिरवूं शकेल, पण त्याच लक्षाधिपतीला गांधीवादी व्हावयाचें असेल तर आपल्या साऱ्या संपत्तीचा त्याग करून हिंदुस्थानाचा निष्कांचन सेवक बनावें लागेल!

आक्षेपकानें आरंभीं सुशिक्षित तरुणांविषयींचें जें निरीक्षण दिलें आहे त्याचा थोडासा विचार करून हें उत्तर पुरें करावयाचें आहे. हिंदुस्थानांत ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर जी शिक्षण-पद्धति दाखल झाली आहे, ती पद्धति किती अनर्थावह आहे याचें विवरण करण्याची आवश्यकता नाहीं. ती गोष्ट सर्वांना माहीत आहे. या शिक्षणपद्धतींतून बाहेर निघालेला आपला युवक–युवतीवर्ग किती क्रियाशून्य झाला आहे, तेंही सर्वांना ठाऊक आहे. या तरुणांना गांधीवादांतील प्रखर क्रियावाद बुद्धीला स्वीकार्य वाटला तरी क्रियेंत आणणें कठीण वाटणें अपरिहार्य आहे. म्हणूनच गांधीवादाचें आचरण करणारे सुशिक्षित तरुण आपल्याला कमी आढळतात. पण केवळ बौद्धिक स्वीकाराच्या दृष्टीनेंच पाहिलें तर गांधीवादाची भूमिका तरुणवर्गाला स्वीकार्य वाटते यांत शंकेला स्थानच नाहीं. म्हणून गांधीवाद तरुणवर्गांत अस्वीकार्य आहे हें म्हणणें वस्तुस्थितीला धरून नाहीं.